# राम विवाहाच्या मिरवणुकीवर दगडफेक

**■ वृत्तसंस्था, दरभंगा, दि. ७ :**
बिहारमधील दरभंगा येथे शुक्रवारी बाजीतपूर येथील मशिदीजवळ राम विवाहाच्या मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आली. यानंतर मोठा गदारोळ झाला. विवाहपंचमीनिमित्त तरौनी गावातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीवरदरम्यान दोन्ही पक्षांकडून विटा आणि दगडफेक करण्यात आली. परिस्थिती इतकी बिकट झाली होती की, ज्या ठिकाणी विवाह पंचमी मिरवणूक निघणार होती त्या रस्त्यावर फक्त दगडच दिसत होते.

एका समुदायाच्या लोकांनी आधी मिरवणुक थांबवली आणि नंतर त्यांना लाठीमार करायला सुरुवात केली. यानंतर दोन्ही बाजू समोरासमोर आल्याने दोन्ही बाजूंनी दगडफेक सुरू झाली.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# महासागर
e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com
* वर्ष ५४ * अंक २४१ * * नागपूर * | रविवार, दिनांक ८ डिसेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)







## थोडक्यात..

### महादेव सट्टा ॲप आणखी एकाला अटक

**■ रायपूर :** महादेव सत्ता ॲप प्रकरणी ईडीच्या पथकाने नवी अटक केली आहे. शनिवारी ईडीने शेअर ब्रोकर गौरव कुमार केडियाला अटक करून कोर्टात हजर केले. सुनावणीनंतर न्यायालयाने आरोपी गौरवला ५ दिवसांच्या कोठडीत ईडीच्या ताब्यात दिले. ईडीने स्टॉक ब्रोकरला कोलकाता येथून अटक केली आहे.

गौरव केडिया महादेव सट्टा ॲप प्रकरणात तुरुंगात असलेल्या नितीन टिब्रेवालसह ऑनलाइन बेटिंग ॲप्सशी संबंधित लोकांसाठी शेअर्स खरेदी-विक्री करायचा. याशिवाय सट्टेबाजीतून येणारा काळा पैसा तो शेअर ट्रेडिंगच्या माध्यमातून पांढऱ्या पैशात बदलत असे.

### मशिदी आणि मंदिरांमधून लाऊडस्पीकर हटवले

**■ कानपूर :** यूपीमध्ये गेल्या 24 तासांत लाऊडस्पीकरवर मोठी मोहीम राबवण्यात आली. 2500 हून अधिक मंदिरे आणि मशिदींमधून लाऊडस्पीकर हटवण्यात आले.

कानपूर, लखनौ, गोरखपूर, संत कबीरनगर, आझमगढ या ठिकाणांहून साऊंड सिस्टीम उतरवल्याची दृश्ये समोर आली आहेत. पीलीभीतमध्ये मौलानाने स्वतः स्पीकर काढले. तर कानपूरमध्ये मौलानाने नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, ही कारवाई पुढेही सुरू राहील.

## शिंदे सेनेला सोडावे लागणार गृहमंत्रालयावर पाणी?

# महायुतीत खातेनाट्याला सुरुवात



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**
राज्यात महायुतीच्या सरकारचे घोडे एकदाचे सत्तेच्या गंगेत नहाले. बहुमताचे सरकार असतानाही शपथविधीसाठी ११ दिवसांचा कालावधी लागला.

आता सर्वांना मंत्रिमंडळ विस्ताराचे डोहाळे लागले आहे. खाते वाटपावरून तीनही पक्षात जोरदार रस्सीखेच होणार आहे. गृह विभागासाठी शिंदे सेना अजूनही आग्रही असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे त्यांना त्या तोडीचे एखादे खाते देण्याचा भाजपाचा प्रस्ताव आहे. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांची खाते वाटपासंदर्भात बैठक होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादीपेक्षा आमच्याकडे अधिक संख्याबळ असल्याची चर्चा शिवसेनेकडून सुरू झाली आहे. त्यामुळे शिंदे गट महत्त्वाच्या खात्यासाठी आग्रही आहे. शिंदे सेना गृहमंत्रालयासाठी आग्रही आहे. शिंदे सेनेपुढे महसूल, जलसंपदा, साबांवि या खात्यांबाबत विचार करा, असा शिवसेनेला भाजपने सल्ला दिला आहे. शिवसेनेला या ३ खात्यांच्या पर्यायांपैकी १ पर्याय निवडावा लागणार आहे.

गृहखात्याइतकेच महत्वाचे, तोडीस तोड खाते मिळवण्याकरता शिवसेना आग्रही आहे. ऊर्जा, गृहनिर्माण खाते शिवसेनेला मिळण्याची शक्यता कमी असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मात्र, शिवसेनेचा आग्रह गृहखात्यासाठी असल्याने खातेवाटपात अधिकच पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

## इलेक्ट्रिक वाहन उद्योगात २०३० पर्यंत

# चार कोटी रोजगार निर्मिती



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची माहिती

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ७ :**
भारतातील इलेक्ट्रिक वाहन उद्योग हा 2030 पर्यंत सुमारे 4 कोटी रोजगार निर्मिती करणारे क्षेत्र राहणार असून लिथियमचे जगातील सुमारे 6 टक्के साठे हे जम्मू मध्ये प्रमाणात सापडल्याने हे लिथियम आयन बॅटरीच्या स्वरूपात 60 कोटी इलेक्ट्रिक वाहनामध्ये वापरण्यात येईल त्याचप्रमाणे लिथियम आयन बॅटरीची किंमत सुद्धा किंमत कमी होईल अशी माहिती केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूर येथे दिली .

नागपूरच्या राजनगर स्थित केंद्रीय गृह मंत्रालयात अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय- एनएफएससी येथे 'इलेक्ट्रिक वाहनातील आगीच्या दुर्घटनेचे व्यवस्थापन' या विषयावर एका कार्यशाळेला संबोधित करत होते. याप्रसंगी एनएफएससी नागपूरचे संचालक एन. बी. शिंगणे उपस्थित होते.

गडकरी पुढे म्हणाले, गेल्या 3 वर्षांमध्ये इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांमध्ये 30 आग लागल्याच्या घटना घडल्या असून यामुळे ई व्हेईकलच्या बाजार व्यवस्थेवर परिणाम होत होता. परंतु रक्षा संशोधन विकास संस्था डीआरडीओ तसेच भारतीय तंत्रज्ञान संस्था - आयआयटी यांच्या तज्ञ कमिटीने बॅटरी सुरक्षा यावर संशोधन केले असून ऑटोमेटिव्ह इंडस्ट्रीज स्टॅंडर्ड अर्थात एआयएस या सुरक्षा मानांकनाने बॅटरी सुरक्षा सुनिश्चित केली असून इलेक्ट्रिक बसेस मध्ये फायर डिटेक्शन अलार्म सुद्धा आपण आता अनिवार्य केला असल्याचे त्यांनी सांगितलं.

ईव्ही बॅटरी वेस्ट मॅनेजमेंटच्या संदभार्तील नियम केंद्रीय परिवहन मंत्रालयाने 2022 लाच आखले असून या संदर्भात बॅटरी रिकव्हरी आणि रिसायकलिंग व्यवस्थापनाकरिता बॅटरी उत्पादकांवर हे नियम बंधनकारक केले असल्याचे गडकरी म्हणाले. हायड्रोजन, इथेनॉल, सीएनजी, इलेक्ट्रिक हे भविष्यातील इंधन असून प्रदूषण मुक्त असे इंधन उपलब्ध होऊन यामुळे सुरक्षित परिवहन सुनिश्चित होणार आहे.

इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीमध्ये 45% वाढ झाली असून बाजारपेठेत इलेक्ट्रिक वाहनांचे प्रमाण हे 6.4% आहे. 56% विक्रीचे प्रमाण हे इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांच असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

## ईव्हीएमला मविआचा कडाडून विरोध

# आमदारांनी शपथही घेतली नाही

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभवाला समोरं जावं लागलं. त्यानंतर महाविकास आघाडीकडून ईव्हीएमवर संशय व्यक्त करण्यात आला. याचेच पडसाद आजपासून सुरु झालेल्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात देखील उमटले.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आमदारकीची शपथ घेतली नाही. तर महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून विधिमंडळ परिसरात आंदोलन करण्यात आलं. आज विधिमंडळ परिसरात महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून याबद्दल भूमिका मांडण्यात आली. एखादं सरकार एवढ्या मतांनी निवडून येतं. जल्लोष पाहायला मिळतो. पण राज्यात दिसत नाही. मग प्रश्न हाच पडतो की हे जनतेने दिलेलं बहुमत आहे की ईव्हीएम- निवडणूक आयोगाने दिलेलं बहुमत आहे. जनतेचा मान राखून आम्ही आज शपथ घेत नाही. उद्या आम्ही शपथ घेणार आहोत, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

मारकडवाडीने बॅलेट पेपर वर निवडणुकी घेण्याचा निर्णय घेतला. यात निवडणूक आयोगाचा काय संबध आहे? पोलिसांचा काय संबध आहे? असं म्हणत जितेंद्र आव्हाड यांनी निवडणूक प्रक्रियेवर संशय व्यक्त केला आहे.

वरिष्ठांशी बोलून आम्ही निर्णय घेणार आहोत. राज्यातील जनतेचे मत आहे हे सरकार जनमताने आलेले नाही. हे सरकार मतं चोरून आले आहे. सरकारने भूमिका घेतली पाहिजे, असे नाना पटोले म्हणालेत.

# ..हा तर लोकशाहीचा अपमान

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**
विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीच्या आमदारांनी शपथ न घेण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे, ज्या जनतेने त्यांना निवडून दिले, त्याच जनतेचा देखील हा अपमान असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी विरोधकांकडून होत आहे. यासाठी आज विरोधी पक्षाच्या आमदारांनी आमदारकीची शपथ देखील घेतली नाही. आता या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाआघाडी मध्ये आरोप - प्रत्यारोप सुरू आहेत. आता मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना या प्रकरणी प्रत्युत्तर दिले आहे.

### फडणवीसांचा पलटवार

मधुकर पिचड यांच्याकडे दलित, वंचित आणि आदिवासींचा आवाज म्हणून पाहिले जात होते. एक राजकारणी म्हणूनच नाही तर एक समाज सुधारक म्हणून त्यांनी चांगले काम केले असल्याचे फडणवीस यांनी श्रद्धांजली देताना म्हटले .



# डॉ. नरेंद्र जाधव यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

## सीएम फडणवीस, शिंदेंचे महामानवाला अभिवादन

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत डॉ. नरेंद्र जाधव लिखित 'भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

राज्य सरकार म्हणून आम्ही जे कार्य करू ते संविधान अनुरूप करू. तसेच ते काम करत असताना समाजातील शेवटचा घटक म्हणजेच वंचिताचा विचार करून काम करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.

जगाच्या पाठीवर सर्वात सुंदर आणि सर्वात उत्तम संविधान हे भारताचे संविधान असून संविधानामुळेच सामान्य माणसाच्या जीवनामध्ये सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन झाल्याचेही ते म्हणाले.

# पत्रकार संरक्षण कायद्याचे लवकरच नोटिफिकेशन

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**
देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्याच पत्रकार परिषदेत पत्रकार संरक्षण कायद्याचे लवकरच नोटिफिकेशन काढून कायदयाची अंमलबजावणी करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

पत्रकार परिषदेत मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागीय सचिव व मुंबई अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष दीपक कैतके यांनी त्यांना यासंदर्भात प्रश्न विचारला असता त्यांनी नोटिफिकेशन काढून कायदयाची अंमलबजावणी करण्यात येईल असे आश्वासन दिले.

एस.एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मराठी पत्रकार परिषदेने सतत बारा वर्षे लढा दिल्यानंतर राज्यात पत्रकार संरक्षण कायदा झाला होता. मात्र त्याचे राज्य सरकारने नोटिफिकेशन न काढल्याने कायदा अंमलात आलेला नाही.

# सपा आघाडीतून बाहेर पडणार?



**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**
यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा पराभव झाला. त्यानंतर आता महाविकास आघाडीतील मित्र पक्षाने महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

विधिमंडळाचं विशेष अधिवेशन सुरु आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीतील मित्रपक्ष असणाऱ्या समाजवादी पार्टीने साथ सोडली आहे. शिवाजीनगर- मानखुर्द विधानसभा मतदारसंघाचे आमदार अबू असीम आझमी यांनी ही घोषणा केली आहे. तसंच यंदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा पराभव का झाला? यावरही अबू आझमी यांनी प्रकाश टाकला आहे.

कोणत्याही प्रकारचा समन्वय महाविकास आघाडीमध्ये या निवडणुकीत पाहायला मिळाल नाही. कोणत्याही निवडणुकीला आघाडी म्हणून सामोरं जात असताना एकवाक्यता गरजेची आहे. आघाडीचे नेते एकमेकांच्या उमेदवारांच्या मंचावर प्रचारासाठी दिसले नाहीत. जागा वाटपावेळी रस्सीखेच असल्याचेही आझमी म्हणाले.

# प्रार्थनास्थळ कायदा नवीन खंडपीठ स्थापन

## १२ डिसेंबरला सुप्रीम कोर्टात सुनावणी

**■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**
सर्वोच्च न्यायालय प्रार्थनास्थळ कायदा (1991) च्या घटनात्मकतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर १२ डिसेंबर रोजी सुनावणी करणार आहे.

५ डिसेंबर रोजी सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार होती.

आता १२ डिसेंबर रोजी सीजेआय संजीव खन्ना, न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार आणि न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन यांच्या विशेष खंडपीठासमोर दुपारी ३.३० वाजता या प्रकरणावर सुनावणी होणार आहे. याचिका दाखल करणाऱ्यांमध्ये भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी, कथाकार देवकीनंदन ठाकूर, भाजप नेते आणि अधिवक्ता अश्विनी उपाध्याय आणि इतर अनेकांचा समावेश आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी जशी प्रार्थनास्थळे आणि तीर्थक्षेत्रे होती तशीच ठेवली जातील, असे या कायद्यात म्हटले आहे. यापुढील काळातही या वादाबाबत न्यायालयात कोणताही खटला किंवा कार्यवाही होणार नाही.

### २ महिन्यांच्या मुलाची १ लाखांसाठी हत्या


**भागलपूर :** बिहारमधील भागलपूरमध्ये १ लाख रुपयांच्या हुंड्यासाठी पित्याने आपल्या २ महिन्यांच्या मुलाचा गळा दाबून खून केला. 'हे माझे मूल नाही, अनैतिक अपत्य आहे', असे म्हणत आरोपीने दारूच्या नशेत चिमुकल्या मुलाची हत्या केली.

# स्थानिक निवडणुकांमध्ये भाजप मनसे एकत्र!

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी भाजप महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. विधानसभा निवडणुकीत मनसेने स्वबळावर निवडणूक लढवल्या, मात्र पक्षाला मोठा धक्का बसला.

एकमेव असलेला आमदारही या निवडणुकीत पडला. त्यामुळे आता आगामी स्थानिक निवडणुकांच्या बाबतीत कुठली रणनीती असणार यावर मनसे नेत्यांनी राज ठाकरे यांच्या सोबत चर्चा केली असल्याचे समजते. याच दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनसेला सरकारसोबत ठेवण्यास आवडेल असे सूचक विधान केले होते.

मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर राज ठाकरे यांनी त्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उपक्रमांना पाठिंबा असल्याचे ट्विट केले होते. त्यामुळे आता मनसे आणि भाजप एकत्र येणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्या आहेत. विशेषतः मुंबई मनपावर ताबा मिळविण्यासाठी भाजप मनसेला सोबत घेण्याचे संकेत आहेत.

# कल्याणमध्ये रेल्वेत नोकरीच्या आमिषाने बेरोजगारांची ७४ लाखांची फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी
कल्याण, दि. ७ :

कल्याण : रेल्वेमध्ये नोकरीला लावतो, असे सांगून येथील एका कुटुंबातील सदस्य, संशयास्पद रेल्वे अधिकाऱ्यांनी संगनमत करून रायगड जिल्ह्यातील रोहा येथील एक रहिवासी आणि इतर बेरोजगार तरूणांची एकूण सुमारे ७४ लाख ४० हजार रूपयांची फसवणूक केल्याची तक्रार महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रारदाराकडून दाखल करण्यात आली आहे. जानेवारी ते मे या कालावधीत हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. फसवणूक झालेल्या रोहा येथील एका व्यक्तिने याप्रकरणी महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुरुवारी तक्रार केली. पोलिसांनी प्राथमिक तपासणी अहवाल नोंदवून घेतला आहे.

तक्रारदाराने पोलीस ठाण्यातील तक्रारीत चिकणघर भागातील एका कुटुंबातील चार सदस्य, संशयास्पद तीन रेल्वे अधिकारी आणि एक वैद्यकीय अधिकारी या संशयितांविरुध्द तक्रार दाखल केली आहे. पोलीस ठाण्यातील तक्रारीतील माहिती, अशी, तक्रारदाराचा मुलगा बेरोजगार असल्याने त्यांना नोकरीची गरज होती. तक्रारदाराची ओळख गुन्हा दाखल संशयास्पद व्यक्तिंबरोबर झाली. या नऊ व्यक्तिंमधील काही जण हे रेल्वे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी असल्याचे तक्रारदाराला भासविण्यात आले.

गुन्हा दाखल संशयित व्यक्तिंनी तक्रारदाराला रेल्वेत आमची ओळख असुन आम्ही रेल्वेते विविध पदावर आम्ही नोकरी मिळवून देऊ शकतो असे आमिष तक्रारदाराला दाखविले. आता रेल्वे भरती प्रक्रिया सुरू आहे असे सांगितले. या आमिषाला बळी पडून तक्रारदाराने आपल्या मुलासाठी आणि इतर बेरोजगार तरूणांनी रेल्वेत नोकरी मिळते या अपेक्षेने गुन्हा दाखल व्यक्तिंच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. तक्रारदार आणि इतर बेरोजगार तरुणांकडून गुन्हा दाखल व्यक्तिंनी नोकरी लावण्याच्या बदल्यात ७४ लाख ४० हजार रुपए विविध बँक खात्यावर जमा करून घेतले. तक्रारदारासह बेरोजगार तरूणांना नोकरी लावण्याचे बनावट ईमेल, नियुक्ती पत्रे संशयास्पद रेल्वे अधिकाऱ्यांनी पाठविली.

आपणास मिळालेली नियुक्ती पत्रे बनावट असल्याचे समजल्यावर तक्रारदारसह तरूणांनी पैसे परत मिळण्यासाठी गुन्हा दाखल व्यक्तिंकडे तगादा लावला. त्यांच्याकडून पैसे परत मिळण्याची शक्यता नसल्याने आपली फसवणूक झाली म्हणून तक्रारदाराने महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांनी सांगितले.

## राज्याच्या विविध भागांत अवकाळी पावसाचा दणका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

राज्याच्या विविध भागांत अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. या पावसामुळे शेतकरी चिंतेत आहेत. या पावसाचा फळपिकांना मोठा दणका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जालना शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यात अनेक भागांत गुरुवारपासून ढगाळ वातावरण होते. शुक्रवारी सकाळी अचानक अवकाळी पावसाचा जोर वाढला. या पावसामुळे मोसंबी, द्राक्ष व डाळिंबासारख्या फळपिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. लातूर जिल्यात देखील अनेक भागांत मध्यरात्री पावसाने हजेरी लावली. वातावरणात गारठा वाढला आहे.

# विधानसभेत १७३ आमदारांनी घेतली शपथ

## आघाडीचे आमदार आज शपथ घेणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

पंधराव्या विधानसभा निवडणुकीत निवडून आलेल्या आमदारांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विधिमंडळाच्या तीन विशेष अधिवेशनात शनिवारी १७३ आमदारांनी भारतीय संविधानाची एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली. तर मतदान यंत्र अर्थात ईव्हीएमच्या मुद्द्यावरून विरोधी पक्ष महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज शपथ घेण्यास नकार दिला. त्यामुळे नव्याने सत्ताग्रहण केलेल्या महायुती सरकारच्या पहिल्या अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात ठिणगी पडली. महाविकास आघाडीचे आमदार आज, रविवारी शपथ घेणार आहेत.

आज अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सत्ताधारी महायुतीचे आमदार प्रचंड उत्साहात होते. शिवसेना शिंदे गटाचे आमदार भगवा फेटा तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे आमदार गुलाबी फेटा घालून विधानसभा सभागृहात दाखल झाले. आज सकाळी ११ वाजता हंगामी अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी स्थान ग्रहण करताच राष्ट्रगीत आणि राज्यगीताने अधिवेशनाला सुरुवात झाली. कोळंबकर यांनी राज्यपालांकडून आलेला आदेश वाचून दाखवल्यानंतर अधिवेशनाच्या कामकाजाला सुरुवात झाली.

सुरुवातीला कोळंबकर यांनी तालिका अध्यक्ष म्हणून भाजपचे चैनसुख संचेती, जयकुमार रावल, शिवसेना शिंदे गटाचे आशीष जयस्वाल, अजित पवार गटाचे माणिकराव कोकाटे यांची निवड जाहीर केली. त्यामुळे या चार जणांना सर्वप्रथम विधानसभा सदस्यत्वाची शपथ देण्यात आली. या चौघांनी मराठीतून शपथ घेतली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शपथ घेतली.

शिंदे यांनी शपथ घेताना बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचे स्मरण केले. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री शपथ घेत असताना सत्ताधारी बाकावरील सदस्यांनी बाके वाजवून स्वागत केले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, जय श्रीराम अशा घोषणा देण्यात आल्या.

विधानसभेचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी शपथ घेतल्यानंतर नाना पटोले यांचे नाव पुकारण्यात आले. त्यावेळी शपथ न घेता महाविकास आघाडीचे सदस्य सभागृहाबाहेर पडले. ईव्हीएमचा मुद्दा उपस्थित करत विरोधी पक्षाच्या आमदारांनी आज शपथ न घेण्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे शपथविधीसाठी सहकुटुंब आलेल्या काही काँग्रेस आमदारांचा हिरमोड झाला.

वळसे पाटील यांच्यानंतर विधानसभेचे माजी अध्यक्ष राहुल नार्वेकर,माजी उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, डॉ. विजयकुमार गावित, गिरीश महाजन, गणेश नाईक, हसन मुश्रीफ, बबनराव लोणीकर, संजय कुटे, सुरेश खाडे, गुलाबराव पाटील, दादाजी भुसे, संजय राठोड, उदय सामंत, धर्मरावबाबा आत्राम, संभाजी पाटील निलंगेकर, दीपक केसरकर, शंभूराज देसाई, रवींद्र चव्हाण, राजकुमार बडोले, आशीष शेलार, अतुल सावे, चंद्रकांतदादा पाटील, धनंजय मुंडे, आदिती तटकरे, माधुरी मिसाळ, सुलभा खोडके, मंदा म्हात्रे, मनीषा चौधरी, देवयानी फरांदे, मोनिका राजळे यांच्यासह १७३ जणांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर सदस्यांनी नोंदवहीत सही करून हंगामी अध्यक्षांशी हस्तांदोलन करत सभागृहात स्थानापन्न झाले.

भाजपच्या गिरीश महाजन, सीमा हिरे, प्रशांत ठाकूर, सुधीर गाडगीळ, नितेश राणे, प्रताप अडसड, राम कदम यांनी संस्कृतमधून, समाजवादी पक्षाचे अबू आझमी, एमआयएमच्या मुफ्ती महम्मद इस्माईल यांनी हिंदीतून तर भाजपच्या कुमार आयलानी यांनी सिंधीतून शपथ घेतली. समाजवादी पक्षाच्या रईस शेख यांच्यासह सर्व सदस्यांनी मराठीतून शपथ घेतली. काही आमदारांनी शपथ घेताना छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे यांचे आवर्जून स्मरण केले.

# अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवत बलात्कार

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ७ :

कोंढवा परिसरात रहाणाऱ्या १६ वर्षीय मुलीस तिच्या ओळखीतील एका २३ वर्षीय तरुणाने ती अल्पवयीन असल्याचे माहिती असताना देखील, तिला लग्नाचे अमिष दाखवून तिच्यावर वेळोवेळी जबरदस्तीने शारिरिक संबंध केले. तसेच ती त्याला भेटायला न गेल्यास तिच्या नकळत काढलेले नग्न फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याने तरुणाच्या त्रासाला कंटाळून पिडित मुलीने आरोपीच्या विरोधात कोंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी या प्रकरणी आरोपी तरुणावर बलात्कार व पोक्सो कायद्यनुसार गुन्हा दाखल केला आहे. आरोपीने पिडित मुलीस ह्यतु मला खूप आवडते, मला तुज्यासोबत लग्न करायचे आहे, असे बोलून तिला लग्न करण्याचे अमिष दाखवले. त्यानंतर वेळोवेळी जबरस्तीने तिच्यासोबत शारिरिक संबंध ठेवले तसेच तिला त्याला भेटायला न गेल्यास तिच्या नकळत काढलेले नग्न फोटो सोशल मिडियावर व्हायरल करण्याची धमकी आरोपीने दिली. याबाबत कोंढवा पोलिस पुढील तपास करत आहे.

अशा प्रकारे हडपसर परिसरात दुसऱ्या घटनेत एका २३ वर्षीय तरुणाने १९ वषार्ची तरुणी ही अल्पवयीन असल्यापासून तिच्यासोबत प्रेमाचा बहाणा करुन जबरदस्तीने शारिरिक संबंध केले त्यामुळे ती नऊ महिन्याची गर्भवती राहिल्यने आरोपीवर हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वानवडी परिसरात रहाणाऱ्या एका कुटुंबातील पित्याने पत्नी ही रात्रपाळी डयुटीला गेलेली असता, राहत्या घरात १४ वर्षीय मुलगी एकटी झोपली असताना तिच्याशेजारी जाऊन झोपला. मुलीच्या शरीरावरुन आक्षेपार्ह हात फिरवून त्याने तिचा विनयभंग केला तसेच घडलेला प्रकार कोणाला सांगितला तर तुला सोडणार नाही अशी तसेच घरात भांडण करेन अशी दमदाटी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पिडित मुलीच्या ३४ वर्षीय आईने पती विरोधात वानवडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## दुसऱ्या टप्प्यात पॉड टॅक्सीची शीव रेल्वे स्थानकापर्यंत धाव

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

वांद्रे रेल्वे स्थानक ते कुर्ला रेल्वे स्थानक असा ८.८ किमीचा पॉड टॅक्सी प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) हाती घेण्यात आला आहे. प्रकल्पाचा हा पहिला टप्पा असून या टप्प्याचे काम २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. अशात आता या प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्याअंतर्गत बीकेसी ते शीव रेल्वे स्थानक असा विस्तार केला जाणार आहे. असे असले तरी पॉड टॅक्सीचा बीकेसी ते शीव रेल्वे स्थानक असा विस्तार झाल्यास त्याचा मोठा फायदा प्रवाशांना होणार आहे.

आंतरराष्ट्रीय दजार्चे आर्थिक केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वांद्रे-कुर्ला संकुलातील वाहतूक कोंडीचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी एमएमआरडीएने अत्याधुनिक अशा पॉड टॅक्सीचा पर्याय स्वीकारला आहे. त्यानुसार कुर्ला रेल्वे स्थानक ते वांद्रे पूर्व रेल्वे स्थानक अशी पॉड टॅक्सी सेवा सार्वजनिक-खासगी सहभागातून विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वयंचलित जलद वाहतूक प्रणालीअंतर्गत ८.८ किमीच्या मार्गाच्या उभारणीचे, देखभाल आणि संचलनाचे कंत्राट हैद्राबादमधील साई ग्रीन मोबिलिटी प्रायव्हेट लिमिटेडला देण्यात आले आहे. या कंपनीने या प्रकल्पासाठी लंडनमधील हिथ्रो विमानतळावर पॉड टॅक्सीची सेवा देणाऱ्या मे. अल्ट्रा पीआरटी कंपनीची मदत घेतली आहे. या दोन्ही कंपन्यांच्या माध्यमातून सध्या प्रकल्पासाठी आवश्यक त्या परवानग्या घेण्याचे काम सुरु आहे. या परवानग्या मिळाल्यास प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल.

## भटक्या श्वानांच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी

■ महासागर प्रतिनिधी
कल्याण, दि. ७ :

टिटवाळा येथे एका गृहसंकुलाच्या परिसरात शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास भटक्या श्वानांनी केलेल्या हल्ल्यात एक साठ वषार्ची महिला गंभीर जखमी झाली. या महिलेची प्रकृती चिंताजनक झाल्याने तिला मुंबईतील जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या महिलेची ओळख पटलेली नाही. ही महिला भिक्षेकरी किंवा कचरा वेचक असण्याची शक्यता प्रत्यक्षदर्शीकडून व्यक्त केली जात आहे. टिटवाळ्यातील रिजन्सी सर्वम गृहसंकुलाच्या मागील बाजुस शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास ६० वषार्ची एक महिला पायी चालली होती. या महिलेला पाहून या भागातील चार भटके श्वान तिच्या अंगावर धाऊन आले. चारही श्वानांनी एकावेळी या महिलेवर हल्ला केल्याने महिला जमिनीवर कोसळली. भटक्या श्वानांनी महिलेचे कपडे, तिच्या शरीराला चावे घेऊन तिला घायाळ केले. या महिलेने सुरूवातीला भटक्या श्वानांच्या तावडीतून सुटण्यासाठी प्रयत्न केले. एकचवेळी चारही श्वान आक्रमकपणे महिलेवर हल्ला करत असल्याने तिला उठणे शक्य झाले नाही. सतरा पर्यटक जखमी या हल्ल्यात गंभीर जखमी झालेली महिला घटनास्थळीच बेशुध्द झाली. भटक्या श्वानांनी या महिलेला ओढत गृहसंकुलाच्या दिशेने नेले.

# डेटिंग ॲपच्या माध्यमातून सायबर भामट्यांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ७ :

सायबर गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने नागरिकांना दररेज कोट्यावधी रुपयांचा गंडा ऑनलाइन घातला जात आहे. मात्र, सायबर गुन्हेगारांना आळा घालण्यास पोलिस यंत्रणा कमी पडत असल्याचे दिसून येत आहे. वेगवेगळ्या माध्यमातून सायबर गुन्हेगार नागरिकांना फसवत असताना आता डेटिंग ॲपच्या माध्यमातून पुण्यातील एका तरुणास ३३ लाख ७८ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणुक करण्यात आली आहे. याप्रकरणी वाघोली पोलिस ठाण्यात आर्थिक फसवणुक व आयटी ॲक्टनुसार अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जस्टीन कोचुकुटील जॉन (वय-३७,रा.वाघोली,पुणे) यांनी याबाबत पोलिसांकडे फिर्याद दिल्यानंतर अज्ञात टेलिग्राम आयडी धारक, वेबलिंक धारक व विविध बँक खातेधारक यांचेवर सदर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांना त्यांचे मित्राने सांगण्यानुसार त्यांनी फॉरेक्स ट्रेडिंग संदर्भाकिरा डेटिंग ॲप मधून संपर्क झालेल्या नमिता नावाच्या तरुणीशी सुरुवातीला बोलणे केले.

तिने तक्रारदा यांना कस्टमर केअरशी गुंतवणुकी बाबत संपर्क करण्यास सांगून तने सांगितल्याप्रमाणे तक्रारदार यांनी टेलिग्राम युजरला संपर्क केला, त्यावेळी त्याने एक वेबलिंग देऊन त्याद्वारे फॉरेक्स ट्रेडिंग बाबतचे ॲडमीरल मार्केटस या पोर्टलवर तक्रारदार याचे नाव, ईमेल, आधार, पॅनकार्ड आदी व्यैक्तिक माहिती अपलोड करण्यास सांगितले.

तक्रारदार यांनी आरोपींनी दिलेल्य लिंकवर क्लिक केली त्यानुसार तक्रारदार यांना फॉरेक्स ट्रेडिंग करन्सी मध्ये गुंतवणुकीवर सुरुवातीस काही रक्कम गुंतवणुक करण्यास सांगून त्याचा थोडाफार परतावा दिल्याचे भासवले.

त्यानंतर त्यांचा विश्वास संपादन करुन मोठ्या प्रमाणात गुंतवणुक करण्यास सांगून विविध बँक खात्यावर पैसे हस्तांतरित करण्यास सांगत त्यांची एकूण ३३ लाख ७८ हजार रुपयांची फसवणुक करण्यात आलेली आहे.

# पर्यटकांच्या टेम्पो ट्रॅव्हल्सला अपघात

## कल्याण डोंबिवलीतील सतरा पर्यटक जखमी

■ महासागर प्रतिनिधी
रत्नागिरी, दि. ७ :

चालकाला डुलकी लागल्याने नियंत्रण सुटून रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडावर पर्यटकांना घेऊन जाणारी टेम्पो ट्रॅव्हल्स जावून आदळली. या अपघातात चालकासह १७ जण जखमी झाले आहेत. कल्याण डोंबिवलीतून गुहागरला जाणाऱ्या टेम्पोला घोणसरे सुतारवाडी येथे हा अपघात झाला.



कल्याण डोंबिवली येथील पोंक्षे परिवारातील १७ जण पर्यटनासाठी ६ डिसेंबरला सकाळी डोंबिवलीतून निघाले होते. त्यांनी १७ आसनी प्रवासी टेम्पो ट्रॅव्हल्स भाड्याने घेतली. ६ डिसेंबरला गुहागरला व्याडेश्वर दर्शन, समुद्राचा आनंद लुटून ही मंडळी संगमेश्वर तालुक्यातील पोंक्षे आंबव येथे जाणार होती.

सायंकाळी ही गाडी पूल ओलांडून घोणसरे सुतारवाडी बसथांब्यापर्यंत आली असता चढ आणि छोटे वाकाणात गाडी आली असता चालकाला डुलकी लागली. आणि त्याचा गाडीवरील ताबा सुटला. ही गाडी रस्त्याच्या डाव्या बाजूला खाली उतरली आणि एका झाडावर जावून आदळली. या धडकेनंतर गाडी जागीच उलटली. चालक आणि प्रवासी फुटलेल्या काचेतून बाहेर पडले.

ही घटना समजल्यानंतर घोणसरे सुतारवाडीतील ग्रामस्थ आणि रस्त्यावरील प्रवाशांनी अपघातग्रस्त गाडीमधील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी धाव घेतली. गाडीतील मागील दरवाजा उघडून १५ प्रवाशांना बाहेर काढण्यात आले.

तातडीने खासगी वाहनांनी सर्वांना चिपळूण येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयातून मिळालेल्या माहितीनुसार १७ प्रवासी व चालक यांच्यापैकी एक महिला व एक पुरुष यांची प्रकृती अधिक गंभीर आहे. अन्य १५ प्रवाशांवर चिपळूण येथेच उपचार सुरू आहेत. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# महाविकास आघाडीत फूट

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :

विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला घवघवीत यश संपादन झाले. गुरुवारी आझाद मैदानावर मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली. शनिवारी विधानमंडळाचे विशेष अधिवेशन घेत सर्व आमदारांना शपथ दिली जाणार असली तरी त्यावर महाविकास आघाडीने बहिष्कार घातला होता. तशा सूचना देखील कालच्या बैठकीत घेण्यात आल्या होत्या.

असे असले तरी महाविकास आघाडीतील घटक पक्ष असणाऱ्या समाजवादी पार्टीच्या अबू आझमी आणि रईस शेख यांनी मात्र विधानसभेत उपस्थित राहून शपथ घेतली.शिवाय त्यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचे संकेत दिले आहेत. याचं खापर त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षावर फोडलं आहे.

राज्यामध्ये येणाऱ्या काळात विविध महानगरपालिका तसेच नगरपालिका मध्ये होणाऱ्या निवडणुकीमध्ये हिंदुत्वाचा मुद्दा पुढे घेऊन जाण्याचा आदेशच उद्धव ठाकरे यांनी आपल्या माजी नगरसेवक यांना दिल्यास मुळे आम्ही नाराज असल्याचे अबू आजमी यांनी माध्यमांशी बोलताना आपला संताप बोलून दाखवला. महाविकास आघाडीच्या घटक पक्षाकडून हिंदुत्वाचा मुद्दा पुढे रेटला जात आहे. त्यातच ६ डिसेंबर रोजी झालेल्या बाबरी मशिद पाडणाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे.

अशा हिंदुत्ववादी विचारधारेच्या पक्षांबरोबर काम करणे आमच्यासाठी अडचणीचे होऊ शकते, असं कारण देत अबू आझमी यांनी महाविकास आघाडीला सोडण्याचे संकेत दिले आहेत. विशेष म्हणजे महाविकास आघाडीच्या आमदारांनी शपथ न घेण्याचा निर्णय घेतल्यानंतरही अबू आझमी यांनी आपल्या विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली.

याबरोबरच महाविकास आघाडीमध्ये असलेल्या घटक पक्षांमध्ये एकंदर ताळमेळ दिसून येत नाही. विधान मंडळातील फ्लोर मॅनेजमेंट विरोधकांना जमत नसल्याचे चित्र देखील आज पहावयास मिळाले. काल झालेल्या निर्णयानंतर देखील शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार विधान भवनात आले होते. याउलट काँग्रेस तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार मात्र सभागृहात बसलेच नाहीत.

# वक्फ बोर्डाचा ३०० एकर जमिनीवर दावा

## लातूरच्या तळेगाव येथील शेतकऱ्यांना बजावल्या नोटीसा

■ महासागर प्रतिनिधी
लातुर, दि. ७ :

वक्फ बोर्डाने लातूरच्या अहमदपूर तालुक्यातील तळेगाव येथील तब्बल 300 एकर जमिनीवर दावा सांगितला आहे. बोर्डाने यासंबंधी येथील 103 शेतकऱ्यांना नोटीसा बजावल्या आहेत. यामुळे या शेतकऱ्यांमध्ये वारसाहक्काने चालत आलेली शेतजमीन आपल्या हातची जाईल का? या विचाराने चिंतेचे वातावरण पसरले आहे.



तळेगाव हे जवळपास 150 उंबऱ्यांचे गाव आहे. येथील सर्वांचा उदरनिर्वाह शेतीवर चालतो. पण आता गावातील जवळपास 75 टक्के शेतजमिनीवर वक्फ बोर्डाने दावा सांगितला आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण औरंगाबादच्या न्यायालयाने वक्फ याचिका क्रमांक 17/ 2024 अन्वये हा दावा केला आहे. तसेच गावातील 103 शेतकऱ्यांना नोटीसही बजावली आहे. या जमिनी आम्ही शेतकऱ्यांना कसण्यासाठी दिल्या होत्या. आता त्यांनी त्या आम्हाला परत द्याव्यात, असे बोर्डाने आपल्या नोटीसीत म्हटले आहे. त्यावर शेतकऱ्यांनी हरकत घेतली आहे. आमच्याकडे अगोदरच एक-दीड एकर जमीन आहे. ती ही वक्फ बोर्डाने घेतली तर आम्ही करायचे काय? असा सवालवजा युक्तिवाद त्यांनी या प्रकरणी केला आहे.

आम्ही मागील तीन ते चार पिढ्यांपासून शेती करतो. पण आता वक्फ बोर्डाने आमच्या जमिनीवर दावा सांगितला आहे. आमचा उदरनिर्वाह शेती व शेतमजुरीवरच अवलंबून आहे. त्यामुळे ही जमीन आमच्या हातची गेली तर आम्ही जगावे तरी कसे? आता शासनानेच योग्य ती कारवाई करून आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी या गावकऱ्यांनी केली आहे.

शेतकऱ्यांनी यासंबंधी आपल्याकडील संपूर्ण दस्तावेज दाखवलेत. त्यांच्याकडे निजामकालीन दस्तावेजही आहेत. पण वक्फ बोर्डाच्या या नोटीसीमुळे गावकरी पुरते धास्तावलेत. त्यांनी या नोटीसींना एका वकिलामार्फत संयुक्तपणे उत्तर दिले आहे. त्यावर येत्या 20 डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे एका शेतकऱ्याने यासंबंधी हैदराबादचे गॅझेट दाखवले. बिदर हा जिल्हा होता तेव्हापासूनच दस्तावेज आमच्याकडे आहेत. तेव्हा आमच्या पूर्वजांनी ही जमीन खरेदी केली होती. ती जमीन वक्फ बोर्ड कसा काय आमच्याकडून परत घेऊ शकतो? असा सवाल या शेतकऱ्याने उपस्थित केला आहे. दरम्यान, संसदेत वादग्रस्त वक्फ कायद्याविरोधातील एक विधेयक मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत.

# मेट्रो ९ च्या कामादरम्यान सिमेंट मिक्सर ऑपरेटरचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

दहिसर ते मीरारोड मेट्रो ९ मार्गिकेतील मिरागाव मेट्रो स्थानकाच्या कामादरम्यान बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास एक दुर्घटना घडली. या दुर्घटनेत सिमेंट मिक्सर ऑपरेटरचा मृत्यू झाला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडी) कंत्राटदार जे. कुमारला ३० लाखांचा दंड ठोठावला आहे. तर सल्लागार कंपनीला १० लाखांचा दंड आकारला आहे. त्याचवेळी मृताच्या नातेवाईकांना तातडीने दोन लाखांची मदत दिली असून या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्वतंत्र चौकशी समितीची स्थापन केली आहे.

एमएमआरडीएकडून मेट्रो ९ चे काम सुरु आहे. बुधवारी रात्री साडेदहा वाजता मिरागाव मेट्रो स्थानकातील आव्हानात्मक काम सुरु होते. या कामादरम्यान सिमेंट मिक्सर बाजूच्याच खोदलेल्या एका खड्डयात पडला. कंत्राटदार आणि एमएमआरडीएकडून तात्काळ बचावकार्य सुरु करत ऑपरेटरला बाहेर काढले. या दुर्घटनेत सिमेंट मिक्सर ऑपरेटर गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या दुर्घटनेची गंभीर दखल घेत महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी कंत्राटदार जे. कुमारला १० लाख रुपये तर सल्लागार मे. सिस्त्रा कन्सोर्टियम कंपनीला १० लाखांचा दंड ठोठावला आहे.

प्रत्येक प्रकल्पाच्या कामादरम्यान शून्य अपघाताचे धोरण निश्चित करत या धोरणाच्या कठोर अंमलबजाणीचे निर्देश सर्व कंत्राटदारांना दिले आहेत. असे असताना या प्रकल्पात ही दुर्घटना घडल्याने कंत्राटदार आणि सल्लागाराविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तर या प्रकरणाच्या चौकशीसाठी एक स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली असून या समितीच्या अहवालानंतर दोषींविरोधात कारवाई करण्यात येणार आहे.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत नागपूर राज्यात आघाडीवर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. ७ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला नागपूर जिल्हात उत्तम प्रतिसाद मिळाला आहे, नागपूर जिल्ह्यातील एकूण 11,327 वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्या कडील प्रकल्पाची एकूण स्थापित क्षमता तब्बल 46.15 मेगावॅट आहे. या योजनेचा लाभ घेणार-या राज्यातील एकूण ग्राहकांमध्ये नागपूर जिल्ह्यातील तब्बल 18.53 टक्के ग्राहकांचा समावेश आहे.

या योजनेत नागपुर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना 85.67 कोटी रुपयांचे अनुदान मंजूर होऊन त्यापैकी 65.42 कोटी रूपयांचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात वळते करण्यात आले आहे तर ऊर्वरीत लाभार्थ्यांच्या खात्यात हे अनुदान वळते करण्याची प्रक्रीया सुरु आहे.



महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या या योजनेत विदर्भात महावितरण अंतर्गत नागपूर जिल्ह्याने (11,327) आघाडी घेतली आहे. त्याखालोखाल अमरावती (4,196), अकोला (1,878), वर्धा (1,773) बुलढाणा (1,629), चंद्रपूर (1,343), यवतमाळ (1,336), भंडारा (1,026), गोंदीया (761), वाशिम (599) आणि गडचिरोली (571) यांचा क्रम लागतो. या योजनेत विदभार्तून आतापर्यंत 1,03,935 ग्राहकांनी अर्ज केले असून त्यापैकी 26,439 वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. त्यांची एकूण स्थापित क्षमता 106,91 मेगावॅट आहे व त्यांना 205.90 कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले असून त्यापैकी 165.41 कोटी रुपयांच्या अनुदानाची रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

याशिवाय विदर्भात 75,729 वीज ग्राहकांकडे ही संयत्रे लागण्यास सज्ज असून 913 ग्राहकांकडील कामे अंतिम टप्प्यात आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत केंद्र सरकारकडून छतावरील सौर ऊर्जा निर्मितीचे रूफ टॉप सोलर प्रकल्प बसविणाऱ्या वीज ग्राहकांना एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला 30 हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला 60 हजार रुपये व तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या प्रकल्पाला 78 हजार रुपये अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या सौर यंत्रणेतून दरमहा सुमारे 120 युनिट वीज तयार होते.

गरजेपेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीज बिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज महावितरणला विकता येते छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पात निर्माण झालेली वीज घरामध्ये वापरायची, प्रकल्पात गरजेपेक्षा अधिक वीज निर्माण झाल्यामुळे वीजबिल शून्य येते तसेच अतिरिक्त वीज महावितरणला विकता येते याशिवाय, सौर ऊजेर्मुळे पर्यावरण रक्षणाला मदत होते तसेच ग्राहकांनाही आर्थिक लाभ होतो.

फेब्रुवारी महिन्यात ही योजना सुरू झाल्यापासून राज्यात आतापर्यंत 69,118 वीज ग्राहकांकडे छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविले आहेत.

त्यांची एकूण वीजनिर्मिती क्षमता 273,72 मेगावॅट असून त्यांना 567.93 कोटी रुपये अनुदान मंजूर झाले असून त्यापैकी 465.65 कोटी रुपयाचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. याशिवाय, राज्यात आतापर्यंत 3 लाख 8 हजार 901ग्राहकांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

ग्राहकाच्या वीज आणि पैसे बचतीसोबतच पर्यावरण पुरक असलेल्या पंतप्रधान सुर्यघर- मुफ्त बिजली योजनेत सहभागी होऊन महावितरणच्या रुफ टॉप सोलरचा लाभ अधिकाधिक ग्राहकांनी घेण्यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज । संकेतस्थळावर नोंदणी करायची आहे, या योजनेत सहभागी होण्याची संपुर्ण माहिती या संकेतस्थळावर दिलेली असून तेथील अर्ज स्विकृतीनंतर महावितरणच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक असल्याची माहिती महावितरणने दिली आहे.

# २ फरार आरोपी गुन्हे शाखेच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. ७ :

गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने वेगवेगळ्या कारवाईमध्ये 2 फरार गुन्हेगारांना अटक केली. विशेष म्हणजे दोघांविरुद्धही खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा नोंद होता. शुक्रवारी गुन्हे शाखेचे पथक तहसील ठाण्यांतर्गत गस्तीवर होते. या दरम्यान पारडी ठाण्यात नोंद खुनाच्या प्रयत्नात फरार आरोपी राजा भुरा रोडे (31) रा. श्यामनगर, पारडी हा इतवारी परिसरात फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पथकाने तत्काळ इतवारी परिसर गाठले आणि घेराबंदी करून राजाला ताब्यात घेतले. चौकशीत त्याच्याविरुद्ध तीन महिन्यांपूर्वी खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा नोंद झाल्याची माहिती मिळाली. तेव्हापासून तो पोलिसांपासून वाचत फिरत होता. पुढील कार्यवाहीसाठी राजाला पारडी पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. दुसरी कारवाई बालाघाट येथे जाऊन करण्यात आली. मंगेश उर्फ दादा तातोराव सावरकर (43) रा. मिर्ची बाजार चौक, इतवारी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. मंगेशविरुद्ध अकोलाच्या खदान पोलिस ठाण्यात खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा नोंद आहे. या प्रकरणात तो पोलिसांना गुंगारा देत फिरत होता. तो सतत त्याचे राहण्याचे ठिकाण बदलत असल्याने पोलिसांना त्याचा सुगावा लागत नव्हता.

युनिट 5च्या पथकाला तो बालाघाट येथे लपून असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारावर तत्काळ एक पथक बालाघाटसाठी रवाना करण्यात आले. पथकाने सापळा रचून मंगेशला अटक केली. पुढील कार्यवाहीसाठी त्याला अकोला पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले आहे.

# संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराजांचा जन्मोत्सव सोहळा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. ७ :

संताजी ब्रिगेड तेली समाज महासभेच्यावतीने संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराजांच्या जन्मोत्सव सोहळा येत्या रविवारी 8 डिसेंबर रोजी, संत जगनाडे महाराज स्मारक जगनाडे चौक नंदनवन नागपूर येथे आयोजित करण्यात आलेला आहे. संताजी ब्रिगेड तेली समाज महासभा महाराष्ट्र तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही 400 वी, संत जगनाडे महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करणार आहे.

सर्वप्रथम संत जगनाडे महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाला सुरुवात होईल. अध्यक्ष विजय हटवार यांनी पत्रपरिषदेत माहिती दिली की, याप्रसंगी कार्यक्रमात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष



तथा आमदार चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णाजी खोपडे, आमदार अभिजीत वंजारी, आमदार रामदासजी आंबटकर आणि माजी आमदार टेकचंद सावरकर यांची प्रमुख उपस्थिती राहतील. हनुमान मंदिर पारडी ते संत जगनाडे महाराज स्मारक जगनाडे चौक नंदनवन येथे सकाळी ९ वा . पासून भव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भव्य शोभायात्रेत समाज बांधवांनी जास्तीत जास्त मोठ्या संख्येने सकाळी ८ वा. उपस्थित राहण्याचे आवाहन विजय हटवार यांनी केले आहे.

तसेच याप्रसंगी लहान मुलांसाठी समर कॅम्प, महिला मेळावा, रोजगार उपक्रम, ओबीसी समाज सरकारी योजना माहिती केंद्र, रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे.

१० वाजतापासून भव्य महाप्रसादाला सुरुवात होईल, अशी माहिती अध्यक्ष विजय हटवार, सचिव अजय धोपटे यांनी माहिती दिली. यावेळी प्रतीक बावणकर, दीपा हटवार, चित्रा माकडे आणि नंदू धोपटे यांची उपस्थिती होती.

# मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठी कॉंग्रेसचे शंखनाद आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. ७ :

लोकशाहीत मतदान हे महत्वाचे अस्त्र आहे. परंतु अलिकडे भारतात सर्वसामान्यांचे हे अस्त्रच बोथट करण्यात आल्याचा आरोप होत आहे. ईव्हीएमच्या माध्यमातून केवळ नावापुरती मतदान प्रक्रिया राबवण्यात येत आहे. ही लोकशाहीची हत्या आहे. त्यामुळे ईव्हीएमद्वारे निवडणुका घेणे बंद करून मतपत्रिकेवर निवडणुका घेतल्या जावे, अशी मागणी कॉंग्रेस विचार जगजागृती अभियानाने केली आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांनी नागपुरातील व्हेरायटी चौकात निदर्शने केली.



कॉंग्रेस विचार जगजागृती अभियानतर्फे महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर निदर्शने करण्यात आली. विधानसभा निवडणुकीत अनेक ठिकाणी ईव्हीएममधील मते आणि प्रत्यक्ष झालेले मतदान हे वेगेवगळे आढळून आले. तसेच रात्रीच्या वेळी अचानक मतदानाची टक्केवारी वाढली. त्यामुळे ईव्हीएमवर प्रश्न निर्माण झाले आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर ६ महिन्यांपासून राज्यात विधानसभा निवडणुका घेण्याचे धाडस भाजप दाखवत नव्हती. म्हणूनच निवडणुकीची तारीख पुढे ढकलण्यात आली.

पण महायुतीविरोधी वातावरण असतानाही अचानक प्रचंड एकतर्फी बहुमत महायुती आणि त्यातही भाजपला कसे काय मिळाले, असा सवालही अभियानच्या पदाधिकाऱ्यांनी केला. या आंदोलनात संघटनेचे समन्वयक तनवीर अहमद, प्रवक्ते ॲड. शिरीष तिवारी, माजी नगरसेवक वासुदेव ढोके सहभागी झाले होते.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे पती परकला प्रभाकर यांनी ईव्हीएम मध्ये ७६ लाख मतांच्या वाढीबद्दल आश्चर्य व्यक्त केले होते.

अभिनेत्री स्वरा भास्कर यांनीही विचारले की, तीन दिवसांनंतरही ईव्हीएम ९९ टक्के चार्ज कशी काय होती? त्यामुळेच ईव्हीएम फॉर्म क्रमांक १७ सी पेक्षा जास्त मते दाखवत होते. यावरून हे समजते की भाजपचा एकतर्फी विजय हा लाडकी बहीण योजनेचा नसून लाडक्या ईव्हीएमचा चमत्कार आहे.

एका उमेदवाराला त्याच्या गावातही मते मिळाली नाहीत, मनसेच्या उमेदवाराला फक्त दोन मते मिळाली, कुठे दोन्ही उमेदवारांना समान मते मिळाली, तर कधी एकूण मतांची संख्या मतदानापेक्षा जास्त होती, ही लोकशाहीची निव्वळ हत्या आणी संविधानाशी खेळ असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

# संत जगनाडे महाराज जयंती शासकीय कार्यालयात साजरी करावी : डॉ. निखिल भुते

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. ७ :

महाराष्ट्र शासनाने डिसेंबर २०१८ मध्ये काढलेल्या परिपत्रकानुसार राष्ट्रपुरुष थोर व्यक्ती यांच्या जयंती व राष्ट्रीय दिन प्रत्येक शासकीय कार्यालयात साजरे करण्याचे निर्देश दिले आहे, श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती रविवार दि. ८ डिसेंबरला २०२४ सर्व शासकीय कार्यालयात साजरी करावी अशी मागणी स्वातंत्र्य संग्राम सेनानी स्व. भैयाज्जी भुते स्मृती सेवा संस्थांचे अध्यक्ष डॉ. निखिल भुते यांनी सामाजिक संस्थेच्या वतीने केली आहे.



महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाने २६ डिसेंबर २०१८ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्याचे निर्देश दिले आहेत नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यात शासकीय व निमशासकीय कार्यालयात तसेच शैक्षणिक संस्थानी संत संताजी जगनाडे महाराज यांचे विचार आणि साहित्य हे प्रेरणादायी आहे आज समाजात घडत असलेल्या अनुसूचित घटना लक्षात घेता समाजाला खऱ्या अथार्ने संत विचारांची गरज आहे महाराजांची जयंती साजरी करण्यासाठी अधिकृत फोटोचा वापर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली आहे.

तसेच स्वातंत्र्य संग्राम सेनानी स्व.भैय्याजी भुते स्मृती सेवा संस्था आणि विविध सामाजिक, अध्यात्मिक, शैक्षणिक संस्था द्वारा श्री. संत संताजी जगनाडे महाराज यांच्या ४०० व्या जयंती कार्यक्रम, श्री संत संताजी महाराज स्मारक, जगनाडे चौक, नंदनवन नागपूर येथे ८ डिसेंबर २०२४ ला, वेळः- सकाळी ९.०० वाजता साजरी करण्याचे ठरविले आहे, तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

# वाहन चोर गुन्हे शाखेच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. ७ :

गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने गस्तीदरम्यान वेगवेगळ्या कारवाईमध्ये दोन वाहन चोरांना चोरीच्या मोटारसायकलवर फिरताना पकडले. दोघांनाही अटक करून चोरीचे वाहन जप्त केले.

विशाल अशोक गजभिये (28) रा. अशोकनगर, कन्हान आणि शुभम ज्ञानेश्वर वानखेडे (29) रा. सद्गुरूशरण सोसायटी, वाडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. युनिट 5 चे पथक जरीपटका ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. यादरम्यान मेकोसाबाग पुलाजवळ पोलिसांना विशाल एमएच-49/एस-1933 क्रमांकाच्या मोटारसायकलवर फिरताना दिसला. पोलिसांनी त्याला थांबवून कागदपत्रांची मागणी केली असता तो घाबरला. त्याला ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्याने कळमनाच्या नागपूर पार्क परिसरातून मोटारसायकल चोरी केल्याची माहिती दिली. पोलिसांनी कळमना पोलिसांशी संपर्क करून खात्री पटवली असता ठाण्यात फिर्यादी राजेंद्रसिंग कर्नलसिंग जगदे (24) रा. बाबा जगदीप सिंगनगर, उप्पलवाडीच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंद असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी विशालला अटक केली. ही कारवाई सुरू असतानाच मेकोसाबाग हचिंग स्कूलसमोरून आरोपी शुभम हा विनानंबर प्लेटच्या मोटार सायकलवर जाताना पथकाला दिसला. त्याला ताब्यात घेऊन सखोल विचारपूस केली असता त्याने चोरी केल्याची कबुली दिली.

# पुरस्कार-विजेत्या रीलद्वारे एसएसपीएडी विद्यार्थी निवडणूक जागृतीत नेतृत्व

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. ७ :

एसएसपीएडी च्या संचालिका डॉ.नंदिनी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सिम्बायोसिस स्कूलऑफ प्लॅनिंग आर्किटेक्चर अँड डिझाईन एसएसपीएडी नागपूरच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा त्यांच्या सर्जनशीलतेचे प्रदर्शन केले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी आयोजित "महाराष्ट्राची निवडणूक जागृती" रील मेकिंग स्पर्धा महाराज नागपूर विद्यापीठाचे ललित कला विभाग आणि हॉबी सेंटर प्रतिभावान एसएसपॅड टीम विदिशा हितेंद्र आटे, वंशिका गुप्ता, मधुरा बालाजी कुंभार, आणि आराधिका अविनाश पाटील मार्गदर्शक प्रथमेश वालीओकर यांच्या मार्गदर्शनाखाली, मतदानाच्या महत्त्वावर भर देणारी



एक विचारप्रवर्तक रील तयार केली. रीलचे नाविन्यपूर्ण कथाकथन आणि प्रभावशाली संदेशवहन, प्रेक्षकांमध्ये नागरी जबाबदारीला प्रेरणा देणारे आणि सोशल मीडियावर छाप पाडणारे आहे.

एसएसपॅडच्या संचालिका डॉ. नंदिनी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला. एसएसपॅड मध्ये, आम्ही उद्देशाने सर्जनशीलतेचे पालनपोषण करतो. एसएसपॅड प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहे, जी सर्जनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची जोड देते, विद्यार्थ्यांना त्यांच्या समुदायांमध्ये बदल घडवणारे म्हणून उत्कृष्ट बनण्यासाठी तयार करते.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **VANSHITA SUNDRANI.** NOW MY NEW NAME IS **HEMA SUNDRANI.** ADD : SANT KAWARRAM WARD TIRORA GONDIA


# शंभर दिवसीय क्षयरोग दुरीकरण मोहिमेचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ७ :

नागपूर महानगरपालिका व शहर क्षयरोग अधिकारी कार्यालय, नागपूर आरोग्य विभागातर्फे टी. बी. मुक्त भारत अभियान अंतर्गत '१०० दिवसीय क्षयरोग दुरीकरण मोहीम' कार्यक्रमाचा मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांच्या हस्ते शनिवारी (ता.७) शुभारंभ झाला. सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल होत्या. त्यांनी 'निक्षय वाहनाला' हिरवी झेंडी दाखविली. यावेळी सर्व उपस्थितांनी "टी. बी. मुक्त भारत" ची शपथ घेतली.




यावेळी मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, अतिरिक्त मुख्य वैद्यकीय अधिकारी, एसटीडीसी डॉ. ज्योती मडावी, अति. जिल्हा क्षयरोग अधिकारी जिल्हा परिषद, डॉ.सिंग, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. शिल्पा जिचकार, मेयो आरइएसपी मेडिकल विभाग प्रमुख डॉ. राधा मुंजे, मेयोचे डॉ. सुशांत, डब्ल्यूएचओ सल्लागार डॉ. संकेत नांदेडकर, आरोग्य अधिकारी डॉ. नदीम खान, मनपा झोनल वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपांकर भिवगडे, डॉ. सुनील कांबळे, डॉ. अतीक खान, डॉ. ख्वाजा मोईनुद्दीन, डॉ. विजयकुमार तिवारी, डॉ सुलभा शेंडे, डॉ. वर्षा देवस्थळे, डॉ. वसुंधरा भोयर, डॉ. शीतल वंदिले, डॉ. सुलभा शिंदे यांच्यासह इतर आरोग्य अधिकारी व कर्मचारी, सामाजिक संस्थांचे प्रमुख उपस्थित होते.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत नागपूर महानगरपालिकेतर्फे १०० दिवसीय क्षयरोग शोध मोहिम राबविण्यात येणार आहे. ही मोहिम ७ डिसेंबर २०२४ ते २४ मार्च २०२५ (जागतिक क्षयरोग दिन) पर्यंत राबविण्यात येणार आहे. क्षयरोग दुरीकरणासाठी सतत प्रयत्न केले जातात. शंभर दिवस 'निक्षय वाहन' नागपूर शहरातील विविध भागात जाऊन जनजागृती करतील.

केंद्र सरकारची "१०० दिवसीय क्षयरोग दुरीकरण मोहीम" शहरात राबविण्यात येणार असून आपण सर्व क्षयरोग मुक्त भारत करण्यात योगदान देऊया. सर्व आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले असून ठिकठिकाणी अतिजोखीमग्रस्त भागात जाऊन क्षयरोगाविषयी जनजागृती करण्याचे आवाहन यावेळी अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी केले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या मार्गदर्शनामध्ये वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांच्या नेतृत्वात क्षयरोग दुरीकरण मोहिमेला सुरूवात झाली.

शहर क्षेत्रातील जास्तीत जास्त क्षयरुग्ण शोधून त्यांना उपचारावर आणणे, क्षय रुग्णांचा मृत्यूदर कमी करणे, नवीन क्षयरुग्णांचे प्रमाण कमी करणे, वंचित व अतिजोखमीच्या घटकापर्यंत पोहोचून आरोग्य सेवा पुरविणे, क्षयरोग विषयी जनजागृती करणे, समाजामधील क्षयरोग विषयी जनजागृती करणे व सामाजिक कलंक कमी करण्यासाठी उपक्रम राबविणे, म.न.पा.तील संमती दिलेल्या क्षयरुग्णांना पंतप्रधान क्षयमुक्त भारत अभियानाअंतर्गत निक्षय मित्र यांचेकडून पोषण आहार किटचे वाटप करणे, हा या मोहीमेचा उद्देश आहे.

क्षयरोगाचे कारण, त्याचे निदान, क्षयरोगामुळे होणारे मृत्यूदर कमी करणे, रुग्णाला पोषक आहार मिळणे हे या मोहिमेचे मुख्य उद्देश्य आहे. अति जोखीम ग्रस्त भागात ठिकठिकाणी जाऊन निक्षय शिबीर राबवून आरोग्य अधिकारी, यूपीएचसी, आमदार, नगरसेवक, सामाजिक संस्था, निक्षय मित्र, युवा वर्ग या सर्वांची मदत घेऊन क्षयरोगाविषयी जनजागृती करून त्यावर मात करणे अत्यंत गरजेचे आहे. १०० दिवस क्षयरोग मोहीम कार्यक्रमाची रुपरेषा यावेळी मांडण्यात आली.

माइक्रो प्लानिंग आणि मॅपिंगच्या मदतीने क्षयरोग समूळ नष्ट करण्यात मदत होईल. यात जनभागीदारी देखील महत्वाची आहे असे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी सांगितले. यावेळी त्यांनी मोहिमेचा उद्देश व अति जोखमिचे गट जसे ६० वर्षावरील व्यक्ती, मधुमेह असणाऱ्या व्यक्ती, धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती, यापूर्वी क्षयरोगाचा उपचार घेतलेल्या व्यक्ती, क्षयरुग्णाच्या संपकार्तील घरातल्या व्यक्ती, एच.आय.व्ही. बाधित व्यक्ती इत्यादी विषयी सविस्तर माहिती सांगितली.

क्षयरोग असलेल्या रुग्णाकरिता पोषण आहार अत्यंत महत्वाचा आहे. नागपूर महानगरपालिकेतर्फे १४००० फूड बास्केट क्षयरोग असलेल्या रुग्णांना देण्यात आल्या, अशी माहिती शहर क्षयरोग अधिकारी डॉ. शिल्पा जिचकार यांनी दिली.

१०० दिवसीय क्षयरोग दुरीकरण मोहिम देशभरातील निवडलेल्या ३४७ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. यामध्ये नागपूर मनपाचा समावेश आहे. १०० दिवसीय क्षयरोग शोध मोहीमेमध्ये सर्व मनपाचे दवाखाने, प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र याअंतर्गत येणारे जोखीमग्रस्त भागामध्ये सर्वेक्षण व क्षयरोगविषयक जनजागृती करण्यात येणार आहे.

निक्षय शिबीर, अनाथाश्रम, वृध्दाश्रम, उद्योग संस्था, निवासी शाळा, कारागृह, येथे क्षयरोग तपासणी शिबिर व स्थलांतरीत, उच्च जोखीमग्रस्त भाग व वंचित घटक यांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी मनपा स्तरावर नियोजन करण्यात आले आहे. सदर मोहिम राबविण्याकरिता लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते व इतर विभाग यांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. डॉ. सदफ खतीब यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. श्रीमती संगीता शिंगने आणि उत्तम मधुमटके हे कार्यक्रमाचे समन्वयक होते.

## जाहीर सूचना

कोर्ट विद्यमान सुनिल साळवे, नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे कार्यालय, जिल्हा नागपूर

तहसिल कार्यालय इमारत खोली क्र. ५. आकाशवाणी चौक, सिव्हिल लाइन्स, नागपुर- ०१

Email ID www.tahsildarngpcity@gmail.

Tel.No 0712-2561975

कली/प्रस्तु/तह.नाग (शहर)/प्र.क्र.३१/ कावि - ३२१/२०२४ दिनांक ०१/०८/२०२४

प्रति,
निबंधक, जन्म मृत्यू विभाग, नागपूर महानगरपालिका नागपुर


विषय :- जन्माची नोंद घेणेकामी जन्म मृत्यू अधिनियम कलम १३(३) अन्वये प्राप्त अर्जावर सुनावणीस उपस्थित राहणेबाबत.

सदर्भ: रबीया बशरी D/O शेख सलीम वय-२२, धंदा -गृहीणी रा. प्लॉट नं २३, गल्ली नं. ३ महेन्द्रा नगर, नागपुर यांचा अर्ज दिनांक १३/०६/२०२४

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय अर्जान्वये ज्या जन्माची किवा मृत्यूची तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्यांची नोंदणी जन्माचा किवा मृत्यूचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करुन पाहिल्यानंतर प्रथम वर्ग दंडाधिकारी किवा इलाखा शहर दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरुन करण्यात येते. सबब जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये संदर्भिय अर्ज या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. सदर अँवर दिनांक २६/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, नागपूर शहर यांचे कक्षात सुनावणी घेण्यात येणार असून उक्त अर्जावर आपले म्हणने सादर करणेकामी उक्त नमूद दिनांकास न चुकता उपस्थित राहावे, अन्यया आपले काहीही महणणे नसून संदर्भिय अर्जासमवेत जोडण्यात आलेल्या दस्ताऐवजाची तपासणी करुन जन्माची नोंद घेणेकामी आदेश देण्यास आपली काहीही हरकत नाही असे समजून नियमानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल याबाबत नोंद घ्यावी.

(सुनील साळवे)
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर

# बाबरी विध्वंस.... शिक्षा कुणालाच नाही!



६ डिसेंबर हा तसा महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन . तथापि, १९९२ मध्ये याच दिवशी अयोध्येतील शेकडो वर्षे जुनी बाबरी मशिद पाडण्यात आली. या घटनेला ३२ वर्षाचा काळ लोटला. कितीतरी समित्या आणि आयोग गठीत झाले. तपासाचा कीस पाडला गेला. हजारो कोटी रूपये या आयोगावर खर्ची पडले. सर्वोच्च न्यायालयापर्यंत प्रकरण गेले. अनेक वर्षे रेंगाळत राहिले आणि सर्वोच्च न्यायालयानेही निर्णय दिलेत. आता तेथे राममंदिर उभे आहे. बाबरी मशिद पाडण्याच्या या कृत्यात कुणालाही आजवर शिक्षा झाली नाही.

---------------

3 डिसेंबर 1992 रोजी सायंकाळचे साडेचार वाजले होते. अयोध्येतील बाबरी मशिदीजवळ काही पत्रकार मंचावर पोहोचले. तेथे कूपनलिका बसविण्यात आली. पाइपलाइन टाकण्यासाठी कारसेवक खड्डा खोदत होते. ज्या ठिकाणी सेवा होणार होती तेथे पाणी पोहोचवावे लागणार होते. तर सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती. म्हणजे वादग्रस्त रचनेच्या आवारात काहीही होऊ शकत नाही.

पत्रकारांनी कारसेवकांना विचारले, तुम्ही जे करत आहात त्यासाठी काही आदेश आहे का? हे ऐकून कारसेवक संतापले. गर्दी टाळून पत्रकारांनी जिल्हा न्यायाधीश प्रेमशंकर गुप्ता यांच्याकडे धाव घेतली. प्रेम शंकर यांची सर्वोच्च न्यायालयाने नियुक्ती केली होती. त्यांनी तातडीने डीएमला फोन करून घटनास्थळ गाठले.

कारसेवक काही ऐकायला तयार नव्हते. विध्वंसाच्या ३-४ दिवस आधीपासून त्यांची देहबोली वेगळी होती. यावेळी ही रचना क्वचितच टिकेल असे वाटत होते. कारसेवक कोणाचेही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते, वास्तू पाडायची म्हणजे पाडायचीच, असाच त्यांचा निर्धार दिसत होता.

ज्येष्ठ पत्रकार व माजी माहिती आयुक्त नरेंद्र सांगतात, ६ डिसेंबर १९९२ रोजी अनेक कारसेवक पत्रकारांवर रागावले. अनेक पत्रकारांनाही मारहाण करण्यात आली. कारसेवक बाबरी ढाचा पाडण्याच्या उद्देशाने आले होते. कारसेवकांनी मारहाण सुरू केल्यावर सर्व पत्रकार मानस भवनात घुसले. विश्व हिंदू परिषदेचे कार्यालय या मानस भवनात होते. अनेक पत्रकारांनी विहिंपचे बॅज आणि रामनामी गमछे घालून स्वतःला वाचवले.

बाबरी विध्वंस प्रकरणाशी संबंधित ज्येष्ठ वकील इंद्रभूषण सिंह म्हणतात की, 6 डिसेंबरपर्यंत 4-6 लाख कारसेवक अयोध्येत आले होते. बहुतेक कारसेवक दक्षिण भारतातील किंवा महाराष्ट्र-राजस्थानमधील होते. राज्य सरकारला न विचारता केंद्र सरकारने सीआरपीएफच्या अनेक बटालियन पाठवल्या होत्या. ही बटालियन फैजाबादच्या डोग्रा रेजिमेंटमध्ये राहिली. सीआरपीएफ पाठवल्यामुळे लोक संतप्त झाल्याचे राज्य सरकारने म्हटले आहे.

6 डिसेंबरला सकाळी कारसेवकांना रामजन्मभूमी संकुलात शरयू, पाणी आणि वाळू वापरून पूजा करायची होती. म्हणूनच ते शरयू येथून पाणी आणि वाळू आणत होते. अयोध्येच्या वादग्रस्त वास्तूपासून रामकथा कुंज 300 मीटर अंतरावर होती. तेथे भाजप-विहिंपची बैठक सुरू होती. या बैठकीला लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, उमा भारती, साध्वी ऋतंभरा, अशोक सिंघल असे अनेक बडे नेते उपस्थित होते. विजया राजे सिंधियाही सकाळी आठच्या सुमारास पोहोचल्या.

विजया राजे वादग्रस्त वास्तूसमोर बांधलेल्या व्यासपीठावर गेल्या, जिथे लोक पूजा करत होते. तोपर्यंत सगळं ठीक होतं. ते सांगतात की, अचानक 12.05-7 मिनिटांनी लोक संतापले. ज्वालामुखी फुटल्यासारखे वाटले. बाबरी संरचनेच्या संरक्षणासाठी चारही बाजूंनी जाड लोखंडी पाईप बसवण्यात आले. या पाईप्सच्या साहाय्याने 8-10 फूट उंचीपर्यंत दाट काटेरी तारांचे जाळे बसवण्यात आले. तीन भिंती बांधल्या.

पंधरा मिनिटांत जनतेने पाडाव सुरू केला. भिंती पाडून लोखंडी पाईप्स उखडले. दीडच्या सुमारास पहिला घुमट तुटून एक भाग कोसळला. ५ वाजेपर्यंत लोकांनी बांधकाम पाडून सर्व माती व विटा नेल्या. तेथे कोणतेही अवशेष शिल्लक नव्हते. ६ वाजेपर्यंत पूर्ण शांतता होती.

बीबीसीचे ज्येष्ठ पत्रकार रामदत्त त्रिपाठी सांगतात, त्यावेळी यूपीमध्ये भाजपचे कल्याण सिंह सरकार होते. अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम न केल्यामुळे बाबरी ढासळली. यूपी सरकारच्या वतीने मुख्यमंत्री कल्याण सिंह यांनी सुप्रीम कोर्टात संरचनेच्या सुरक्षेबाबत लेखी आश्वासन दिले होते.

भाजपच्या वतीने विजयाराजे सिंधिया यांनीही या वास्तूचे कोणतेही नुकसान न करण्याचे लेखी आश्वासन दिले होते, तरीही ही इमारत पाडण्यात आली.रामजन्मभूमी एसओ प्रियमवदा नाथ शुक्ला यांनी या प्रकरणी पहिला एफआयआर क्रमांक 197/1992 दाखल केला.

त्यात म्हटले होते की, लाखो कारसेवकांनी अचानक बाबरी वास्तूवर हल्ला करून वास्तू उद्ध्वस्त केली. त्याच्यावर दरोडा, लूटमार आणि धर्माच्या आधारे शत्रुत्व भडकवण्याचे आरोपही होते.

या प्रकरणातील दुसरा एफआयआर क्रमांक 198/1992 रामजन्मभूमी पोलीस ठाण्यात एसआय गंगा प्रसाद तिवारी यांनी दाखल केला होता. 8 जणांची नावे सांगून ते भडकाऊ भाषणे करत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे जनता भडकली आणि बाबरीचा ढाचा पाडला.

पत्रकार रामदत्त त्रिपाठी म्हणतात की एफआयआर क्रमांक 198/1992 दाखल झाल्यानंतर नामित आरोपींना अटक करण्यात आली. या आरोपींना माता तीळा धरणाच्या गेस्ट हाऊसमध्ये ठेवण्यात आले होते. कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून फैजाबादमध्ये खटला चालवणे शक्य नव्हते. त्यामुळे ललितपूर येथे विशेष न्यायालय करण्यात आले. नंतर हे प्रकरण रायबरेली येथे वर्ग करण्यात आले.

या दोन मुख्य एफआयआर व्यतिरिक्त आणखी 47 एफआयआर नोंदवण्यात आल्या आहेत. यातील बहुतांश प्रकरणे पत्रकारांवरील हल्ल्याशी संबंधित आहेत. म्हणजेच ६ डिसेंबर १९९२ च्या घटनेशी संबंधित एकूण ४९ एफआयआर नोंदवण्यात आले. त्या दिवसापासून 14 मार्च 1993 पर्यंत या सर्व प्रकरणात एकूण 49 जणांवर आरोपपत्र दाखल करण्यात आले.

या प्रकरणातील दोन्ही एफआयआर एकमेकांशी संबंधित आहेत. त्यामुळे सीबीआयने लखनऊच्या विशेष सीबीआय न्यायालयात संमिश्र आरोपपत्र दाखल केले. लखनऊ न्यायालयाच्या न्यायाधीशांनी आरोप निश्चित केले. म्हणजेच आरोपींवर कोणत्या कलमांतर्गत गुन्हा दाखल होणार हे निश्चित झाले आहे. यानंतर, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी यांसारख्या एफआयआर क्रमांक 198/1992 मध्ये नाव असलेल्या आरोपींनी उच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली.

दोन्ही प्रकरणे भिन्न असल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. संपूर्ण चाचणी चुकीची होत आहे. यानंतर अडवाणींसह ८ जणांचे प्रकरण पुन्हा रायबरेलीत गेले. याबाबत सीबीआय सुप्रीम कोर्टात गेली आणि 2001 मध्ये सुप्रीम कोर्टाने दोन्ही केसेस लखनऊमध्येच चालवायला हव्यात असे सांगितले, त्यानंतर ते चालू राहिले.

सीबीआयने 2003 मध्ये एफआयआर 198 अंतर्गत आठ आरोपींविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल केले. या आरोपपत्रात बाबरी मशिदीची रचना पाडल्याचा आरोप जोडण्यात आलेला नाही, कारण या प्रकरणी १९७ खटला दाखल करण्यात आला होता आणि न्यायालयाने दोन्ही प्रकरणे स्वतंत्र असल्याचे म्हटले होते.

रायबरेली न्यायालयाने पुराव्याअभावी लालकृष्ण अडवाणी यांची निर्दोष मुक्तता केली. 2005 मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने रायबरेली न्यायालयाचा हा आदेश रद्द करून अडवाणींसह आठ जणांवर खटला चालवण्याचे आदेश दिले होते. रायबरेली कोर्टाने 2005 मध्येच या प्रकरणात आरोप निश्चित केले होते, परंतु पहिली साक्ष 2007 मध्ये झाली होती.

28 वर्षे चाललेल्या या प्रकरणात, खटल्यादरम्यान 49 पैकी 17 जणांचा मृत्यू झाला. 30 सप्टेंबर 2020 रोजी लखनऊच्या सीबीआय न्यायालयाने अडवाणींसह 32 आरोपींना पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले.

आयबी सिंग सांगतात की, जवळपास ५०० साक्षीदार ठेवण्यात आले होते, अर्धा क्विंटल कागदपत्रे होते. न्यायालयात पुरावे म्हणून 70 कॅसेट सादर करण्यात आल्या. छायाचित्रकार, पत्रकार आणि अधिकारी साक्षीदार म्हणून सादर करण्यात आले. कोणताही कट नसल्याचं अधिकारी आणि सर्वसामान्यांनी स्पष्ट केलं. कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याने किंवा पोलीस कर्मचाऱ्याने असे म्हटले नाही की या इमारतीच्या विध्वंसात नामांकित आरोपींचा सहभाग होता.

आयबी सिंह म्हणतात की, सीबीआयच्या आरोपपत्रात असे म्हटले आहे की नामांकित आरोपींच्या चिथावणीमुळे जनतेने बाबरी पाडली. लिबरहान आयोगासमोर अनेक साक्षीदारांनी हेच सांगितले. मात्र, तपास यंत्रणा हा कट सिद्ध करू शकली नाही. विध्वंसानंतर कल्याण सिंह यांनी केलेले भाषणही त्यांनी पुरावा म्हणून दिले. ज्यात त्यांनी गोळीबार आम्ही होऊ दिला नाही असे म्हटले आहे. त्यामुळे विध्वंस झाला. कट गुन्हा घडण्यापूर्वी घडतो, गुन्हा घडल्यानंतर नाही. पूर्वीचे कोणतेही पुरावे दिले नाहीत.

बाबरी विध्वंसाच्या ढिगाऱ्याखाली दबून 251 जण जखमी झाले होते. यामध्ये ५१ जण गंभीर जखमी झाले आणि त्यापैकी ४ जणांचा मृत्यू झाला आहे. सीबीआयने गंभीर जखमी लोकांना आरोपी बनवले नाही. तर यूपी सीबीसीआयडीने त्याला आरोपी बनवले होते.

आयबी सिंग म्हणतात की एक मोहतर्मा लिबरहान आयोगाकडे गेला होता. त्यांनी खूप मोठी साक्ष दिली. उलटतपासणीच्या वेळी मी त्यांना विचारले की त्यांनी एकूण किती कॅसेट बनवल्या आहेत? ते म्हणाले, एकूण 8 कॅसेट बनवल्या. ती एक तासाची कॅसेट होती. म्हणजेच, जर तुम्ही 8 तासांची कॅसेट संपादित केली आणि 40 मिनिटांत तुमचे मत मांडले, तर त्याचे मूल्य काय आहे?

बाबरी विध्वंस प्रकरणात कारसेवक आणि नेत्यांसह तत्कालीन डीएम आणि एसएसपी यांनाही आरोपी करण्यात आले होते. त्यांची निष्क्रियता पाहता, त्यांच्यावर विनाश घडवण्याच्या कटात सहभागी असल्याचा आरोप करण्यात आला.

वकील इंद्रभूषण सिंह यांच्या म्हणण्यानुसार, जिल्हा प्रशासनाने संरचना वाचवण्याचा प्रयत्न केला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचेही पालन करावे लागले. दुसरीकडे कार सेवेसाठी जमलेले ६ लाख लोकही बघावे लागले.

बाबरी प्रकरणातील ट्रायल कोर्टाच्या निर्णयाविरोधात हायकोर्टात फेरविचार याचिका दाखल करण्यात आली होती. उच्च न्यायालयाने तो फेटाळला. बाबरी खटल्यात साक्षी महाराज यांच्या बाजूने युक्तिवाद करणारे उत्तर प्रदेशचे मुख्य स्थायी वकील आणि ज्येष्ठ वकील प्रशांत सिंह अटल यांच्या म्हणण्यानुसार, सीबीआय ट्रायल कोर्टाच्या निर्णयाविरुद्ध अपील करू शकते. मात्र, या निर्णयात काहीही बेकायदेशीर नसल्याचे सीबीआयला आढळले, त्यामुळे अपील करण्यात आले नाही.

वकील प्रशांत सिंह म्हणतात, या प्रकरणातील तथाकथित तक्रारदाराने फेरविचार दाखल केला होता. जो उच्च न्यायालयाने फेटाळला. त्या आदेशांविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात कोणीही अपील केले नाही. बाबरी विध्वंस प्रकरणात सीबीआयने केलेल्या सर्व आरोपींची सन्मानपूर्वक निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. बाबरी विध्वंसाची कहाणी यापेक्षा बरीच मोठी आणि काळवंडलेली आहे.

●●●●●●●●●

# मारकडवाडीतील दडपशाही आणि..

(कालच्या अंकावरून पुढे)

उत्तरार्ध

**संजय एम.देशमुख (निंबेकर)**
**ज्येष्ठ पत्रकार, अकोला.**
**९८८१३०४५४६**

अनेक ठिकाणी ईव्हीएममधील मतांची बेरीज ही त्या ठीकाणच्या एकून मतदानाच्या पुढे होती. उमेदवारांना स्वतःच्या घरातली पण मते पडलेली आढळत नव्हती.तर काही ठीकाणी एकाच चिन्हांवर जाणारे मतदान लक्षात येत होते. तक्रारीनंतर बटन दाबून अधिकारी सुरळीत करून आता झालं सुरू म्हणून मतदारांना अंदाजपंचे विश्वास देत होते. मशिनांची सिलं तुटलेली,त्यांचे स्पेअर भाग बाजुला पडलेले,अशा सुध्दा अनेक तक्रारी मतदार आणि कार्यकर्त्यांकडून झाल्या. या सर्व प्रकरणात निवडणूक आयोगाने सायंकाळी ५ नंतर वाढवून सांगीतलेल्या ७६ लाखाच्या अधिक मतदानाने या निवडणूक प्रक्रियेची दाणादाण उडवून दिली. संशयांना बळकटी मिळाली.

याबाबत निवडणूक आयोगाकडून कोणतीही समर्पक स्पष्टीकरणे न मिळाल्याने सध्या महाराष्ट्र आणि याअगोदर झालेल्या संशयास्पद निवडणूक प्रक्रियेच्या चर्चा देशभर सुरू झालेल्या आहे. एकंदरीत सर्व महाराष्ट्रभरात निर्माण झालेल्या सदोष निवडणूक प्रक्रियेतील संशयास्पद वातावरणाने आता सारा देशच ढवळून निघालेला आहे.

हमे भी अपनोवालोने कब लूटा, की टाईम पर पता भी नही असे म्हणत हटाव और फिरसे बॅलेट पेपर लाव... अशा प्रकारच्या आंदोलनांना, स्वाक्षरी मोहिमांना आता सुरूवात झाली आहे. महाराष्ट्राचे संशयाचे भूत आता हवेसोबत ईतर राज्यातही पोहचणार आहे. निवडणूक आयोगाच्या संशयास्पद भूमिकांचा पदार्फाश करणारी प्रायोगिक ठिणगी सोलापूरमधील मारकडवाडी गावात पडली. त्यांच्या मतदानारूपी आंदोलनाला अदृश्य राजाच्या सुपर शक्तीने दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. कारण यातून लबाडी उघड होण्याची, नाचक्की होण्याची शक्यता होती.

आपला विश्वास मतदारांमध्ये पुनर्स्थापित करायचा असेल तर अशा वेळी राजकीय नेत्यांनी न घाबरता पुढे आलं पाहिजे? स्वतःच्या नैतिकता आणि प्रामाणिकतेची ढोंगं वठवून ईतरांना दोषी ठरविणाऱ्या आणि जनतेवर अन्याय करणाऱ्यांनी या अग्निपरीक्षेला सामोरे गेलं पाहिजे. निवडणूक आयोगालाही सर्व प्रश्नांची समर्पक स्पष्टीकरणं देण्याचे कर्तव्य पार पाडणे हेच जनतेला अपेक्षित आहे. कारण राजा राजा बोले, सरदार सुने.. अशी परिस्थिती आपण प्रशासनात निर्माण करून ठेवलेली आहेच. त्यामुळे ठिणगी तर पडली आता बंडं वाढणारच आहेत. रामायणात विश्वासाला प्रबळ ठरवून स्वतःची खात्री देण्यासाठी सितेने अग्निपरीक्षा दिली होती म्हणतात. मग तिच्या पतीच्या म्हणजे रामाच्या नावाचा दुरुपयोग करणारांनी आम्ही फक्त रामाच्या नावाचा बाजार केला.मतदारांच्या मतांचा अनादर केला नाही. कोणताही दुरुपयोग केला नाही हे सप्रमाण पटवून द्यावं. ईतरांना जेलमध्ये टाकणाऱ्यांनी स्वतःच्या अंतरंगाशी होऊ पाहणाऱ्या प्रतारणा टाळण्यासाठी जनतेच्या दरबारात सत्य पटवून द्यावं.

रामाच्या सितेने अग्निपरीक्षा घेतली तशी त्या रामांच्या भक्तांनी पण स्वतःला योग्य म्हणून सिध्द करावं. असे कोणते प्रमाद घडू नयेत म्हणून यानंतरचं सर्व मतदान बॅलेटपेपरवरच होईल असे निर्णय घ्यावेत. श्रीरामांच्या परमभक्तांनी दिल्लीश्वरांसमोर जनतेचे हे प्रस्ताव मांडावेत. अशी महाराष्ट्रातील मतदारांची संशयास्पद रितीने विजयी झाल्याचा संशय असलेल्या सत्ताधाऱ्यांकडे ही मागणी आहे...!

मतदारांवर झालेल्या अन्यायाविरूध्द बंड म्हणून आपल्या मतांचा विश्वास सप्रमाण सिध्द करण्यासाठी मारकडवाडीतील मतदारांनी बॅलेट मतदानाचा प्रयोग पुढे आणला. त्यांचा त्या लोकशाहीतील प्रयत्नाला लबाडी उघड होऊ नये म्हणून प्रशासनाकडून पोलिस बळाने दडपण्यात आले.आता मारकडवाडीतले एक बंड दडपले.

कोंबड्यांचे नरडे दाबल्याने क्रांतीचा सुर्य उगवायचा थांबणार नाही. आंदोलने आता अधिक भडकणार, त्याची धग ईतर राज्यातही पोहचणार...!खऱ्या- खोट्याची परीक्षा जनतेच्या दरबारात आणि सृष्टीच्या कालचक्रालाही द्यावीच लागणार.म्हणून वेळीच सावध होण्याची सद्विवेकबुध्दी प्रभू श्रीरामांनी त्यांच्या धार्मिक भक्तांना द्यावी ही एक मानवतावादी प्रार्थना...!

●●●●●●●●●

# एहसान फरामोश बांगलादेशला त्याची जागा दाखवून द्या!

१९७१ पर्यंत बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग होता. तेंव्हा त्याला पूर्व पाकिस्तान असे म्हंटले जायचे. पाकिस्तानच्या राजवटीत बांगलादेशातील नागरिकांवर अनन्वित अत्याचार होत होते. बांगलादेश हा पाकिस्तानचा घटक असूनही बांगलादेशी नागरिकांवर पाकिस्तान जुलुम करत होता.

पाकिस्तानच्या जुलमी राजवटीला कंटाळून बांगलादेशचे तात्कालिन नेते शेख मुजिबिर रहेमान यांनी पाकिस्तानी सरकार विरुद्ध बंड पुकारले. त्यांच्या या बंडास बांगलादेशी नागरिकांनी प्रतिसाद दिला आणि लोक रस्त्यांवर उतरले मात्र पाकिस्तानने दडपशाही मार्गाने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला तेंव्हा शेख मुजीबिर रेहमान यांनी भारताच्या तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे मदतीची याचना केली.

इंदिरा गांधी यांनी तत्काळ बांगलादेशी नागरिकांना पाठिंबा दिला आणि भारतीय लष्कराने पाकिस्तानशी मुकाबला करून बांगलादेशला पाकिस्तानच्या गुलामीतून मुक्त केले. पाकिस्तानच्या निर्मितीत भारताचा मोठा वाटा आहे नव्हे भारतामुळेच बांगलादेशची निर्मिती झाली. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाल्या पासून बांगलादेश आणि भारताचे संबंध मैत्रीचे च राहिले आहेत.

मोठ्या भावाच्या रुपात भारताने बांगलादेशला नेहमीच त्यांच्या संकटात मदत केली मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बांगलादेश मधील सध्याचे सरकार आणि बांगलादेशी नागरिक भारताच्या उपकाराला विसरली असून भारतालाच शत्रू मानू लागली आहेत. बांगलादेशात सध्या भारताविरुद्ध मोठा जनक्षोभ पाहायला मिळत आहे.

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार पाडून तेथील कट्टरपंथीयांनी सत्ता हस्तगत केली. कट्टरपंथीय, लष्कर आणि जनतेचा रोष पाहून शेख हसीना यांनी भारतात पलायन केले. शेख हसीना यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते म्हणूनच भारताने त्यांना भारतात आश्रय दिला कदाचित हेच तेथील नवनियुक्त सरकारला आणि कट्टरपंथीयांना रुचले नसावे म्हणूनच त्यांनी बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यांक नागरिकांना लक्ष करण्यास सुरुवात केले.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

गेल्या काही महिन्यात बांगलादेशातील हिंदूं मंदिरांवर आणि हिंदू नागरिकांवर हल्ले होऊ लागले. मागील काही महिन्यात बांगलादेशात हिंदूंवरील हल्ल्याच्या ३०० घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीव देखील गमवावा लागला आहे.

हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूंनी बांगलादेश सोडून जावे असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत. या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ मोहंमद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांगला देशातील अल्पसंख्याक हिंदूंचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे मात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे.

इतकेच नाही तर बांगलादेशात भारत विरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ मोहंमद युनूस हे नोबेल पारितोषिक विजेते आहेत. त्यांची बांगलादेशचा हंगामी पंतप्रधानपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागत केले होते. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली.

त्यांच्या कारकीर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे वाटले होते पण त्यांनी मात्र भारताशी पंगा घेण्याचेच ठरवले आहे.

बांगलादेश नॅशनलिस्ट पक्षाचे नेते रहुल कबीर रिझवी यांनी आपल्या बायकोची साडी जाळून भारतीय मालावर बहिष्कार घालण्याचे आव्हान केले इतकेच नाही तर भारतीय प्रसार माध्यमांवर देखील बंदी घालण्याचे आव्हान केले. इतके सगळे होत असताना डॉ मोहंमद युनूस या कट्टरपंथीयांवर कोणतीही कारवाई करत नाहीत उलट त्यांची बाजू घेऊन भारतवरच आरोप करीत आहेत.

म्हणूनच आता बांगलादेशातील हिंदूंवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी आणि बांग्लादेशात भारता विरुद्ध वाढणारा जनक्षोभ कमी करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने हस्तक्षेप करावा आणि तिथे शांती सेना तैनात करावी. भारताने देखील या प्रकरणात बघ्याची भूमिका सोडून अहेसान फरामोश बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यावी.

●●●●●●

# शेतातील दुध डेअरीपासूनच्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स लागतो का?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना**

आपण गेल्या चार आठवड्यापासुन शेती व इन्कमटॅक्स या बद्दल अर्थ साक्षरता या सदरा मध्ये अभ्यास करत आहोत आज ही आपण या बद्दल ची महत्वाची नवीन चर्चा करणार आहोत, जी नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोतर रुपात राहणार आहे.

**प्रश्न** - आता पर्यंत आपण शेती बद्दल काय बघितले?

■ आपण आतापर्यंत बघितले की शेतीच्या उत्पन्नावर भारतात इन्कमटॅक्स लागतो का? सलॅब रेट म्हणजे काय? मोठेमोठे व्यापारी, कारखानदार तथा राजकारनी इन्कमटॅक्स वाचवण्यासाठी शेती खरेदी करतात, हे खरे आहे का? एखादया करदात्यास फक्त शेतीचे उत्पन्न असेल तर, ते जर किती ही कोटी मध्ये असले तरी इन्कमटॅक्स अजिबात लागणार नाही, या वर ही चर्चा केली. फॉरेनमध्ये शेती असेल तर त्या भारतीय करदात्यास इन्कमटॅक्स लागणार की नाही, शेती व काळा पैसा पांढरा करण्याचे साधन आहे असे जे व्यवहारात बोलले जाते, ते किती खरे आहे, आपण एक महत्वाचा विषय बघितला की शेतीच्या उत्पन्नाची करमाफी मिळण्यासाठी शेती ही ग्रामीण भागाची असावी का? आज आपण अजून काही उदहरण बघणार आहोत की कोणते उत्पन्न शेतीचे आहे आणि कोणते उत्पन्न शेतीचे नाही.

**प्रश्न** - शेती च्या व्यवसायात असलेल्या फर्म मध्ये गुंतवलेल्या भांडवलापासुन मिळालेला पगार किंवा नफ्यावर इन्कमटॅक्स लागतो का ?

■ कमिश्नर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध आर. एम. चिंदबरम पीलाई [1977] 106 ITR 292 (SC) या केस मध्ये माननीय सुप्रीम कोर्ट यांनी सपष्ट सांगितले आहे की शेतीच्या व्यवसायात असलेल्या फर्म मध्ये गुंतवलेल्या भांडवला पासुन मिळालेल्या पगार किंवा नफ्याचे उत्पन्न हे शेती पासुन मिळालेले उत्पन्न धरले जाईल आणि अशा मिळालेल्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स कायदा 1961 प्रमाणे इन्कमटॅक्स लागणार नाही.

**प्रश्न** - शेती च्या व्यवसायात असलेल्या फर्म च्या भागीदारला जर व्याज मिळत असेल तर त्या व्याजवार इन्कमटॅक्स लागेल का?

■ या प्रश्नाचे उतर गौहटी हायकोर्ट ने कमिश्नर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध एम. एल. महिंद्र [1978] 112 ITR 323 (GÔu) या केस मध्ये स्पष्ट सांगीतले आहे की शेती च्या व्यवसायात असलेल्या फर्मच्या भागीदाराला गुंतवलेल्या भांडवलापासुन कायदेशीर व्याज मिळत असेल तर हे त्याचे शेती चे उत्पन मानले जाईल आणि अशा उत्पनावर इन्कमटॅक्स लागनार नाही.

**प्रश्न** - जर शेतात ईट बनवण्याचे काम होत असेल तर अशा ईट भट्टीपासुन मिळालेल्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स लागतो?

■ वर प्रश्नात आल्याप्रमाणे विट भट्टीच्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स लागेल. कारण ते उत्पन्न शेतीचे उत्पन्न म्हणून धरले जात नाही.

**प्रश्न** - दुधापासून मिळालेल्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स लागतो का?

■ कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध व्ही आर वेंकटस्वामी नायडु या केस मध्ये या विषयवार कोर्टाने भरपुर चर्चा केलेली आहे. या केस मध्ये वेंकटस्वामी नायडु यांची दुध डेअरी होती. त्यांना 70 एकर जमीन होती त्यात काही भागा मध्ये कुरन साठी वापरले जायचे त्या जमीनीत 65 गायी आणि 10 बैल यांचे संगोपन व्हायचे त्या काळात करदात्याने 28000/- रुपयाचे दुध मिल्क सप्लाय युजर यांना विकले व त्यात 235/- रु विक्रीवर पण भरले. करदात्याने सांगितले कीत्या गायी कुरणावर पूर्णपणे अवलंबुन असुन ते उत्पन्न शेतीचेच उत्पन्न आहे.

परंतु सर्वोच्च न्यायालयाने असे मत दिले की वेंकटस्वामी नायडु यांचे दुधाचे व्यवहार हे व्यवासायिक व्यवहार असुन ते निव्वळ शेतीचे उत्पन्न म्हणून धरले जाणार नाही, आणि म्हणजेच पर्यायाने वेंकटस्वामी नायडु यांना इन्कमटॅक्स भरावाच लागेल.

ही केस म्हणजे कमिश्नर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध वेंकटस्वामी नायडु [1956] 29 ITR 529 (SC) यात मा. सुप्रीम कोर्टने स्पष्ट सांगितले. पुढील आठवड्यात याच विषयाची नवीन महत्वपूर्ण माहिती बघणार आहोत.

■ ■ ■





## वाचक लिहितात

### शिक्षकांना शिक्षकच राहू द्या!

शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शासनाद्वारे विविध उपक्रम राबवले जातात, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असतात. जसे की, सरकारी शाळांमध्ये दिले जाणारे मध्यान्ह भोजन, सर्व शिक्षा अभियान, डिजिटल शाळा अशा विविध शैक्षणिक उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांचा उद्देश गरीब आणि वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करून त्यांना याचा जास्तीत जास्त लाभ मिळावा, असा शासनाचा हेतू आहे.

परंतु, नाण्याची दुसरी बाजू लक्षात घेतल्यास असे दिसते की, याच शाळांमधील शिक्षकांवर या अतिरिक्त कामांचा मोठ्या प्रमाणात ताण येतो. निवडणुकांमध्ये मतदान अधिकारी किंवा पर्यवेक्षक म्हणून काम करणे, जनगणना आणि इतर सरकारी सर्वेक्षणांमध्ये सहभाग घेणे, मतदार ओळखपत्र तयार करण्यासाठी माहिती गोळा करणे, लोकसंख्येची माहिती गोळा करणे, पाळीव प्राणी जनगणना आणि इतर अशा कितीतरी अतिरिक्त कामांत शिक्षक गुंतलेले असतात.

आता या यादीत अजून एका कामाची भर पडली आहे, ती म्हणजे विद्यार्थ्यांची अपार आयडी तयार करणे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी आणि त्यांची शैक्षणिक नोंद सुरक्षित ठेवण्यासाठी निश्चितच ही आयडी उपयुक्त आहे. मात्र, शिक्षकांकडून हे काम करून घेणे कितपत योग्य आहे, याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. विशेषतः ग्रामीण भागातील शाळांचा विचार केला तर, तेथे तांत्रिक अडचणी आणि आवश्यक संसाधनांची कमतरता यांचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागतो.

या अतिरिक्त जबाबदाऱ्यांमुळे शिक्षकांवर मानसिक आणि शारीरिक ताण येतो, ज्याचा त्यांच्या कार्यक्षमतेवर थेट परिणाम होतो. शिक्षकांचा बहुमूल्य वेळ अशा कामांमध्ये गेला तर विद्यार्थ्यांना शिकवणे आणि घडवणे या त्यांच्या मुख्य जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे अशा कामांसाठी सहायक कर्मचाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे. यामुळे अनेकांना रोजगार मिळेल आणि शिक्षकांना त्यांचे अध्यापन कार्य निर्विघ्नपणे पार पाडता येईल आणि विद्यार्थ्यांच्या खऱ्या अर्थाने शिक्षणाचा दर्जा सुधारेल.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.

### आश्वासने पूर्ण करा..

राज्यात महायुतीचे सरकार सत्तारूढ झाले आहे . नागपूरकर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले असून, त्यांनी लगेच कामालाही सुरूवात केली आहे. तथापि, आता विरोधकांचे उणेदुणे काढण्याऐवजी त्यांनी विकास कामे आणि विदर्भाच्या समस्यांकडे लक्ष दिले पाहिजे.

विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी फडणवीस आणि महायुतीचे नेते विरोधकांवर टीका करण्यात मशगुल होते . तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे घरून काम करायचे म्हणून त्यांची खिल्ली उडविली जात होती. आम्ही सत्तेत आल्यास हे करणार, ते करणार.. म्हणून महायुतीच्या नेत्यांनी शेकडोंनी आश्वासने दिलीत. आता त्यांचे सरकार आले आहे . सत्तेसाठी निव्वळ खिरापत वाढण्याऐवजी उद्योग आणणे, बेरोजगारी दूर करणे, याला प्राधान्य दिले पाहिजे.

■ नरेश सोनटक्के, नागपूर.

## अशोकायन

### लोणार पर्यटन क्षेत्र

**कृत्रिम पर्यटन केंद्राचीही**
**जगात झालीय भरभराट**
**लोणार नैसर्गिक असुनही**
**पर्यटकांचा का शुकशुकाट?**

**पर्यटन क्षेत्रे सद्या फार्मात**
**लोणार कां बरे कोमात**
**प्रशासनाची उदासिनता**
**तर नाही ना याच्या मुळात ?**

**खाऱ्या पाण्याचे सरोवर**
**जरी प्रसिद्ध नकाशावरी**
**सोयी सुविधेच्या अभावी**
**पर्यटक टाळतात हो वारी .. !**

**पर्यटन व्यवसाय आहे**
**जगात सद्या फार्मात**
**संधीचं सोनं करणं**
**आहे आपल्या हातात..!**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# डॉ.नितीन तिवारी यांनी वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये प्रथमच मित्रा क्लिप प्रक्रियेद्वारे शस्त्रक्रिया केली



**नागपूर, ७ दिसंबर :** एक ५७ वर्षीय व्यक्ती वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये आले आणि डॉ. नितीन तिवारी, सीनियर इंटरव्हेंशनल कार्डियोलॉजिस्ट यांना भेटले, जे गेल्या १९ वर्षांपासून वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहेत. रुग्णाला हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता (हृदयाची पंपिंग क्षमता २५% पेक्षा कमी होणे) आणि वॉल्व लीक (माइट्रल रेगुर्गिटेशन) झाली होती. त्यांच्या हृदयाचे ठोकेही बंद झाले होते आणि दोन्ही फुफ्फुसांमध्ये द्रव जमा झाला होता. त्यांना श्वास घेण्यात त्रास होत होता आणि त्याच्या छातीच्या दोन्ही बाजूला पाईप्स लावण्यात आले होते, याशिवाय ते तीन महिन्यांहून अधिक काळ विविध हॉस्पिटलमध्ये भरती होते. डॉ. तिवारी यांनी त्यांचे उपचार योग्य प्रकारे सुरू केले आणि त्यांची प्रकृती स्थिर करण्यासाठी एआयसीडी (ऑटोमेटेड इम्प्लांटेबल कार्डियोवर्टर डिफिब्रिलेटर) लावले. त्यानंतर डॉ. तिवारी यांनी त्यांच्या लीक होणाऱ्या वॉल्वचा (माइट्रल रेगुर्गिटेशन) उपचार करण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे त्याच्या हृदयाला सूज आली होती. त्याच्या कमजोर शारीरिक स्थिती आणि कमी पंपिंग क्षमता लक्षात घेता, छाती उघडणे हा एक कठीण पर्याय होता.

म्हणूनच डॉ. नितीन तिवारी यांनी एक मिनिमली इनवेसिव ट्रांस-कॅथेटर माइट्रल वॉल्व रिपेअर करण्याचा विचार केला, ज्याला मित्रा क्लिप म्हटले जाते. या प्रक्रियेमध्ये छाती उघडण्याची आणि हृदय तात्पुरते थांबवण्याची आवश्यकता नसते. मित्रा क्लिप प्रक्रियेत, कॅथेटर (अंजीयोप्लास्टी प्रक्रियेप्रमाणे) मांडीमधून टाकले जाते आणि वॉल्व पूर्णपणे बंद करण्यासाठी आणि वाल्व गळती थांबवण्यासाठी माइट्रल वॉल्ववर एक छोटी क्लिप लावली जाते, ज्यामुळे हृदयाला सामान्य रक्त प्रवाह पूर्ववत होतो.

ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली आणि रुग्णाला नंतर डिस्चार्ज देण्यात आला. डॉ. नितीन तिवारी यांनी सांगितले की, मध्य भारतात प्रथमच मित्रा क्लिप प्रक्रियेने शस्त्रक्रिया करण्यात आली. हार्ट फेल्युअर आणि लीक वॉल्व असलेल्या रुग्णांना विशेषतः झोपताना श्वास घ्यायला त्रास होतो, थकवा, कोरडा कफ, पायांमध्ये सूज, भूक न लागणे आणि व्यायाम करण्यास असमर्थता दिसून येते. जर उपचार केले नाहीत, तर ५७% लोक एक वर्षापेक्षा जास्त काळ जगू शकत नाहीत. डॉ. नितीन तिवारी यांनी डॉ. रवि बागली, डॉ. विनोद काशेटवार, अमित मुखर्जी, शांतनु, डॉ. पंकज जैन चौधरी, डॉ. अवंतीका जैस्वाल, राऊत, देवेंद्र, सिस्टर विद्या आणि सर्व कॅथ लॅब स्टाफ यांचे या प्रक्रियेच्या यशासाठी आभार मानले. डॉ. नितीन तिवारी म्हणाले की, ही मित्र क्लिप प्रक्रिया ही या क्षेत्रासाठी मोठी उपलब्धी आहे.

# साई लाइफ सायन्सेस लिमिटेडची प्राथमिक समभाग विक्री योजना ११ डिसेंबर २०२४ पासून सुरू




**मुंबई, ७ दिसंबर :** साई लाइफ सायन्सेस लिमिटेड (साई लाइफ किंवा द कंपनी) या कंपनीची प्राथमिक समभाग विक्री (ऑफर) येत्या ११ डिसेंबर २०२४ पासून सुरू होणार आहे. कंपनीने या संदर्भात प्रस्ताव सादर केला आहे.

या ऑफरमध्ये एकूण ९५० कोटी रुपयांच्या नव्या इक्विटी शेअर्सचा (फ्रेश इश्यू), तसेच काही विद्यमान भागधारकांकडील (सेलिंग शेअरहोल्डर्स) ३,८१,१६,९३४ इक्विटी शेअर्सचा (ऑफर फॉर सेल) समावेश आहे.

या आयपीओमधून मिळणाऱ्या निधीचा विनियोग आपल्या ७२० कोटी रुपयांच्या कर्जाची संपूर्ण वा अर्ध-परतफेड करण्यासाठी आणि उर्वरीत रकमेचा विनियोग इतर कॉर्पोरेट स्वरुपाच्या खर्चासाठी करण्याचा कंपनीचा मनोदय आहे.

ऑफर फॉर सेलमध्ये, साई क्रेस्ट सिन प्रायव्हेट लिमिटेड (प्रमोटर सेलिंग शेअरहोल्डर) यांच्याकडील ६४,५४,७८० इक्विटी शेअर्स, टीपीजी एशिया व्हीटू एसएफ पीटीई लि. यांच्याकडील २,३१,५९,३६८ इक्विटी शेअर्स, एचबीएम प्रायव्हेट इक्विटी इंडिया यांच्याकडील ६२,१०,१८६ इक्विटी शेअर्स (एकत्रितपणे, इन्व्हेस्टर सेलिंग शेअरहोल्डर); त्याचप्रमाणे, भारती श्रीवरी यांच्याकडील ६,५०,००० इक्विटी शेअर्स, अनिता रुद्राराजू नंद्याला यांच्याकडील ५,००,००० इक्विटी शेअर्स, राजू पेनमस्ता यांच्याकडील ५,००,००० इक्विटी शेअर्स, डॉ. डर्क वॉल्टर सरटॉर यांच्याकडील २,५०,०० इक्विटी शेअर्स, जगदीश विश्वनाथ डोरे यांच्याकडील २,४५,१०० इक्विटी शेअर्स, राजगोपाल श्रीरामा टट्टा यांच्याकडील ६२,५०० इक्विटी शेअर्स, के पांडू रंगा राजू यांच्याकडील ८०,००० इक्विटी शेअर्स समभाग आणि वेंकट नरसिंह शास्त्री यांच्याकडील ५,००० इक्विटी शेअर्स (सर्व मिळून अदर सेलिंग शेअरहोल्डर्स) एवढ्या शेअर्सचा समावेश आहे.

अँकर इन्व्हेस्टर श्रेणीतील गुंतवणूकदारांसाठी बोली लावण्याचा दिवस मंगळवार, १० डिसेंबर २०२४ हा ठरविण्यात आला आहे. इतर गुंतणूकदारांसाठी बुधवार, दि. ११ डिसेंबर २०२४ ते शुक्रवार, दि. १३ डिसेंबर २०२४ ही मुदत देण्यात आली आहे.

सर्व बोलीदारांना (अँकर इन्व्हेस्टर्स वगळता) ॲप्लिकेशन सपोर्टेड बाय ब्लॉक्ड अमाउंट (एएसबीए) प्रक्रियेचा वापर करणे अनिवार्य आहे. आपल्या संबंधित एएसबीए खात्याचा तपशील आणि आरआयबी यूपीआय मेकॅनिझम वापरत असलेल्यास यूपीआयचा आयडी त्यांना याकरिता द्यावा लागेल. त्यानुसार त्यांच्या संबंधित बोलीची रक्कम सेल्फ सर्टिफाइड सिंडिकेट बँकांद्वारे (एससीएसबी) किंवा यूपीआय यंत्रणेंतर्गत प्रायोजक बँकेद्वारे, संबंधित बोली रकमेच्या मर्यादेपर्यंत ब्लॉक केली जाईल. अँकर इन्व्हेस्टर्सना एएसबीए प्रक्रियेद्वारे ऑफरमध्ये सहभागी होण्याची परवानगी नाही. अधिक माहितीसाठी आरएचपीच्या पृष्ठ क्रमांक ३९३ वरील ऑफर प्रोसिजर हा तपशील पाहावा.

# तुमचे केस करा लग्नसमारंभासाठी सज्ज: मुलायम,आकर्षक आणि कोणत्याही उत्सवासाठी परिपूर्ण लूक!




**मुंबई, ७ दिसंबर :** लग्नाचा हंगाम सुरू झाला आहे आणि यात केवळ नवऱ्या मुलीलाच चमकायचे असते असे नाही! करवल्यांपासून ते मैत्रिणी आणि नातेवाइकांपर्यंत प्रत्येकीलाच छान दिसायचे असते. संगीत, मेहंदीसारखे सोहळे आणि भव्य रिसेप्शन या सगळ्याच प्रसंगी केस छान आवरावे लागतात. अनोखी फॅशन स्टेटमेंट करण्यासाठी केशरचनेहून अधिक चांगला मार्ग नाही.

लग्नाच्या सगळ्या कार्यक्रमांमध्ये केसांच्या रचना सफाईदारपणे करायच्या असतील, तर आधी ते केस मऊ आणि सहज आवरण्याजोगे असले पाहिजेत. मात्र, हिवाळा सुरू होत आहे आणि त्यातच वेगवेगळ्या समारंभांसाठी स्टायलिंगच्या साधनांचा वापर वाढत आहे. त्यामुळे केसावर जास्तच ताण आलेला असतो, या ताणामुळे ते शुष्क होतात, तुटतात. उत्सवाची वेळ जवळ येत असतानाच, केसाची जरा जास्त काळजी घेणे हा महत्वाचा मुद्दा आहे, केसाला नियमित तेल लावण्याच्या सवयीहून अधिक चांगले काहीच ठरत नाही. अनेक प्रकारची तेलं उपलब्ध असताना, आपल्या केसाला अनुकूल ठरतील अशा घटकांनी युक्त असलेले तेल निवडणे महत्त्वाचे आहे. पॅराशूट ॲडव्हान्स्ड एलोवेरा इनरीच कोकोनट हेअर ऑइल हा एक केस चिकट न करणारा, हलकाफुलका पर्याय आहे. यात कोरफडीची केस मुलायम करण्याची खासियत आणि नारळाचे पोषण यांचा संयोग साधण्यात आला आहे. त्यामुळे हे हेअर ऑइल केसातील गुंता कमी करते आणि केसांना मुलायम करते.

कोरफड घालून तयार केलेले खोबरेल तेलाचे हे अनोखे मिश्रण केसाच्या आतमध्ये १० स्तरांपर्यंत खोलवर* जाऊन मिसळते (अस्वीकृती- मुलभूत तांत्रिक अभ्यास) आणि केसांना मुलायम करून गुंता कमी करते. कोरफड ही वनस्पती केसाचे एकंदर आरोग्य सुधारणारा घटक म्हणून परिचित आहे. नारळातील उत्कृष्ट पोषणाशी कोरफडीतील केसांची स्थिती सुधारण्याच्या गुणधर्माचा मेळ घातला गेल्यामुळे केसात गुंता कमी होतो आणि परिणामी केस मुलायम व आकर्षक होतात. त्यामुळे आपल्याला केसाची हवी तशी रचना करण्याची तसेच अगदी सहजपणे ते हवे तसे ठेवण्याची मुभा मिळते.

# शेअर.मार्केटने ट्रेडिंग अनुभव सुलभ करण्यासाठी सादर केले 'शीट्स' टूल

**मुंबई, ७ दिसंबर :** शेअर.मार्केट हे फोनपेचे एक उत्पादन असून त्यांनी आज 'शीट्स' हे टूल बाजारात आणत असल्याची घोषणा केली आहे. शेअर बाजारातील लोकांना अधिकाधिक सक्षम करण्यासाठी आणि त्यांचा ट्रेडिंग अनुभव सुलभ करण्यासाठी या उत्पादनाची रचना करण्यात आली आहे. ट्रेड.शेअर.मार्केट या वेब प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असलेले शीट्स टूल ट्रेडर्सना बाजारातील माहिती थेट स्प्रेडशीटमध्ये घेण्यास आणि त्यांचे स्वतःचे ट्रेडिंग मॉडेल्स व धोरणे सहज तयार करण्यास मदत करते.शेअर.मार्केटने उद्योगात नवीन मापदंड प्रस्थापित करत शीट्सच्या अनोख्या लॉन्चच्या माध्यमातून एक क्रांतिकारक पाऊल उचलले आहे. हे अत्याधुनिक टूल असून अशा प्रकारचे नावीन्यपूर्ण फीचर्स देणारे शेअर मार्केटमधील देशातील ते एकमेव डिस्काउंट ब्रोकर झाले आहेत. या टूलमुळे शेअर बाजारात व्यवहार करणाऱ्या लोकांना बाजारातील माहिती घेण्यासाठी आता स्वतःच्या बुद्धीचा वापर करण्याची गरज भासणार नाही.

विशिष्ट धोरणे आणि निकषांशी जुळवून घेण्यासाठी ट्रेडर्स आणि गुंतवणूकदार रोख्यांचे मॅन्युअली विश्लेषण करतात. ही प्रक्रिया अतिशय वेळखाऊ असते आणि त्यासाठी बरेच कष्ट घ्यावे लागतात. हे आव्हान सोपे करण्याचे काम शीट्स करते. ट्रेडर्सना आणि ट्रेडर्स समुदायाला ऑप्शन स्ट्रॅटेजी तयार करण्यासाठी, खरेदी-विक्री संकेत तयार करण्यासाठी, आणि ट्रेंड्स प्रभावीपणे रिअल-टाइममध्ये विश्लेषण करण्यासाठी या टूलचा उपयोग होईल.

# इसुझु मोटर्स इंडिया भारतभरात 'इसुझु आय केअर विंटर कॅम्प' राबवणार

**मुंबई, ७ दिसंबर :** इसुझुची दर्जात्मक सेवा व मालकीहक्क अनुभव देण्याप्रती असलेली कटिबद्धता कायम राखण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नासह इसुझु मोटर्स इंडिया इसुझु डी-मॅक्स पिक-अप्स आणि एसयूव्हींच्या श्रेणीसाठी देशव्यापी 'इसुझु आय-केअर विंटर कॅम्प' राबवणार आहे. या सर्विस कॅम्पचा देशभरातील ग्राहकांना यंदाच्या हंगामादरम्यान त्रासमुक्त ड्रायव्हिंगच्या अनुभवासाठी उत्साहवर्धक लाभ आणि प्रतिबंधात्मक देखभाल तपासणी सुविधा देण्याचा उद्देश आहे.

'इसुझु केअर'चा उपक्रम विंटर कॅम्प ९ ते १४ डिसेंबर २०२४ दरम्यान सर्व इसुझु ऑथोराइज्ड डिलर सर्विस आऊटलेटमध्ये कॅम्प राबवण्यात येईल. या कालावधीदरम्यान ग्राहक त्यांच्या वाहनांसाठी स्पेशल ऑफर्स व लाभांचा देखील आनंद घेऊ शकतात.

विंटर कॅम्प अहमदाबाद, बारामुल्ला, बेंगळुरू, भांडुप (मुंबई), कालिकत, भुज, चेन्नई, कोईम्बतूर, दिमापूर, दुर्गापूर, गांधीधाम, गोरखपूर, गुरुग्राम, गुवाहाटी, हिस्सार, हुबळी, हैदराबाद, इंदौर, इटानगर, जयपूर, जयगाव, जम्मू जालंधर, जोधपूर, कर्नाल, कोची, कोल्हापूर, कोलकाता, कुर्नूल, लखनौ, एलबी नगर(हैदराबाद), लेह, मदुराई, मंडी, मंगलोर, मेहसाणा, मोहाली, मुंबई, मैसूर, नागपूर, नाशिक, नवी दिल्ली, नोएडा, नेल्लोर, पटणा, पुणे, रायपूर, रत्नागिरी, राजमुंद्री, राजकोट, सातारा, शिवमोगा, सिलीगुडी, सुरत, तिरूनवेल्ली, तिरुपती, त्रिची, त्रिवेंद्रम, वडोदरा, विजयवाडा आणि विशाखापट्टणम येथील इसुझुच्या सर्व अधिकृत सर्विस केंद्रांमध्ये राबवण्यात येईल. येथे असलेल्या इसुझूच्या सर्व अधिकृत सेवा सुविधांमध्ये विंटर कॅम्पचे आयोजन केले जाईल.

ग्राहक सर्विस बुकिंगसाठी जवळच्या इसुझु डिलर आऊटलेलशी संपर्क साधू शकतात किंवा https://www.isuzu.in/servicebooking.html या वेबसाइटला भेट देऊ शकतात. तसेच अधिक माहितीसाठी ग्राहक १८०० ४१९९ १८८ (टोल-फ्री) या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

# निबाव होम लिफ्ट्सकडून चेन्नईमध्ये पाचव्या आणि सर्वात मोठ्या उत्पादन सुविधेचे उद्घाटन



**नागपूर, ७ दिसंबर :** निबाव होम लिफ्ट्स, आशियातील सर्वात मोठ्या होम लिफ्ट ब्रँडने चेन्नई येथे असलेल्या पाचव्या आणि सर्वात मोठ्या उत्पादन सुविधेचे उद्घाटन केले आहे. या धोरणात्मक वाढीसह, कंपनी तिची एकूण उत्पादन क्षमता ७,५०० युनिट्सवरून दरवर्षी १५,००० युनिट्सपर्यंत तिच्या सर्व उत्पादन सुविधांमध्ये वाढवेल. एसआयपीसीओटी, इरुंगतुकोट्टई येथे स्थित, अत्याधुनिक युनिट १,००,००० स्के.फीट मध्ये पसरलेले असून कंपनीची नवीनतम होम लिफ्ट श्रेणी - निबाव सीरीज ४ उत्पादन करेल. यामुळे कंपनी या क्षेत्रातील विविध कार्यांमध्ये ४५० रोजगाराच्या संधी देखील निर्माण करेल.

याप्रसंगी निबाव होम लिफ्ट्सचे सीईओ आणि संस्थापक विमल बाबू म्हणाले, आम्हाला चेन्नईमध्ये आमच्या नवीन फ्लॅगशिप उत्पादन सुविधा सुरू झाल्याची घोषणा करताना अभिमान वाटतो, जो निबावच्या प्रवासातील एक महत्त्वाचा क्षण आहे. ही नवीन सुविधा केवळ होम लिफ्ट उद्योगातील आपल्या प्रकारातील सर्वात मोठी नाही, तर ती स्केल, कार्यक्षमता आणि नाविन्यपूर्णतेच्या बाबतीत एक नवीन बेंचमार्क सेट करते. या विस्तारासह, आम्ही १२ देशांमध्ये आणि त्यापुढील आमच्या उत्पादनांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सज्ज आहोत, आम्ही गुणवत्ता आणि सेवेची सर्वोच्च मानके राखतो याची खात्री करून घेत आहोत. आम्ही चेन्नईमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करून, स्थानिक अर्थव्यवस्थेला हातभार लावण्यासाठी आणि प्रगत उत्पादन क्षेत्रात कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी देखील उत्सुक आहोत.

निबाव लिफ्ट्स जगातील सर्वात मोठी होम लिफ्ट उत्पादक बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, ही सुविधा कंपनीला अतिरिक्त जागतिक बाजारपेठांपर्यंत पोहोचण्यास सक्षम बनवण्यासाठी, नाविन्यपूर्ण आणि सुलभ होम मोबिलिटी सोल्यूशन्समध्ये अग्रणी बनण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. हा विस्तार निबाव लिफ्ट्सच्या दीर्घकालीन धोरणात्मक उद्दिष्टांमध्ये त्याचे उत्पादन मानके वाढवणे, वितरण टाइमलाइन कमी करणे आणि जागतिक स्तरावर उत्पादनातील नावीन्य वाढवण्याच्या दिशेने एक मजबूत पाऊल आहे.

# एशियन पेंट्सकडून अल्टिमेट एक्स्टीरिअर प्रोटेक्शनसाठी ग्रॅफिनद्वारे समर्थित रि - इंजीनिअर केलेले ॲपेक्स अल्टिमा प्रोटेक लॉंच

**मुंबई, ७ दिसंबर :** आपल्या घरांच्या बाहेरील भिंतींना सतत मुसळधार पाऊस, प्रखर सूर्यप्रकाश आणि सतत धूळीचा सामना करावा लागतो. काळासह, यामुळे घरांच्या लुक व टिकाऊपणावर परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे घरमालक दीर्घकालीन सोल्यूशनचा शोध घेत आहेत. भारतभरातील घर मालकांचा विश्वास असलेल्या एशियन पेंट्सने लॅमिनेशन पेंट म्हणून ओळखले जाणारे त्यांचे प्रमुख एक्स्टीरिअर पेंट ॲपेक्स अल्टिमा प्रोटेकला ग्रॅफिनचा पाठिंबा देत नव्या उंचीवर नेले आहे. ग्रॅफिन क्रांतिकारी मटेरिअल आहे, जे अद्वितीय संरक्षण व क्षमता देते. १२ वर्षांच्या वॉरंटीसह हे रि-इंजीनिअर केलेले पेंट एक्स्टीरिअर प्रोटेक्शनसाठी सर्वोत्तम आहे.

शत्रू मिसाईल्स व नॉन-स्टॉप हल्ले असे सर्वकाही प्रयत्न करतात, पण सेफ हाऊस प्रबळपणे उभे राहते. ही जाहिरात प्रखर सूर्यप्रकाश, मुसळधार पाऊस किंवा धूळ अशा प्रत्येक घटकांपासून अल्टिमा प्रोटेकच्या संरक्षण क्षमतेला सुरेखरित्या सादर करते.

मोहिम गुप्तहेर व नाविन्यतेला एकत्र करत ग्रॅफिनद्वारे समर्थित अल्टिमा प्रोटेकच्या अद्वितीय कार्यक्षमतेला दाखवते. सेफ हाऊसमधून घरांचे बाहेरील आव्हानांपासून संरक्षण करण्याप्रती ब्रँडचे वचन दिसून येते.

नवीन व उत्साहवर्धक अल्टिमा प्रोटेक जाहिरात येथे पहा: यूट्यूब लिंक - https://www.youtube.com/watch?v=V7PQGT4rJdk

नवीन अल्टिमा प्रोटेक कॅम्पेनबाबत मत व्यक्त करत एशियन पेंट्सचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सिंगले म्हणाले, एशियन पेंट्समध्ये आम्ही करणाऱ्या प्रत्येक गोष्टीमध्ये नाविन्यता आणि तंत्रज्ञानाला प्राधान्य देतो. रोयालमधील टेफ्लॉनपासून अल्टिमा प्रोटेकमधील लॅमिनेशन आणि आता अद्भुत मटेरिअल ग्रॅफिनपर्यंत आम्ही सतत श्रेणीमध्ये नवीन बेंचमार्क्स स्थापित केले आहेत. ग्रॅफिन-समर्थित अल्टिमा प्रोटेकसह आम्ही भारतीय घरांसाठी प्रबळ संरक्षण देत आहोत. तंत्रज्ञान-संचालित सोल्यूशन्सवर लक्ष केंद्रित करत आमचा ग्राहकांसाठी निर्णय घेण्याची प्रक्रिया सोपी करण्याचा, तसेच त्यांना त्यांच्या घरांसाठी सर्वोत्तम घटक निवडण्यास मदत करण्याचा मनसुबा आहे.

# मालिका 'अटल'मधील प्रमुख कलाकार अटल बिहारी वाजपेयी यांचे मूळगाव ग्वाल्हेरला भेट देणार आहेत

**मुंबई, ७ दिसंबर :** गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सुरू झालेली एण्ड टीव्हीवरील मालिका अटल'ने भारतातील सर्वात प्रख्यात नेत्यांपैकी एक स्वर्गीय श्री. अटल बिहारी वाजपेयी यांच्या सुरूवातीच्या काळाला उत्तमरित्या सादर करत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. यंदा डिसेंबरमध्ये मालिका पहिल्या वर्धापन दिनाला साजरे करत असताना मुख्य कलाकार यंग अटलची भूमिका साकारणारा आयुध भानुशाली आणि कृष्णा देवी वाजपेयीची भूमिका साकारणाऱ्या नेहा जोशी ११ डिसेंबर २०२४ रोजी श्री. अटल बिहारी वाजपेयी यांचे जन्मस्थान ग्वाल्हेरला भेट देण्याची तयारी करत आहेत. या भेटीचे मोठे महत्त्व आहे, कारण या महान नेत्याचा जन्म महिना डिसेंबर आहे. या मोठ्या टप्प्याबाबत सांगताना आयुध भानुशाली (यंग अटल) म्हणाला, युवा अटल बिहारी वाजपेयी यांची भूमिका साकारणे माझ्यासाठी स्वप्न पूर्ण झाल्यासारखे आहे. प्रत्येक सीनमधून मला या महान नेत्याचे जीवन व तत्त्वांबाबत नवीन काहीतरी शिकायला मिळते. मी ग्वाल्हेरला भेट देण्यासाठी खूप उत्सुक आहे. मी भेट देणाऱ्या, तसेच त्यांच्या जीवनाचे महत्त्व असलेल्या ठिकाणांची यादी तयार केली आहे. मालिकेच्या यशाला साजरे करण्यासाठी यासारखा उत्तम मार्ग नाही आणि मी प्रेम व पाठिंब्याचा सतत वर्षाव करणाऱ्या प्रेक्षकांचे आभार व्यक्त करतो.''

मालिका अटल'मध्ये कृष्णा देवी वाजपेयीची भूमिका साकारणाऱ्या नेहा जोशी आपला आनंद व्यक्त करत म्हणाल्या, मालिकेच्या पहिल्या वर्धापन दिनाला साजरे करण्यासाठी श्री. अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्म ठिकाण ग्वाल्हेरला भेट देणे अत्यंत विशेष अनुभव असणार आहे. डिसेंबर अटलजींचा जन्म महिना देखील आहे, ज्यामुळे ही ट्रिप अधिक अर्थपूर्ण आहे. आम्ही पहिल्यांदा मालिकेसाठी काम करायला सुरूवात केली तेव्हा आमच्या टीमने ग्वाल्हेरला भेट दिली आणि त्यांच्या जीवनाबाबत माहिती मिळवली, तसेच शहरातील काही आकर्षक ठिकाणी चित्रीकरण देखील केले. यावेळी, मी त्यांचा निवास, शिक्षण घेतलेल्या आणि मोठे झालेल्या ठिकाणांना भेट देण्यास उत्सुक आहे. त्यांचा वारसा आणि मालिकेच्या प्रवासाला सन्मानित करण्याचा हा अद्भुत आनंद आहे. ही भेट भावनिक व संस्मरणीय अनुभव देईल, जेथे आम्ही असाधारण नेत्याच्या मूळ बाबींशी पुन्हा कनेक्ट होऊ, ज्यांची गाथा आजही लाखो व्यक्तींना प्रेरित करत आहे.'' या मालिकेबाबत सांगताना अभिनेत्री पुढे म्हणाल्या, भारतातील ब्रिटीश वसाहतवादी राजवटीच्या पार्श्वभूमीवर ही मालिका अटलबिहारी वाजपेयी यांच्या बालपणाला सादर करेल. तसेच घटना, विश्वास व आव्हानांवर प्रकाश टाकेल, ज्यामुळे ते महान नेते ठरले. या मालिकेचे कथानक त्यांचा विश्वास, मूल्य व विचारसरणीवर मोठा प्रभाव टाकलेल्या त्यांच्या आईसोबतच्या त्यांच्या नात्याला दाखवेल. एकीकडे भारत ब्रिटीश राजवटीत गुलामगिरीचा सामना करत होता तर दुसरीकडे अंतर्गत वादविवाद व संपत्ती असामानता, जात, भेदभाव याला तोंड देत होता. अटल यांच्या आईने अखंड भारताची संकल्पना केलेले स्वप्न हे त्यांनी मनापासून जपले होते. मालिकेचे कथानक विनम्र कुटुंबातील प्रामाणिक मुलगा आणि भारताचे महान नेते अटल बिहारी वाजपेयी यांची प्रेरणादायी कथा सादर करते.''

# वीच्या नवीन सुपर हिरो प्रीपेड प्लॅनमध्ये मध्यरात्रीपासून दुपारपर्यंत अनलिमिटेड डेटाचा लाभ मिळणार

**मुंबई, ७ दिसंबर :** एकमेकांसोबत संवाद, शेयरिंग असो, शिक्षण, काम किंवा मनोरंजन असो, प्रत्येक गोष्टीसाठी इंटरनेट आवश्यक आहे, अखंडित डेटा उपलब्ध असणे ही काळाची गरज बनली आहे.

अखंडित आणि चिंतामुक्त डिजिटल अनुभव प्रदान करण्याच्या आपल्या बांधिलकीला अनुसरून, भारतातील आघाडीची टेलिकॉम कंपनी वी ने सादर केला आहे सुपर हिरो प्लॅन, भारतातील प्रीपेड युजर्ससाठी हा अनोखा प्लॅन वी ने तयार केला आहे. टाचा उपयोग करण्याच्या नवनवीन पॅटर्न्सना अनुरूप असलेला सुपर हिरो प्लॅन युजर्सना डेटा संपण्याची चिंता न करता जास्तीत जास्त डिजिटल अनुभव घेता यावा यासाठी तयार करण्यात आला आहे. या प्लॅनमध्ये प्रीपेड ग्राहकांना रात्री १२ ते दुपारी १२ पर्यंत अनलिमिटेड डेटाचा आनंद घेता येईल. वी च्या अतिशय यशस्वी ठरलेल्या हिरो प्लॅनचा आधीच लाभ घेत असलेल्या, डेटा-सॅव्ही युवकांसाठी वी ने हा अजून जबरदस्त प्लॅन सादर केला आहे. सकाळच्या वेळेत कामांना प्राधान्य देणाऱ्या महिलांचे वेळापत्रक लक्षात घेऊन, अधिक जास्त डेटा लाभ मिळवून देत त्यांच्या गरजा देखील वी ने पूर्ण केल्या आहेत.

उर्वरित अर्ध्या दिवसासाठी वी अतिरिक्त डेटा लाभ देणार आहे जेणेकरून त्यांच्या ग्राहकांना अखंडित कनेक्टिविटीचा आनंद घेता येईल. वी सुपर हिरो रिचार्जमधून मिळणारे इतर प्रमुख लाभ:

वीकएन्ड डेटा रोलओव्हर: न वापरलेला वीकडे डेटा कॅरी फॉरवर्ड करून वीकएन्डला वापरता येईल, त्यामुळे युजर्सना अधिक डेटा वापर अधिक लवचिकपणे करता येईल.

डेटा डिलाईट: महिन्यातून दोनदा युजर्सना २ जीबी अतिरिक्त डेटा कोठेही अतिरिक्त शुल्क न भरता, वी ॲपमार्फत किंवा १२१२४९ डायल करून अनलॉक करता येईल.

सुपर हिरो प्लॅन दर दिवसाला २ जीबी च्या किंवा यापेक्षा जास्त डेटा कोटा देणाऱ्या रिचार्ज पॅकसोबत उपलब्ध होईल. महाराष्ट्र, नवी दिल्ली, गुजरात, तामिळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल, पंजाब आणि हरयाणा या राज्यांमधील युजर्स याचा लाभ घेऊ शकतील. किंमत ३६५ रुपयांपासून पुढे.

# अदानी फाउंडेशनतर्फे गरीब ग्रामस्थांना सलूनचे साहित्य वाटप




**नागपूर, ७ दिसंबर :** अदानी पॉवर लिमिटेडच्या सीएसआर उपक्रमांतर्गत, अदानी फाउंडेशन आणि वात्सल्य बहुउद्देशीय कल्याणकारी संस्था यांनी संयुक्तपणे वडधामना गावात वैयक्तिक उपक्रम कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमाद्वारे वात्सल्य स्वयंसेवी संस्थेने वडधामणा येथील एका गरीब ग्रामस्थांना सलूनचे साहित्य दिले. श्री संजय अतकरे, एक शिक्षित व्यक्ती ज्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा होता, त्यांना गावच्या सरपंचाच्या मदतीने एक लहान ८ बाय ८ मेटल शीट शेड मिळाला. एक जुनी खुर्ची, कात्री आणि कंगवा घेऊन त्याने दुकान सुरू केले आणि दररोज ३०० रुपये कमवू लागले. सामान्य जीवन जगण्यासाठी आणि त्याच्या पाच जणांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्याला अधिक कमावण्याची गरज आहे. त्यालाही आपल्या मुलांना चांगले शिक्षण द्यायचे आहे. मात्र, त्याच्या दुकानात सुविधा आणि मशिनरी नसल्यामुळे ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. वात्सल्य स्वयंसेवी संस्थेने स्थानिक जीपी सदस्यांच्या मदतीने श्री अतकरे यांची ओळख पटवली आणि प्रस्तावित भागधारकाची वास्तविकता तपासली. पडताळणी केल्यानंतर, त्यांनी दुकानाच्या गरजा गोळा केल्या आणि सलून तज्ञाशी सल्लामसलत करून साहित्य खरेदी केले. या सामग्रीमध्ये सलून चेअर, हेअर ड्रायर, गाड्या आणि ट्रॉली, कातर आणि कात्री यांचा समावेश होता.

अदानी फाउंडेशन माझ्यासाठी देवासारखे आहे कारण ते माझ्या आयुष्यात आले आणि त्यांनी मला योग्य वेळी मदत केली, संजय म्हणाला. अदानी फाऊंडेशन आणि वात्सल्य स्वयंसेवी संस्थेने त्यांनी मागितलेल्या सर्व गोष्टी मोफत दिल्याचे त्यांनी व्यक्त केले.

अदानी एंटरप्रायझेस लिमिटेड कडून, धीरज पडोळे (व्यवस्थापक सिव्हिल), सुनील ठोंबरे (प्रशासन प्रमुख), हरीश लाड (वात्सल्य एनजीओ सीईओ), हिमांशू (प्रेरणा एनजीओ), आणि काही ग्रामस्थ कार्यक्रमाला उपस्थित होते. अभिषेक आणि मयूर (वात्सल्य एनजीओ फील्ड वर्कर) यांनी हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

# कलाकार सांगत आहेत हिवाळ्यातील त्यांच्या फिटनेस रूटिनबाबत!



**मुंबई, ७ दिसंबर :** तापमानात घट होत थंडी वाढू लागते तसे उबदार राहण्याचा आणि वर्कआऊट्स वगळण्याचा मोह वाढत जातो. पण, हिवाळा ताकद व रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यावर आणि एकूण आरोग्य उत्तम राखण्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी अनुकूल आहे. एण्ड टीव्ही कलाकार नेहा जोशी (कृष्णा देवी वाजपेयी, अटल'), स्मिता साबळे (धनिया, भीमा'), गीतांजली मिश्रा (राजेश, हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, भाबीजी घर पर है') थंडीच्या महिन्यांमध्ये सक्रिय, उत्साही व आरोग्यदायी राहण्यासाठी त्यांच्या फिटनेस रूटिनबाबत सांगत आहेत.

मालिका अटल'मध्ये कृष्णा देवी वाजपेयीची भूमिका साकारणाऱ्या नेहा जोशी म्हणाल्या, मी सकाळी १५ मिनिटे वॉर्म-अप करते, ज्यामध्ये फॉरवर्ड बेण्ड्स, स्पायनल ट्विस्ट्स व हॅमस्ट्रिंग स्ट्रेचेस असे स्ट्रेचिंग व्यायाम करते. यामुळे रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते, तसेच माझे स्नायू लवचिक राहतात आणि स्थायूंमध्ये ताठरपणा येण्याला प्रतिबंध होतो. मी उबदार राहण्यासाठी आणि माझी ताकद वाढवण्यासाठी योग व पिलेट्स यांसारखे इनडोअर वर्कआऊट्स करते. योग मला तणावाचे व्यवस्थापन करण्यात मदत करतो. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी मी झोपण्यापूर्वी ग्लासभर गरम हळदीचे दूध पिते. याचा माझ्या त्वचेला फायदा होतो आणि मला उत्तम झोप देखील मिळते. मी आहारामध्ये पालक, गाजर व बीट अशा हंगामी भाज्यांचा समावेश करते, ज्यामध्ये आवश्यक व्हिटॅमिन्स व मिनरल्स असतात. विशेषत: हिवाळ्यामध्ये आपण कमी पाणी पितो, ज्यामुळे हायड्रेटेड राहणे महत्त्वाचे आहे. म्हणून मी कॅमोमाइल किंवा पेपरमिंट सारख्या हर्बल चहा पिते, तसेच दिवसभर लिंबू व मध असलेले कोमट पाणी देखील पिते.''

मालिका भीमा'मध्ये धनियाची भूमिका साकारणाऱ्या स्मिता साबळे म्हणाल्या, हिवाळ्यामध्ये अनेकदा आपल्याला उबदारपणासाठी घरामध्येच राहावेसे आणि वर्कआऊट्स वगळावेसे वाटते, पण तंदुरुस्त राहण्यासाठी सातत्यता महत्त्वाची आहे. माझ्या रूटिनला अनुसरून मी सूर्यप्रकाशात घाम येण्यासाठी फास्ट मॉर्निंग वॉक करते, ज्यामुळे माझा मूड उत्साहित होतो आणि व्हिटॅमिन डी मिळाल्यामुळे आरोग्यदायी राहण्यास मदत होते.''

मालिका हप्पू की उलटन पलटन'मध्ये राजेशची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा म्हणाल्या, हिवाळ्यामध्ये सुस्त वाटू शकते, पण मी साध्या व प्रभावी फिटनेस रूटिनसह त्यावर मात करते. मी स्किपिंग, जम्पिंग जॅक्स व बर्पीज यांसारखे इनडोअर कार्डियो व्यायाम करते, यामुळे माझा हार्ट रेट उत्तम राहतो आणि माझी चयापचय क्रिया सक्रिय राहते. हे व्यायाम गतीमान व ऊर्जा देणारे आहेत, ज्यामुळे व्यस्त जीवनशैली असताना देखील सहजपणे करता येतात. हिवाळ्याचा आनंद घेण्यासाठी मी निसर्गाच्या सान्निध्यात चालायला जाते, किंवा आठवड्यातून एकदा लहानसे हाइक्स करते. बाहेर ताज्या हवेमध्ये गेल्याने माझा मूड उत्साहित होतो, तसेच निसर्गाशी कनेक्ट राहण्यास मदत होते. पोषण देखील महत्त्वाचे आहे. हिवाळ्यामध्ये माझ्या आहारात बदाम, अक्रोड व खजूर अशा ड्रायफ्रूट्सचा समावेश असतो, जे मला सक्रिय राहण्यास ऊर्जा देतात. मी रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आल्याची चहा व लेमन टी पिते. यामुळे माझे शरीर डिटॉक्सिफाय होते आणि सर्दी व ताप अशा हंगामी आजारांना दूर ठेवता येते.'' मालिका भाबीजी घर पर है'मध्ये अंगूरी भाबीची भूमिका साकारणाऱ्या शुभांगी अत्रे म्हणाल्या, हिवाळ्यामध्ये संतुलन राखणे महत्त्वाचे आहे - शरीराला आतून पोषण देण्यासोबत सक्रिय राहिले पाहिजे. मी शरीर लवचिक व मन शांत ठेवण्यासाठी दिवसाच्या सुरूवातीला योग व प्राणायाम (ब्रीदिंग एक्सरसाइज) करते. प्राणायाममुळे माझ्या फुफ्फुसाची क्षमता वाढते आणि उत्तम ऑक्सिजन प्रवाहाची खात्री मिळते, जे हिवाळ्यामध्ये आपण बहुतांश वेळ घरातच व्यतित करत असल्यामुळे अत्यंत महत्त्वाचे आहे. हिवाळ्यामध्ये माझ्या आहारात सूप, स्ट्यू व गरम खाद्यपदार्थांचा समावेश असतो आणि मी प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ खाणे टाळते. माझ्या त्वचेला पोषण मिळण्यासोबत कोरडी होण्याला प्रतिबंध करण्यासाठी मी भरपूर पाणी आणि गरम हर्बल चहा पिते. हिवाळा खडतर ठरू शकतो, पण योग्य दृष्टिकोनासह शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राखता येते.''

# जयंती उत्सव समिती तर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ७ :

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त वाडी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा प्रांगणात विविध संस्था, संघटना व पक्षांनी माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून भावपूर्ण आदरांजली वाहून अभिवादन केले. सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव तथा स्मारक समितीच्या वतीने माजी जि.प.सदस्य दिनेश बन्सोड,राजेश जंगले, माजी नगरसेवक प्रमोद भोवरे यांनी अनुक्रमे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध,सम्राट अशोक स्तंभ यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले.



सामाजिक कार्यकर्ता दिलीप भोरगडे यांनी सर्वांना सामुहिक त्रिशरण पंचशील ग्रहण करविले. यावेळी दोन मिनिटे मौन धारण करून बाबासाहेबांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संचालन गौतम तिरपुडे यांनी केले.

यावेळी 'बाबासाहेब अमर रहे' च्या घोषणा देण्यात आल्या.या अभिवादन कार्यक्रमाला माजी जि.प.सदस्य दिनेश बन्सोड, माजी उपसरपंच दिलीप मेंढे,मराठी चित्रपट दिग्दर्शक पराग भावसार, माजी ग्रा.पं.सदस्य कंठीराम तागडे, विश्वनाथ कुकसे,माजी नगरसेवक प्रमोद भोवरे, आशिष नंदागवळी, शिवसेनेचे शहराध्यक्ष मधु मानके पाटील, माजी उपसभापती रुपेश झाडे, अनिल पुंड, ईश्वर उके, भीमराव शेंडे, भगवान मेश्राम, नितेश जंगले, बाबुराव वासनिक, गजानन वासनिक, अनिल वानखडे, देवा दिवे, देवानंद राऊत, प्रवीण तायडे, रवी मेश्राम, सचिन खोब्रागडे, जितेंद्र पानतावणे, गजानन बन्सोड, मिलिंद बागडे, बबलू गजभिये, ममता मडके, कांताबाई नगराळे उपस्थित होते.

वाडी शहर काँग्रेस कमिटी जिल्हा महासचिव दुर्योधन ढोणे, नागपूर जिल्हा ग्रामीणचे कार्याध्यक्ष अश्विन बैस, वाडी शहर अध्यक्ष शैलेश थोराणे, पंकज फलके, भीमराव कांबळे, किशोर नागपूरकर, अशोक गडलिंगे, मंगेश चोखंद्रे, योगेश कुमकुमवार, आशीष पाटिल, गौतम तिरपुडे, पंडित भोरगड़े, संदीप रायजादा आदींनी अभिवादन केले.



# काँग्रेसच्यावतिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ७ :

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कामठी विधानसभा नागपूर ग्रामीण कार्यालय दुबे नगर हुडकेश्वर रोड नागपूर येथील विश्वरत्न महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. याप्रसंगी उमेश नगरीकर उपाध्यक्ष नागपूर जिल्हा काँग्रेस कमिटी व संदीप तेलरांधे महासचिव नागपूर जिल्हा काँग्रेस कमिटी वर्षा गुजर महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस सचिव विश्रांती भोयर अध्यक्ष महिला काँग्रेस कमिटी नरसाळा नलिनी आंबुलकर, आशा झाडे, वैशाली निंबुळकर, हिरा नंदनवार, अर्चना गजभिये, रेशमा सहारे, नयना गायकवाड, उषाताई गायकवाड, संगीता चौधरी, अर्चना वासनिक, मीरा पाटील, माधुरी चिचखेडे, शुभांगी बाराहाते, लता मांडवकर, सुरेखा बेले, सुजाता रामटेके, जयवंती खोब्रागडे, अर्पिता खोब्रागडे, प्रशांत भोसले, दादाराव मोहिते या कार्यक्रमाला सर्वांची उपस्थिती होती.

## निधन

### देवेंद्र सिरसाट



हिंगणा: तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व पत्रकार देवेंद्र भाई महादेव सिरसाट यांचे आज (७) दुपारी दोन वाजताच्या सुमारास निधन झाले. त्यांचे वय ५५ वर्ष होते. ते आंबेडकरी चळवळीत सक्रिय होते. काही दैनिक व साप्ताहिकात त्यांनी वार्ताहर म्हणून काम केले. त्यांच्या पार्थिवावर आज (८) सकाळी ११ वाजता डिंगडोह येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# फेटरी ग्रा.पं. तर्फे महापरिनिर्वाणदिनी महाभोजनदान

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ७ :

फेटरी ग्रामपंचायत व बोधिसत्व बौद्ध विहार यांच्या सयुंक्त सहकार्याने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने शांतीवन चिचोली येथे येणाऱ्या अनुयाया करिता महाभोजनदान करण्यात आले.



यावेळी फेटरीचे सरपंच रविंद्र खांबलकर, ग्रा.पं.सदस्य मुकेश ढोमणे, वकिल डोंगरे, ग्रामसचिव बालाजी गुट्टे, ग्रा.पं.कर्मचारी देवानंद ताजणे, कमलेश वाघमारे, सुनील दोडेवार, ज्ञानेश्वर बदकी, शुभम ठाकुर, सौरभ देवरकर,ज्ञानेश्वर ढबाले, उमेश धुमनखेडे, सुरेश सोमकुंवर, पोलीस पाटील निमजे ,ग्रामस्थ अमित अखंड, प्रफुल्ल पाहूणे व बोधिसत्व बौद्ध विहार फेटरी येथील मिना डोके, जयश्री सोमकुंवर,रेखा नारनवरे, पूनम नारनवरे, सुमन निकोसे, योगिता, यशोदाबाई काळबांडे,अनूसयाबाई बागडे ,अमोल संगोडे, भांगे परिवार व इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फोटोखरे, अर्चना बनसोडे यांनी थाटात पदभार स्वीकारला. तसेच मिठाई वाटून आनंद व्यक्त केला. यावेळी वंचित आघाडीचे नेते प्रबोधनकार अनिरुद्ध शेवाळे, मनीष बोरकर, माधुरी खोब्रागडे, माजी सरपंच रिता उमरेडकर , राहुल लांमसोंगे, राजेंद्र गजभिये, गाणार बालाजी मून, विनायक राव धुमटकर, रोहित राऊत, राजेश वानखेडे, प्रवीण अंबादे, सुमेध फुलझेले, रईस डोंगरे, दीपक कोरे, शरद ढोके, अनिल गणवीर, प्रवीण मून, नीतेश पुंडकर, मोनू बागडे, सुषमा भलाधरे, जोत्सना बेले, प्रीती वाकडे, चैत्रा पाटील, चंदा बोबडे, श्वेता सुखदेवे, ज्योती शिंगाळे, वर्षा बारमाटे,तसेच वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महामानवाला वाहिली श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ७ :

पारशिवनी तालुक्यातील वराडा गावात महापरिनिर्वाण दिनी महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित वराडा ग्रामपंचायत सरपंच सुनिल जामदार, पोलीस पाटील संजय नेवारे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्प हार अर्पण करुन अभिवादन केले. सरपंच सुनिल जामदार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. गावकऱ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्याला पुष्प अर्पित करुन आणि दोन मिनटाचा मौन धारण करुन श्रद्धांजली अर्पित केली.

या प्रसंगी उमेश मेश्राम, राहुल खोब्रागडे, अक्षय मेश्राम, सावन पाटील, हर्षल नेवारे, अक्षय लक्की, खुशाल पाटील, संजय मेश्राम, शिवदास डोंगरे, आयुष गजभिए, रोशन जामदार, शिलाबाई पाटील, विध्याबाई रामटेके, सुनिताबाई पाटील, पल्लवीताई गजभिए, चंद्रकलाबाई तानडेकर सह आदि नागरिक उपस्थित होते.

# पोरवाल कॉलेजमध्ये बाबासाहेबांना मानवंदना

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ७ :

शहरातील असलेले एकमेव सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिवसावर कार्यक्रम अध्यक्ष प्राचार्य डॉ. विनय चव्हाण तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन नागपुर विद्यापिठाचे सिनेट सदस्य डॉ. श्रीकांत भोवते, प्रमूख वक्ते व महाविद्यालयच्या रेणुका रॉय आदी उपस्थीत होते. कार्यक्रम समन्वयक प्रशांत ढोबळे यांनी बाबासाहेबांच्या केलेल्या महान कार्याविषयी आपल्या भाषणातुन प्रकाश टाकला. विद्यार्थी प्रज्वल सोळंकी, प्रकाश गोस्वामी , सृष्टी वाडीभस्मे आदींनी बाबासाहेबांच्या जीवना पासुन घेणारे बोधप्रद विचार मांडले. प्रमुख वक्ते रॉय यांनी बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाने प्रत्येकास जगण्याचा अधिकार दिला.

कार्यक्रमाचे संचालन सुषमा वासनिक तथा आभार प्रदर्शन सिद्धार्थ मेश्राम यांनी केले. उपप्राचार्य मनीष चक्रवर्ती, सुधीर अग्रवाल, विश्वनाथ वंजारी, स्वप्निल राठोड सहित प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी उपस्थीत होते. सर्वश्री नितीन मेश्राम, तुषार चौधरी, रासेयो कार्यक्रम अधिकारी विनोद शेंडे, जितेंद्र तागडे, आशा रामटेके, उमेश बांगर, प्रविण अंबादे, सीमा पाटील आदींनी कार्यक्रम सफलते अथक प्रयत्न केले.

# रागीट महाविद्यालयातर्फे महामानवाला मानवंदना



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ७ :

संविधानाचे जनक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले. दरवर्षी बाबासाहेबांच्या पुण्यतिथीचा हा दिवस महापरिनिर्वाण दिवस म्हणून साजरा केला जातो.

यंदा बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने दि.६ डिसेंबर २०२४ वार बुधवार ला रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय रामटेक येथे संस्थाध्यक्ष व प्राचार्य रविकांत रागीट यांच्या मार्गदर्शनाखाली बाबासाहेबांच्या प्रतिमेला मल्यार्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी बी.ए. प्रशासकीय च्या विभागप्रमुख प्रा.चेतना उके, बी.ए. प्रशा. नॅक समन्वयक प्रा. ज्ञानेश्वर नेवारे, तसेच इतर प्राध्यापक - प्रा. कला मेश्राम, प्रा. निकिता अंबादे, प्रा.अमित हटवार, प्रा. अनिल मिरासे, प्रा. विलास मडावी, प्रा. मयुरी टेंभुर्णे, प्रा.आकाश मोहबिया, प्रा. देवानंद नागदेवे, अतुल बुरडकर, राजेंद्र मोहनकर, गीता समर्थ, सुरेश कारेमोरे, सतीश कळंबे, सुनील पोटभरे, स्नेहा गाथे, आरती कुथे, संदीप ठाकरे इत्यादिसह मोठ्या या सर्वांनी मिळून कार्यक्रम यशस्वी रीतीने पूर्ण केले.

# किट्स मध्ये महिलांची सुरक्षितता व यूजीसी नियम २०१५ विषयक मार्गदर्शन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ७ :

कविकुलगुरु इंस्टिटयूट ऑफ टेक्नालॉजी अँण्ड सायंस (किट्स) रामटेक मध्ये महिला सुरक्षा सप्ताहच्या निमित्याने अंतर्गत तक्रार निवारण समिती (आयसीसी) तर्फे छत्रपती शिवाजी सेमिनार हाल मध्ये महीलांची सुरक्षितता व यूजीसी नियम २०१५ विषयक मार्गदर्शन कार्यक्रम ०५ डिसेंबरला आयोजीत केला.




कार्यक्रमाचे उद्घाटन संस्कृत विद्यापीठाच्या आयसीसी व महिला सेलच्या अध्यक्ष डॉ. राजश्री मेश्राम यांनी केले. अध्यक्षता प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांनी केली. या वेळी प्रामुख्याने आयसीसी प्रमुख प्रा. वैशाली पांडे, आयक्युएसी डीन व मेकैनिकल विभाग प्रमुख डॉ. यशवंत जीभकाटे सहित विभाग प्रमुख, डीन, प्राध्यापक व विद्याथीर्नी मोठ्या संख्येत उपस्थित होते. डॉ. राजश्री मेश्राम यांनी प्रेजेंटेशनच्या माध्यमातून उच्च शिक्षण संस्था मध्ये महीलांची सुरक्षितता व यूजीसी नियम २०१५ विषयक मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, कोणत्याही संस्थामध्ये महिला व पुरुष मधे भेदभाव न करता महिलांना समान संधी आहे. महिलांशी कोणी दुराचाराच्या भावनेतून काम करत असेल तर त्यानी संस्था अंतर्गत तक्रार निवारण समिती कड़े तक्रार करावी. प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे म्हणाले की महिला सुरक्ष्या सप्ताहच्या माध्यमातुन आयोजित कार्यक्रमामुळे महिला मधे जागरूकता वाढेल.

कार्यक्रमाकरिता किट्स चे संस्था सचिव वी. श्रीनिवासराव तसेच प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ. के. गजानन शर्मा, प्रा. श्रीनिवास रायडू, संगीता भूरे, रूपेश कठाने सहित इतरांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रयत्न केले. प्रस्तावना प्रा. वैशाली पांडे, संचालन,डॉ. स्नेहल मालोदे व आभार आयटी विभाग प्रमुख प्रा. सरोज शंभरकर यांनी केले.

# तारणा ग्रामपंचायतमध्ये महापरिनिर्वाण दिन



■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ७ :

गट ग्राम पंचायत कार्यालय तारणा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रसंगी सरपंच पराग तळेकर, गट ग्राम पंचायत सदस्य सुरज तांबे, विलास वरेकर, मारोती भगत, ग्रामविकास अधिकारी विजयकुमार लिंगायत, मुख्याध्यापक बावणगडे सर, लुचे, ढाकणे, स्वप्नाली दोरखंडे, अमोल खडसे, प्रमोद तांबे, माला खोकले व ग्रामस्थ प्रामुख्याने उपस्थित होते.

# हर्षिता सोरते एकल नाटकात राज्यस्तरावर प्रथम

■ महासागर प्रतिनिधी
उमरेड, दि. ७ :

शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई आणि राज्य शैक्षणिक संशोधन यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय कला स्पर्धा 2024-25 मध्ये जीवन विकास वनिता विद्यालयाच्या विद्यार्थिनी हर्षिता सोरते हिने एकल नाटक आणि स्वरा पेरके हिने कथाकथन स्पर्धेत प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे येथे सहभाग घेतला होता. नुकत्याच झालेल्या या स्पर्धेत हर्षिता सोरते हिने एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून केवळ नागपूर जिल्ह्याच च नव्हे तर महाराष्ट्राचे नावलौकिक केले आणि राष्ट्रीय स्पर्धेत आपले नाव समाविष्ट केले.




१ जानेवारी रोजी राष्ट्रीय कला उत्सव 2024-2025 प्रादेशिक शिक्षण संस्था, NCERT, भोपाळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत एकल नाटकात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. स्वतःच लिहिलेल्या आणि दिग्दर्शित केलेल्या एकल नाटकात त्यांनी उत्कृष्ट अभिनय आणि सर्व तांत्रिक बाबींवर आधारित उत्कृष्ट प्रयोग करून आपली कला चमकदारपणे दाखवली आणि राज्यस्तरावर प्रथम पारितोषिक पटकावले. तिला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. जीवन विकास वनिता विद्यालयाचा विद्यार्थी प्रथमच राष्ट्रीय स्तरावर एकल नाटकातून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

जीवन विकास वनिता विद्यालयाच्या प्राचार्या वर्षा टोंग, पर्यवेक्षक शशांत नंदनवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षिका वंदना पौनीकर, अनिता मोहोतकर, यांच्यामुळे शक्य झाल्याचे हर्षिता सोरते यांनी प्रतिक्रिया दिली. संस्थेचे अध्यक्ष डॉ.श्रावण पराते, सचिव प्रशांत सपाटे, सुरेश झुरमुरे, अजय घाटे, केशव माणूसमारे सदस्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांनी हर्षिता चे अभिनंदन केले तसेच रंजना पाटेकर, मनीषा निखाडे, सोपान आंधळे, क्षितीज तायडे, किरण कातुरे, रजनी सेलोकर, रंजना पटेकर, सुरेखा काडारकर यांनी पुढील यशासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रीय संत गाडगेबाबा यांना भारतरत्न मिळावा

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ७ :

धोबी समाजाने रामराजापासून लोकशाही, विजीत मध्ये खूप मोठे योगदान दिले आहे, गेल्या ७ वर्षापासून तेजस बहुउद्देशीय संस्था निस्वार्थीपणे गाडगे बाबांनी सांगितलेल्या १० कलमी काम करत असून अनेक निराधारांना त्याचा चांगला लाभ मिळत आहे.

संस्थेचा देणगीदार असो किंवा सहकारी पत्रकार, डॉक्टर, वकील, उद्योगपती, तेजस संस्थेच्या कायार्ला साथ देतो आणि सक्रियपणे संस्थेच्या पाठीशी उभा असतो. अरगुलेवार संघटनेचे सदस्य अर्जुन उपासे हे त्यांचे सहकारी मित्र पापिंदरसिंग बारबा यांच्यासह राष्ट्रीय संत गाडगे बाबांना भारतरत्न प्रदान करण्यासाठी धोबी समाज जोडोच्या यात्रेला निघाले आहेत.



याबाबत गाडगे बाबा धोबी समाजाच्या अनुयायांना सांगतात की, गाडगे बाबा हे स्वच्छतेचे जनक होते आणि त्यांचे बालपणीचे नाव डेबूजी होते. झिंगराजी जानोरकर था गाडगे बाबा यांचा जन्म 23 फेब्रुवारी 1876 रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील शेणगाव अंजनगाव येथे झाला. भीमराव आंबेडकरांनीही त्यांना आपले गुरू मानले आणि अशा संताला अनेक वर्षांपूर्वी भारतरत्न देऊन सन्मानित करायला हवे होते पण धोबी हा समाजाचा देव होता.

सरकारने आतापर्यंत भारतरत्नपासून वंचित ठेवले आहे, तर भारतातील धोबी समाज हा भारतीय जनता पक्षाच्या विचारांवर आधारित समाज असून, ऑक्टोबर २०२४ मध्ये ही संघटना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती मॅडम द्रौपदी यांना पत्र पाठवणार आहे मुरमु यांच्या मार्फत जिल्हा दंडाधिकारी नागपुरात पाठवा मात्र कुठेतरी सरकार गाडगेबाबांना भारतरत्न देण्याकडे दुर्लक्ष करत आहे, हे सांगून सरकारला धोबी समाज जोडो आणि संत गाडगेबाबांचा प्रवास.

भारताला पुनरागमन करण्याच्या मोहिमेसाठी भारत दौऱ्यावर आहे. चंद्रशेखर अरगुलेवार यांच्या या मोहिमेत धोबी समाज जागा झाला असून आता धोबी समाज सरकारशी लढण्यासाठी सज्ज झाला आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# भक्तिमार्ग

## कर्मयोग शिकवणारी गीता

**समस्त जनांना मार्गदर्शक ठरणारा पवित्र ग्रंथ म्हणजे भगवद् गीता. कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर योगेश्वर श्रीकृष्णाने धनुर्धारी अर्जुनाला दिलेला हा दिव्य संदेश आजच्या काळातही तुम्हा आम्हा सर्वांसाठी महत्त्वाचा आहे. यातून आपल्याला कर्मयोगाचा महान विचार मिळतो. धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक इतिहासाचं सार म्हणजे भगवद् गीता. गीता जयंतीनिमित्त हा विशेष लेख...**

युद्धाच्या कथा रम्य असल्या तरी युद्ध कधीच रम्य नसतं. युद्धात प्रचंड मनुष्यहानी, वित्तहानी होते त्याचबरोबर यामुळे अनेक सामाजिक संदर्भ बदलतात. या घुसळणीतून दरवेळी नवनीत मिळेल असं नाही, बरेचदा हलाहलदेखील वर येतं. ते पचवून पुढे जाणं ही अत्यंत कष्टदायी आणि समाजाला वेगळी चौकट देणारी बाब ठरते. म्हणूनच युद्धपूर्व आणि युद्धोत्तर परिस्थितीमध्ये महद् अंतर असतं. मात्र या भारतभूमीवर एक असंही एक युद्ध झालं ज्याने दिलेलं बोधामृत आजही समस्त मानवजातीसाठी उद्‌बोधक ठरत आहे. हेही युद्धच होतं. ते परक्यांशी नव्हे तर आप्तस्वकियांशी लढलं गेलं, अपरिमीत जीवितहानी झाली पण या युद्धाने एक धडा दिला जो युगानुयुगे उपयोगी पडणारा आहे. हे युद्ध होतं महाभारत युद्ध... म्हटलं तर हा एक कुटुंबकलह आहे, म्हटलं तर सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तींमधला संघर्ष आहे, म्हटलं तर साम्राज्यलालसा आहे, म्हटलं तर एका स्त्रीच्या मनातील विखाराची परिणिती आहे. वृद्धांची अगतिकता आहे आणि सर्वात म्हणजे या निमित्ताने श्रीकृष्णाने समस्त मानवजातीसाठी दिलेला संदेश आहे. महाभारत युद्धाला असे नानाविध कंगोरे आहेत, नानाविध पैलू आहेत. प्रत्येक पैलू आपल्याला नव्या विषयाचं ज्ञान देऊन जातो.

गीता संदेश म्हणजे मानवाने अनुसरावी अशी जगण्याची सुयोग्य पद्धत आणि योग्य जीवनशैलीच आहे. युद्धभूमीवर अर्जुनाने श्रीकृष्णाला विचारलेल्या, प्रश्नांच्या उत्तरतून गीता निर्माण झाली. युद्धभूमीवर रथ नेल्यावर, समोर आपले आप्तस्वकीय पाहून अर्जुनाच्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले. समोर युद्ध सुरू होतं, शंखनाद कानी पडत होते. पण या युद्धात अटळ असणारा गुरूवध, बंधुवध, सुहृदवध यातून मला काय मिळणार? आपण करायला निघालो आहोत ते योग्य की अयोग्य? अर्जुनाच्या मनात विचारांचं जाळं पसरत होतं. या भीतीमुळेच अर्जुनाचं मन युद्धास धजावत नव्हतं. दुर्योधन अत्याचारी आहे, पण त्याच्या बाजूने लढणारे सर्व माझे प्रियजनच आहेत. द्रोणाचार्य, भीष्म यांच्या अंगाखांद्यावर तर आपण लहानाचे मोठे झालो. अशा जेष्ठ– श्रेष्ठांबरोबर मी कसं युद्ध करू, त्यांच्यावर कसं शस्त्र उगारू, अशा मन:स्थितीतील अर्जुनाला योग्य मार्गदर्शन करण्यासाठी कोणी तरी हवं होतं. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, अर्जुन योद्धा नव्हता. अर्जुन खरा योद्धा होता फक्त आशंकेने ग्रासलेला होता.

या पार्श्वभूमीवर श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश म्हणजे जीवनाचं सार आहे. म्हणूनच मानवी जीवनात गीतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मार्गशीर्ष शुक्ल एकादशी हा दिवस भगवद् गीता जयंती म्हणून साजरा केला जातो. सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी कुरूक्षेत्राच्या रणभूमीवर योगेश्वर श्रीकृष्णाने अर्जुनाला दिव्य संदेश आणि एक महान विचार दिला. हाच संदेश भगवतद् गीतेच्या माध्यमातून भारतीयांच्या मनावर कोरला गेला आहे. गीता हे धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक इतिहासाचं सारच आहे. म्हणूनच संत ज्ञानेश्वर म्हणतात,

**आता भारती कमळ परागु ।**
**गीताख्यु प्रसंग ।।**

महाभारत हे कमळ मानलं तर गीता हा त्यातील पराग आहे. विनोबा भावे म्हणतात, 'गीता हा धर्मज्ञानाचा कोश आहे'. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् म्हणतात, 'भगवद् गीता तात्विक प्रबंध नव्हे तर एक धार्मिक ग्रंथ आहे. त्यामध्ये सत्याचं सम्यक दर्शन घडतं आणि मानवधर्माचं त्रिकालबाधित स्वरूपही कळतं'. सर्वांना नीट कळावी म्हणून ज्ञानेश्वरांनी संस्कृतमध्ये असणारी गीता प्राकृत भाषेत आणली.



**कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। माकर्मफल**
**हेतुर्भूर्मा ते सङ्गोडस्त्व कर्मणि।।**

सतत कर्म कर. तेही चांगलं कर्म कर. फळाची अपेक्षा करू नको. इतरांना मिळणाऱ्या धनावर दृष्टी ठेवू नकोस... ही शिकवण सध्याच्या वाढत्या भ्रष्टाचाराच्या जमान्यात किती उत्तम लागू पडते...

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमव सादयेत्।**
**आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मन:।।**

माणसाने नेहमी स्वत:चा उद्धार करावा, म्हणजे स्वत:च स्वत:चा उद्धार करावा. निराश होऊ नये. बुद्धीचा वापर न केल्यामुळे शत्रुत्व निर्माण होतं. भगवद् गीता आजही हीच प्रेरणा देते. भगवद् गीतेत महान ज्ञानसागर सामावला आहे. बाळ गंगाधर टिळकांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून सामान्यांचं लक्ष भगवद् गीतेकडे वेधून घेतलं. आधुनिक काळातही आपण गीतेचं तत्त्वज्ञान वापरलं पाहिजे. पण आपण पूर्वीच्या युद्धपद्धती, महाभारतातील युद्धनीती–नियमांचे आचरण याबाबत कोण कितपत विचार करतो हा प्रश्नच पडावा. पूर्वी युद्धाचे नियम असत. सूर्यास्तानंतर युद्ध थांबत असे. विशेष म्हणजे या नियमाचं काटेकोर पालन केलं जात असे. आता कोणाला कोणतेच नियम पाळायचे नसतात.

गीता जयंती विशेष

युद्धाच्या वेळी द्विधा मन:स्थितीतील अर्जुनाला कृष्णाने मार्गदर्शन केलं तीच 'गीता' होय. गीतेत सुखाचे तीन वर्ग केले आहेत. सात्विक, राजस आणि तामस. जे सुख प्रथम विषासारखं किंवा अवघड वाटतं, तेच नंतर गोड असतं. हे सुख म्हणजे सात्विक सुख . हे सात्विक सुख आत्मनिष्ठ बुद्धीच्या प्रसन्नतेपासून मिळतं. राजस सुख प्रथम अमृतासारखं असतं पण शेवटी विषसमान बनतं. तामस सुख हे निद्रा, आळस आणि प्रमास यापासून उत्पन्न होतं. ते प्रारंभी आणि शेवटी माणसाला मोहात पाडतं. या सुखात माणूस गुंतून पडतो. सुख आणि दु:ख या एकाच नाण्याच्या दोन भिन्न बाजू. सुख कितीही मिळालं तरी कमीच वाटतं. पण, थोडं दु:ख मिळालं तरी आपल्याला सतत दु:खच मिळत असल्याची भावना प्रबळ होत जाते. म्हणूनच निष्काम बुद्धीने प्रयत्न, कष्ट आणि कर्म केलं पाहिजे. माणसाला कर्मे चुकत नाहीत. ज्ञानी माणसालाही ती चुकत नाहीत.

म्हणूनच प्रत्येकाने आपलं कर्म केलं पाहिजे. फळाची आशा न करता सतत चांगलं कर्म करत राहिलं पाहिजे. स्वार्थ साधण्यासाठी, कोणतीही लाचलुचपत, भ्रष्टाचार न करता जीवनभर काम करा हाच संदेश गीतेने दिला आहे. लोकहिताची कामं करताना ती कोणत्या बुद्धीने केली जातात याला अधिक महत्त्व आहे. उदाहरणार्थ, एखाद्या संस्थेला देणगी देणं हे चांगलं काम आहे पण ती कोणत्या हेतूने दिली...कीर्तीसाठी, स्वत:च्या पापावर पांघरुण घालण्यासाठी, त्या संस्थेवर वचक, वजन रहावं म्हणून... अशा बुद्धीने केलेलं कर्म निष्काम नाही. ते लाभासाठी आहे. म्हणूनच हे दान खरं नाही असं गीता सांगते.

धर्मशास्त्र लोकांच्या कल्याणासाठी आहे. संसार करत असताना सर्व व्यवहार विरक्त बुद्धीने करावेत असं गीता सांगते. म्हणजेच 'कर्मयोग' हीच गीतेची शिकवण आहे. भगवान श्रीकृष्ण सांगतात,

**यदा यदा ही धर्मस्य, ग्लानिर्भवती भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य, तदात्मानं सृजाम्यहम् ।।**
**परित्राणाय साधूनां, विनाशायच दृष्कृताम ।**
**धर्मसंस्थापनार्थाय, सम्भवामि युगे युगे ।।**

धर्माला (समाजाला) ग्लानी येते तेव्हा तेव्हा त्यांचा उत्कर्ष करण्यासाठी, मी युगायुगात जन्म घेतो आणि जनहिताची कामं करतो. ही कामं करताना माझ्या मनात असक्ती नसते. त्यामुळे कोणत्याही कर्माचं पाप–पुण्य मला लागत नाही. निष्काम कर्म करणं हा एक श्रेष्ठ प्रतीचा यज्ञच होय. अनेक युगं, वर्षे लोटली तरी भारतीयांच्या मनात गीतेविषयीचा आदर कायम आहे. पुढेही तो राहणार आहे. गीतेने आपल्याला जगण्याचं तत्त्वज्ञान दिलं. आधुनिक काळातही या तत्त्वज्ञानाची गरज आहे. गीतेमध्ये काय नाही? ज्ञान आहे, भक्ती आहे, योग आहे, संन्यास आहे, वैराग्य आहे. गीता पठण करताना कर्मयोगाचा पुरस्कार दिसून येतो. गीतेच्या प्रत्येक अध्यायात एका साखळीतील अनेक दुव्यांप्रमाणे हा कर्मयोग सुसंबद्ध गुंफलेला आढळतो. आयुष्यातही ही सुसंबंद्धता यावी यासाठी गीता अभ्यासायलाच हवी.

## दत्तराज माउली...

**हिंदू धर्मात मार्गशीर्ष महिन्याला मोठं महत्त्व आहे. मार्गशीर्षातल्या गुरूवारी उपवास केले जातात. याच महिन्यात मार्गशीर्ष पौर्णिमेला श्री दत्तात्रयांचा जन्म झाला. म्हणूनच मार्गशीर्ष पौर्णिमा दत्त जयंती म्हणून साजरी केली जाते. या दिवशी भक्तजन दत्तभक्तीत रममाण होऊन जातात.**



दत्त म्हणजे ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिदेवांचं एकत्र रूप. दत्त म्हणजे दत्तात्रेय. या नावाचा अर्थ जाणून घ्यायचा तर दत्त म्हणजे दाता, देणारा तर आत्रेय म्हणजे अत्रींचा पुत्र. दत्त हे अत्री मुनी आणि अनुसूया मातेचे सुपुत्र. दत्त म्हणजे साक्षात जगतगुरू. दत्त महाराजांनी जगाला जीवनाचं तत्त्वज्ञान सांगितलं. दत्तगुरु संपूर्ण जगाचे गुरू बनले. दत्त महाराजांना मानणारा, त्यांच्यावर श्रद्धा असणारा संप्रदाय म्हणजे दत्त संप्रदाय. श्री दत्त हे पहिले अवतार. त्यानंतर श्रीपाद श्रीवल्लभांनी अवतार घेतला. नृसिंह सरस्वती, स्वामी समर्थ, गजानन महाराज, साईबाबा हे दत्ताचे अवतार मानले जातात. यासोबतच माणिक प्रभू, शंकर महाराज, श्री वासुदेवानंद सरस्वती म्हणजे श्री टेंबे स्वामी हे सुद्धा दत्तावतारी. गिरनार पर्वत हे दत्ताचे निवासस्थान. यासोबतच पीठापूर, कुरवपूर तसंच नृसिंहवाडी ही दत्ताची अत्यंत पवित्र अशी स्थानं मानली जातात. नृसिंहवाडीला श्री दत्त नृसिंह सरस्वतींच्या रूपात आहेत. याठिकाणी नृसिंह सरस्वती म्हणजे दत्त महाराजांच्या पादुका आहेत. या पादुकांचं पुजन इथे केलं जातं. हे स्थान म्हणजे महाराजांची राजधानी मानलं जातं. श्री दत्त हे स्मर्तृगामी म्हणजे स्मरण करताच हजर होणारे, भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण करणारे आणि वाट चुकलेल्या भक्तांना योग्य मार्गाला आणणारे दैवत मानले जाते. अत्यंत प्रेमळ आणि भक्तवत्सल अशी ही देवता आहे. दत्ताच्या स्मरणमात्रे सगळ्या चिंता, ताणतणाव दूर होतात. अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त म्हणताच मनाला आत्मिक समाधान लाभतं. दत्त महाराज आपल्या जवळच आहेत. त्यांचा आशिर्वाद आपल्या सोबत आहे याची जाणीव पदोपदी होत राहते. महाराजांच्या स्मरणाने षड्रिपुंवरही मात करता येते. सुखकारक आणि मंगलदायी अशी ही देवता आहे.

धार्मिक उत्सव

दत्त महाराजांनी या जगाला अष्टांग योगाची देणगी दिली. सगुण रूपातल्या दत्तात्रेयांना तीन मुखं आणि सहा हात आहेत. त्यांच्या फोटोमध्ये आपण चार श्वान पाहतो. हे श्वान म्हणजे चार वेद आहेत, असं मानलं जातं. दत्त महाराजांजवळ गायही असते. ही गाय म्हणजे कामधेनूचं रूप. दत्त महाराज गुरू आहेत. गुरू माउली आहेत. ही गुरूमाउली आपल्या भक्तांना पुढे जाण्याची वाट दाखवते. माणसाला भक्तीमार्गाला लावते. दत्त दिगंबरांच्या चरणी स्वर्गसुख लाभतं. महाराजांची कृपादृष्टी झाली की पारलौकिक सुखाचा मार्गही गवसतो. दत्ताच्या दर्शनाने भक्तांना खूप आनंद होतो आणि दत्तनामाचा जयघोष करत भाविक महाराजांचं मनोभावे दर्शन घेतात.

## प्रसन्नता जपा

कोणत्याही माणसाला आयुष्यात काय हवं असतं? भौतिक, पारलौकिक सुखासाठी आपण कर्म करतो त्यामुळे आनंद मिळणं अपेक्षित असतं. मन प्रसन्न करण्यासाठी आपण झटत असतो. संसारात रममाण होणारी व्यक्ती असो किंवा परमेश्वरप्राप्तीसाठी संसाराचा त्याग केलेला साधू असो, प्रत्येकाला आसक्ती असते ती आनंदाची, प्रसन्नतेची, समाधानाची... कोणाला भौतिक गोष्टींमधून सुख मिळतं तर कोणाला देवाच्या नामस्मरणाने आनंद मिळतो. पण सरतेशेवटी महत्त्वाचा असतो तो आत्मिक आनंद. प्रत्येक माणूस आपलं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी झटत असतो. प्रत्येकाला आयुष्यात काही ना काही मिळवायचं असतं. या लक्ष्याची प्राप्ती झाली की समाधान लाभतं. आध्यात्मिक मार्गावर चालणारी व्यक्तीही काहीतरी प्राप्त करण्यासाठीच झटत असते. परमेश्वर प्राप्ती झाली की तिला आनंद मिळतो.



आनंद मिळवण्याच्या उद्देशाने झपाटलेला माणूस कायम कार्यरत राहतो. त्याच्यात नवी ऊर्जा संचारते. आपलं लक्ष्य प्राप्त करण्यासाठी प्रत्येक माणूस प्रेरित झालेला असतो. माणूस समाधान मिळवण्यासाठी कष्ट करतो. समाधान मिळवण्याची तहान आपल्याला शांत बसू देत नाही. हेच जगण्याचं गमक आहे असं म्हणता येईल. आपल्या आयुष्यात अडचणी, दु:ख येतच असतात. पण त्यावर मात करण्यासाठी गरज असते ती प्रसन्न मानसिकतेची. नकारात्मक विचारांना दूर सारण्याची. छोट्या छोट्या गोष्टींमधून आनंद मिळवला की आयुष्यातली नकारात्मकता दूर होते. मन प्रसन्न आणि आनंदी असलं की सगळं काही सकारात्मक घडू लागतं. त्यामुळे आपण कायम आनंदी आणि प्रसन्न असलं पाहिजे. आयुष्यात येणाऱ्या अडचणींचा बाऊ करता कामा नये. परमेश्वराने प्रत्येकाला आनंद दिला आहे. मनुष्य आपल्या कर्मामुळे दु:ख भोगत असतो. त्यामुळे देवाला दोष देण्यात काहीच अर्थ नाही. आपण कर्म सुधारली पाहिजेत. हे साधलं तर कधीही प्रसन्नतेचा अभाव राहणार नाही.

बोध

## हाथी-घोडे बाबा का मंदिर

भारत हा देवळा–राऊळांचा देश आहे. इथली अनेक मंदिरं अनोखी मानली जातात. इथे नेहमीच्या मंदिरांपेक्षा काहीतरी वेगळं पहायला मिळतं. जमशेदपूरमध्येही असंच एक मंदिर आहे. जमशेदपूरपासून जवळपास दहा किलोमीटर अंतरावर सरायकेला नावाचं ठिकाण आहे. इथे रस्त्यालगत हाथी–घोडा बाबाचं मंदिर आहे. या मंदिरात मातीचे हत्ती आणि घोडे अर्पण केले जातात. याठिकाणी बोललेला नवस पूर्ण झाल्यानंतर हे हत्ती आणि घोडे अर्पण केले जातात. हे मंदिर ३०० वर्षांपूर्वी बांधण्यात आलं आहे. हत्ती–घोडे अर्पण करण्याच्या परंपरेमागेही काही कारणं आहेत. द्वापारयुगात भगवान श्रीकृष्ण आणि बलरामाने शेतीसाठी जमीन हुडकायला सुरूवात केली.



अनोखी तीर्थक्षेत्र

त्यावेळी हे दोघं घोड्यावरून या गावात आले होते. बलरामाने नांगराने इथल्या जमिनीवर खोदकाम केलं. हे ठिकाण गम्हरिया म्हणूनही ओळखलं जातं. श्रीकृष्ण आणि बलराम तिथून निघून गेले पण त्यांचे घोडे इथेच राहिले. तेव्हापासून याठिकाणी घोडेबाबाची पूजा होऊ लागली.

इथे सुरूवातीला महिलांना प्रवेश नव्हता पण काळानुरूप त्यात बदल झाले आणि ही कुप्रथा बंद झाली. कुंभार जातीचे लोक या मंदिराची व्यवस्था बघतात. या जमातीतल्या महिला मंदिरात प्रवेश करत नाहीत पण अठरा वर्षांखालच्या मुली मंदिरात प्रवेश करू शकतात. मकर संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी मंदिरात बरीच गर्दी होते. नवस बोलले जातात. नवस पूर्ण झाल्यानंतर मातीचे हत्ती आणि घोडे अर्पण केले जातात.

## पशुबळी नकोच

हिंदू धर्मात अनेक प्रथा, परंपरा आहेत. पण कालबाह्य झालेल्या काही परंपरा अद्यापही पाळल्या जातात ही काळजीची बाब आहे. परंपरेच्या नावाखाली अनेक चुकीच्या गोष्टींना प्रोत्साहन दिलं जातं. त्यापैकी एक प्रथा म्हणजे पशुबळी. हिंदू धर्मातल्या अनेक देवतांपुढे जनावरांचा बळी दिला जातो. पूर्वी असं करत होते म्हणून आजही आंधळेपणाने तीच प्रथा सुरू ठेवली जाते. पण चालत आल्या आहेत म्हणून किंवा आंधळेपणाने अशा प्रथा पार पाडणं अयोग्य आहे. ऋग्वेदातही पशुबळी निषिद्ध मानण्यात आला आहे. मा नो गोषु, मा नो अश्वेसु, रीरिष:। म्हणजे आमच्या गायी आणि घोड्यांना मारू नका असं सांगितलं आहे. पशुबळीच्या प्रथेबाबत विविध मतप्रवाह आहेत. हिंदू धर्मात अनेक लोकपरंपरांना प्रथेचं रूप देण्यात आलं आहे. तांत्रिक–मांत्रिक पशुबळी देतात पण याला कोणताही धार्मिक आधार नाही.



अनेक जातींमध्ये मुलाच्या जन्मानंतर पशुबळी देण्याची पद्धत आहे. लग्नप्रसंगीही पशुबळी दिले जातात. पण या चुकीच्या प्रथा असल्याचं धर्माच्या अभ्यासकांचं म्हणणं आहे. एकंदरित काय तर प्रथा आणि परंपरा मनुष्याने आपल्या सोयीनुसार बनवल्या आहेत. त्यात काळानुरूप बदल होणं आवश्यक आहे.

धर्मशास्त्रातून...

## महती सकारात्मक ऊर्जेची



मंदिरात गेल्यावर आपल्याला शांत आणि निवांत वाटतं. मानसिक ताणतणाव दूर झाल्याची जाणीव होते. काही काळ मंदिराच्या गाभाऱ्यात बसल्यावर मनाला समाधान लाभतं. मंदिरात गेलेल्या प्रत्येक भक्ताला ही अनुभूती येत असते. म्हणूनच तणाव वाढला, अस्वस्थ वाटू लागलं की भक्तांचे पाय मंदिरांकडे वळू लागतात. मंदिर परिसरात सकारात्मक ऊर्जेचा वास असतो. या ठिकाणी मूर्तीरूपात परमेश्वराचं अस्तित्त्व असतं. मंदिराच्या गाभाऱ्यात आपल्याला जास्त शांत वाटतं. याचं कारण याच भागात सर्वाधिक सकारात्मक ऊर्जा असते. मंदिरातल्या मूर्तीच्या ठिकाणी काहीसा अंधार असतो. अंधार आणि गाभाऱ्यातली शांतता याचा एकत्रित परिणाम होऊन आपल्या शिष्यवृत्ती शांत होतात.

मंदिरात प्रवेश केल्यानंतर आपली पंचेंद्रिये सजग होतात. आपल्या शरीराला एका पवित्र ठिकाणी आल्याची जाणीव होत असते हे सप्रमाण सिद्ध झालं आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात हवाहवासा थंडावा जाणवतो. मंदिराच्या विशिष्ट प्रकारच्या रचनेमुळेही आपल्याला सकारात्मकतेची जाणीव होते. मंदिर बांधताना वास्तूशास्त्राचा विचार केलेला असतो. गाभाऱ्यात उत्तरेकडून चुंबकीय आणि विद्युत लहरी याव्यात यादृष्टीने रचना केली जाते. देवाची मूर्ती गाभाऱ्याच्या मधोमध असते. या भागात सकारात्मक ऊर्जा सर्वात जास्त प्रमाणात असल्याने मूर्तीची स्थापना इथेच केली जाते.

जाणून घ्या

## जोडीदार शोधताय?

**उत्तम नोकरी, नाकी डोळी नीटस, स्वत:चं घर इतकं सगळं असूनही अनेक मुलामुलींची लग्न ठरत नाहीत. तसं पहायला गेलं तर लग्न न ठरण्याचं कोणतंही कारण नसतं. पण विवाहयोग जुळून येत नाही हेच खरं! यामागे अनेक कारणं असतात. ग्रहदोष किंवा इतरही काही दोष असू शकतात. वास्तूदोषांमुळेही विवाह ठरण्यात विलंब होतो. फेंगशुईतल्या काही उपायांमुळे ही समस्या सोडवता येते.**



तुमची खोली सजवा. खोलीत छानशी चित्रं, वॉलपेपर्स लावा. निसर्ग चित्रांना प्राधान्य द्या. यामुळे तुमच्या शरीरात सकारात्मक ऊर्जेचा वास राहील. खोलीच्या दक्षिण–पश्चिम कोपऱ्यात एखादा क्रिस्टल ठेवा.

वास्तू

* खोलीत एकच खुर्ची ठेऊ नका. त्याऐवजी एकापेक्षा अधिक जण बसू शकतील असा सोफा ठेवा. दक्षिण–पश्चिम दिशेकडच्या भिंतींना लाल रंग द्या. ही भिंत नातेसंबंधांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते.
* पलंग आणि भिंत यात अंतर असू द्या. पलंग भिंतीला चिकटून ठेऊ नका. झोपताना पाय दाराकडे करू नका. डोकं कुठल्या बाजूला असावं, यासाठी फेंगशुई तज्ज्ञाचा सल्ला घेता येईल.
* जीवनात रंग भरा. तुमच्या खोलीला गुलाबी रंग द्या. गुलाब किंवा कोरल रंग जोडीदाराला आकर्षित करू शकतात.
* नातेसंबंध उत्तम असावे असं वाटत असेल तर बेडरूममध्ये टीव्ही ठेऊ नका. टीव्हीमुळे आपल्याला निवांतपणा मिळत नाही. खाजगी क्षण अनुभवता येत नाहीत. ही बाब भावनिक विश्वात अडथळा आणणारी ठरेल. म्हणूनच ते टाळा.

# मुख्यमंत्र्यांच्या शहरात १५ हजार कोटींची गुंतवणूक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :
शहराजवळील बुटीबोरी पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत जेएसडब्ल्यू कंपनीला लिथियम-आयन बॅटरी प्रकल्प उभारण्यासाठी सलग ६०० एकर जमीन हवी आहे. परंतु सलग एवढी जमीन अतिरिक्त बुटीबोरी एमआयडीसीत उपलब्ध नसल्याने राज्य सरकारने ४५० एकर जमीन देऊ केली आहे.

राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी जेएसडब्ल्यू समूह नागपुरात गुंतवणूक करीत असल्याची घोषणा केली होती. तसेच त्यावेळी घोषणा झालेल्या फ्रान्सच्या पर्नो रिका कंपनीचे माल्ट डिस्टिलरी अँड मॅन्युफॅक्चरिंग आणि अवाडा ग्रुपच्या अवाडा इलेक्ट्रो या नवीन प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे. जेएसडब्ल्यू कंपनीला प्रस्ताव पत्र देण्यात आले आहे. ही कंपनी पहिल्या टप्प्यात १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.

सेलफोनपासून इलेक्ट्रिक वाहनांपर्यंत बॅटरीचे वेगवेगळे उपयोग आहेत. एमआयडीसीच्या बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत कंपनीला ४५० एकर जमीन देऊ करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात लिथियम बॅटरी प्लांटचा समावेश असेल आणि नंतर इतर उत्पादनांच्या श्रेणींसाठी ही सुविधा वाढवली जाण्याची शक्यता आहे.

अवाडा ग्रुप ही दुसरी एक कंपनी मार्चपर्यंत उत्पादनाचा पहिला टप्पा सुरू करणार आहे. बांधकाम जोरात सुरू असल्याची माहिती आहे. यावर्षी ऑक्टोबरमध्ये बुटीबोरी येथे अवाडाने आपल्या सौर मॉड्यूल आणि इलेक्ट्रोलायझर प्रकल्पाची पायाभरणी केली. वर्षभरात उत्पादन सुरू होईल, असा कंपनीचा विश्वास आहे. १३ हजार कोटी रुपयांपर्यंत ही कंपनी गुंतवणूक करणार आहे.

दरम्यान, या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होवून अनेकांना काम मिळणार आहे.

> जेएसडब्लू कंपनीला सलग ६०० एकर जमीन हवी आहे. तेवढी सलग जमीन उपलब्ध नाही. त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. अवाडा कंपनी आणि पर्नाड कंपनीचे काम सुरू झाले आहे.
> **मनोहर पोटे, प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी.**

## नागपुरातील एम्स रुग्णालयात यकृत प्रत्यारोपण केंद्र



**प्रस्तावित केंद्राची आरोग्य विभागाकडून पाहणी**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :
अवयव दान जनजागृतीवर सरकारकडून कोट्यवधींचा खर्च केला जातो. परंतु राज्यातील एकाही शासकीय रुग्णालयांत यकृत प्रत्यारोपण होत नाही.

मात्र आता नागपुरातील एम्स रुग्णालयात प्रस्तावित यकृत प्रत्यारोपण केंद्राची नुकतीच आरोग्य विभागाच्या चमूने पाहणी केली. त्याला लवकरच मंजुरी मिळणार असल्याने हे मध्य भारतातील पहिले शासकीय यकृत प्रत्यारोपण केंद्र ठरेल.

अतिमद्यपान, ह्यहिपॅटायटीस बी व ह्यसी, अनियंत्रित मधुमेह, रक्तदाब, कॉलेस्ट्रॉल व फॅटी लिव्हरमुळेही यकृत निकामी होण्याचे प्रमाण वाढत आहे. नागपुरात सध्या २०९ रुग्ण यकृताच्या प्रतीक्षेत आहेत.

यकृत प्रत्यारोपण केंद्र सुरू करण्यासाठी एम्स प्रशासनाकडून पुढाकार घेण्यात आला आहे. त्यानुसार केंद्राला प्रस्ताव दिल्यावर आरोग्य विभागाच्या चमूकडून एम्सच्या केंद्राची पाहणी करण्यात आली.

पाहणी समिती सकारात्मक असल्याची माहिती असून लवकरच एम्समधील यकृत प्रत्यारोपण केंद्राला मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. सध्या केवळ मुंबई महापालिकेच्या के. ई. एम. येथेच यकृत प्रत्यारोपण केंद्र मंजूर आहे.

एम्स या शासकीय रुग्णालयात हे केंद्र उपलब्ध झाल्यास गरजूंना अल्प दरात यकृत प्रत्यारोपणाची सोय उपलब्ध होईल. सध्या खासगी रुग्णालयातील या प्रत्यारोपणाचा खर्च गरीब व मध्यमवर्गीय रुग्णांच्या आवाक्यात नाही, हे विशेष.

नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या (मेडिकल) अखत्यारित असलेल्या सुपरस्पेशालिटी रुग्णालयातही यकृत प्रत्यारोपण केंद्र प्रस्तावित आहे. त्यानुसार येथे शल्यक्रिया गृह व अतिदक्षता विभाग तयार झाला आहे. परंतु विशेषज्ञ शल्यचिकित्सक उपलब्ध नसल्याने आवश्यक यंत्र खरेदीचा प्रश्न कायम आहे.

तज्ज्ञ मिळाल्यास सुपरस्पेशालिटीमध्ये दुसरे केंद्र सुरू होईल.हे राज्यातील पहिले शासकीय यकृत प्रत्यारोपण केंद्र असेल. त्यामुळे गरिबांना कमी दरात यकृत प्रत्यारोपण शक्य होईल, असे विभागीय अवयव प्रत्यारोपण समिती, नागपूरचे अध्यक्ष डॉ. संजय कोलते यांनी सांगितले.

# राजकारणामध्ये मोलापेक्षा मुल्यांना महत्व यायला हवे




**ज्येष्ठ साहित्यिक सुरेश द्वादशीवार यांनी व्यक्त केली अपेक्षा**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :
2014 ची निवडणूक ही निवडणूक वर्ष म्हणून गाजली. 2014 च्या लोकसभेतील भाजपाचा पराभव पाहता विधानसभेच्या निवडणुकीत आलेले निकाल हे सर्वांनाच अचंभित करणारे होते. किंबहुना महायुतीला मिळालेले यश हे लाडक्या बहिणींना दिलेल्या मोलाच्या जोरावर आले. तेव्हा महायुतीचे सरकार हे विकत घेतलेले सरकार आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

कॉंग्रेसने चाखलेली धुळ त्यांना आत्मपरिक्षण करण्यास भाग पाडते, असे प्रतिपादन 30 वर्षे यशस्वी संपादक म्हणुन कार्य करणारे राज्यशास्त्राचे अभ्यासक साहित्य क्षेत्रातील अग्रगण्य सुरेश द्वादशीवार यांनी निवडणुकीचा अन्वयार्थ 2024 या विदर्भ गौरव प्रतिष्ठान द्वारा आयोजित व्याख्यानात प्रेस क्लब येथे व्यक्त केले.

लोकशाही प्रणाली निवडणूक अपरिहार्य असते व लोकशाहीत निवडणुका लोकशाही सुदृढ करण्याकरिता आवश्यक असते. अशा निवडणुकांचे विश्लेषण व अन्वयार्थ लावणे आवश्यक असल्यामुळे त्या दृष्टीने विदर्भ गौरव प्रतिष्ठान द्वारा प्राध्यापक सुरेश द्वादशीवार यांचे प्रेस क्लब येथे निवडणुकीचा अन्वयार्थ 2024 या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा डॉ. गिरीश गांधी, बाळ कुलकर्णी, निलेश खांडेकर, प्रशांत वराडे, रुपाली मोरे उपस्थित होते.

सुरेश द्वादशीवार यांनी आपल्या व्याख्यानात इग्लंड, फ्रान्स, अमेरिकेच्या निवडणुकांची उदाहरणे देत ते म्हणाले की, अमेरिकेत उदार मतवादी असलेल्या कमला हॅरिस या जिंकुन येतील, अशी सा-या जगाची अपेक्षा असतांना पुरोगामी व उजव्या विचार सरणीचे डोनाल्ड ट्रम्प निवडुन आले. म्हणजेच, आश्चर्यकारकरित्या अमेरिकेने प्रतिगामी लोकशाहीला कल दिला, जे फार अनपेक्षीत होते.

बुध्दी ही व्यक्तीची असते, पण झुंडीला मन असते व समुहाचे मन हे स्थळ व काळा परत्वे बदलत असते. याचीच प्रचिती या निवडणुकीत आली. राहुल गांधी जी घटना दाखवित फिरत होते, त्याचा अर्थ हा घटनेने जनतेला दिलेला अधिकार अबाधित राहिला पाहिजे, असे त्यांचे सांगणे होते. जे ज्यांच्या पक्षाला लोकांपर्यत पोहचविता आले नाही. या निवडणुकीत कॉंग्रेसचे जे गणित चुकले, त्यासाठी त्यांना आत्मपरिक्षणाची गरज आहे. महायुतीचे सरकार म्हणजे मोल देऊन खरेदी केलेले सरकार आहे, असे त्यांनी ठासून सांगितले.

गिरीष गांधी यांनी आपल्या भाषणात म्हटले की, राजकारणात राजीव गांधींच्या काळापर्यत जी सभ्यता होती, ती आज रसातळाला गेलेली आहे. अमित शहा यांनी सोनिया गांधी यांना डान्सींग डॉल म्हटले, ही कुठली सभ्यता व अशा वेळेस महिला संघटना काय करतात? आज पैसे देऊन तिकीटा व उमेदवारी खरेदी केल्या जातात. तेव्हा या सर्व व्यवस्थेवर चिंतन व्हायला पाहिजे, असे ते आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन शुभदा फडणवीस यांनी केले व कार्यक्रमाला सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील रसिक उपस्थित होते.

## खिशातच मोबाईलचा स्फोट
## मुख्याध्यापकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ७ :
मोबाईल ही आज काळाची गरज ठरत आहे, मात्र हाच मोबाईल जीवघेणा ठरू शकतो याची कुणी कल्पनाही करू शकणार नाही. याच मोबाईलमुळे चक्क एका मुख्याध्यापकाला प्राण गमवावे लागले. ही धक्कादायक घटना साकोली तालुक्यातील सिरेगावबांध या गावात शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली.

मुख्याध्यापकाने खिशात ठेवलेल्या मोबाईलचा भयंकर स्फोट झाला. या स्फोटात मुख्याध्यापक गंभीर जखमी होऊन त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर त्याच्यासोबत असलेली व्यक्ती जखमी झाली आहे. सुरेश संग्रामे असं मृत शिक्षकाचं नाव आहे तर नत्थु गायकवाड असं जखमी असलेल्या व्यक्तीचं नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, सुरेश संग्रामे कुरखेडा तालुक्यातील कसारी जि.प. प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक होते. संग्रामे आणि गायकवाड हे दोघेही एका कार्यक्रमासाठी जात असताना अचानक संग्रामे यांच्या खिशातल्या मोबाईलचा फोनचा स्फोट होऊन कपड्याला आग लागली. त्या आगीत भाजल्याने त्यांना उपचाराकरिता रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर बाईकवर मागे बसलेले नत्थु गायकवाड हे गाडीवरुन पडल्याने ते गंभीर जखमी झाले आहेत.

मृत सुरेश भिकाजी संग्रामे हे गडचिरोली जिल्हा परिषदेच्या देसाईगंज/वडसा पंचायत समितीअंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कसारी येथे मुख्याध्यापक पदावर कार्यरत होते. त्यांचा अपघाती दुर्दैवी मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त करण्यात आहे. नत्थु यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात सध्या उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संग्रामे कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**


**E-TENDER NOTICE NO: 2024_DOAWB_1121984**

**(Supply, Installation, Fabrication, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic Rice Mill Machinery)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank- funded SMART Project. Borkanhar Farmer Producer Company Limited, At. Goregaon, Tal. Goregaon, Dist. Gondia is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org.in** tender and procurement section. The last date for submission of online bid is **26/12/2024 up to 16.30 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit,**
**SMART Project Dist. - Gondia**

## लोकरंग



# आंध्र प्रदेशातील नवीन टुरिझम हब

आंध्र प्रदेश, भारताचे एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असलेले राज्य, आता एक नवीन पर्यटन स्थळ सुरू करून पर्यटकीय आकर्षणांच्या नकाशावर ठसा उमठवत आहे. यामुळे आंध्र प्रदेशाच्या पर्यटन उद्योगाला नवा वळण मिळणार आहे.

आंध्र प्रदेशातील नवीन पर्यटन स्थळ सरप्राइज बीच रिसॉर्ट म्हणून ओळखले जात आहे. हे विशाखापट्टणम जिल्ह्यात सागरकिनाऱ्याच्या जवळ आहे. या ठिकाणी एक अत्याधुनिक रिसॉर्ट उभारण्यात आले असून, पर्यटकांना अत्यंत सुंदर निसर्गदृष्य आणि एक अद्वितीय अनुभव मिळवता येईल. विशाखापट्टणम द डोकल्ट डेस्टिनेशन म्हणून प्रसिद्ध आहे. याठिकाणी समुद्र, जंगल, आणि सहलींचे आकर्षण असलेले बरेच ठिकाणे आहेत. नवीन रिसॉर्ट पर्यटकांना आरामदायक निवासाची सुविधा देतो, तसेच तेथील संस्कृती आणि स्थानिक जीवनशैलीचे अनुभव घेण्याची संधी मिळवतो.

हा नवीन रिसॉर्ट विशाखापट्टणमच्या बाहेरील एका निसर्गदृश्य वादळ क्षेत्रात स्थित आहे. या ठिकाणी आंध्र प्रदेशाच्या सागरी किनाऱ्याचे सौंदर्य आणि साहसी क्रियाकलाप यांचा अनोखा मिलाफ आहे. रिसॉर्ट पर्यटकांना समुद्रकिनाऱ्यावर चालायला, जलक्रीडा आणि कॅम्पिंगसारख्या साहसी क्रियाकलापांचा अनुभव घेण्याची संधी प्रदान करतो.

विशाखापट्टणम शहराच्या प्रमुख स्थानिक स्थळांपासून साधारणपणे ५० किमी अंतरावर हे स्थळ आहे. रिसॉर्टच्या जवळच एक सुंदर समुद्रकिनारा आहे, जिथे पर्यटक आरामदायक वेळी सर्फिंग, वॉटर स्कीइंग, आणि बोटिंग सारख्या जलक्रीडांचा अनुभव घेऊ शकतात. आंध्र प्रदेशातील या नव्या पर्यटन स्थळावर पर्यटकांना एक अत्यंत सुंदर निसर्गाचा अनुभव मिळवता येईल. येथील शांत समुद्र किनारा, निळ्या पाण्याचा दृश्य, आणि उंच डोंगरांसोबत दिसणारा विस्तीर्ण आकाश हे सर्व एक अद्भुत निसर्गदृश्य तयार करतात.

सरप्राइज बीच रिसॉर्ट केवळ निसर्गदृश्य आणि साहसी क्रियाकलापांसाठी प्रसिद्ध नाही, तर येथे स्थानिक आंध्र संस्कृती आणि जीवनशैलीचाही अनुभव घेता येतो. रिसॉर्टच्या परिसरात स्थानिक कलाकृती, हस्तकला प्रदर्शनं, आणि पारंपरिक संगीत नृत्याचा आनंद घेता येईल.

■ ■ ■

## दक्षिण आफ्रिका पर्यटन विभागाची भारतातील सर्वोच्च एअरलाइन्ससोबत भागीदारी

दक्षिण आफ्रिकेच्या पर्यटन मंत्री पॅट्रिशिया डे लिले आणि दक्षिण आफ्रिकन टुरिझन सीईओ नोम्बुलेलो गुलिवे सध्या भारताच्या दौऱ्यावर आहेत. ते ३० वर्षांचे राजनैतिक संबंध, ३० वर्षांची लोकशाही आणि दक्षिण आफ्रिकेकडून २०२५ मध्ये जी२०चे अध्यक्षपद या संकल्पनेनुसार दोन्ही देशांमधील संबंधांना चालना देत आहेत.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यामधील संबंधांवर तसेच लोकशाही मूल्ये आणि आपसातील आदरावर भर देत आहेत. मुंबईतील प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मंत्री पॅट्रिशिया डे लिले यांनी भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील नाते मजबूत करण्यासाठी संभाव्य कोड शेअरिंग भागीदारीसंदर्भात भारतातील सर्वोच्च एअरलाइन्ससोबत सकारात्मक चर्चा करणार असल्याचे सांगितले.

दक्षिण आफ्रिका आयसीसी टी२० क्रिकेट वर्ल्ड कप २०२७ आयोजित करण्यासाठी तयारी करत आहे. त्यामुळे क्रिकेटप्रेमींना आकर्षित करण्यासाठी या स्पर्धेचा लाभ घेऊन अनुभवावर आधारित प्रवासाची वाढती मागणी ते पूर्ण करणार आहेत. मंत्री डे लिले यांनी भारतीय प्रवाशांना भेडसावणाऱ्या व्हिसा आणि प्रवासाशी संबंधित आव्हानांवर मात करण्यात केलेल्या प्रगतीला अधोरेखित केले. दक्षिण आफ्रिकेकडून इलेक्ट्रॉनिक ट्रॅव्हल ऑथोरायझेशन (ईटीए) आणला जाणार असून त्यातून प्रवाशांना आपल्या व्हिसासाठी थेट अर्ज करता येईल. याशिवाय ट्रस्टेड टूर ऑपरेटर स्कीम (टीटीओएस) जानेवारी २०२५ मध्ये सुरू होणार असून त्यामुळे ग्रुप व्हिसा अर्ज सुलभ होईल आणि प्रक्रिया कालावधी जलद होईल. सध्या एकूण पर्यटकांमध्ये भारतीयांची संख्या फक्त ३.९ टक्के आहे. त्यांचे ध्येय पुढील वर्षापर्यंत ही संख्या १० टक्के पर्यंत वाढवण्याचे आहे. ■ ■

## ढोले पाटील एजुकेशन तर्फे दिव्यांगांसाठी कॅम्प



३ डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. समाजातील दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांना प्रोत्साहन देत त्यांचे जीवनमान उंचावणे आणि त्यांना समाजात मानाचे स्थान मिळवून देणे हा या मागचा उद्देश असतो.

पुण्यातील ढोले पाटील एजुकेशन सोसायटीचे वतीने ३ डिसेंबर रोजी दिव्यांगांसाठी दिव्यांग कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे चेअरमन सागर ढोले यांच्या पुढाकारातून हा कॅम्प यशस्वी करण्यात आला. ढोले पाटील परिवार सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात सुरवातीपासूनच सक्रिय आहे आणि त्यांनी समाजातील दुर्बल घटकांसाठी कायम आपले योगदान दिलेले आहे.

ढोले पाटील एजुकेशनच्यावतिने आयोजित दिव्यांग कॅम्प मध्ये हजारो दिव्यांगांना मोफत अवयव पुरवले असून त्यामुळे अनेक दिव्यांग सक्षम बनले आहेत.

येत्या १६ डिसेम्बर रोजी ढोले पाटील एजुकेशन सोसायटी,भारत विकस परिषद केंद्र आणि अन्य सहयोगी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग कॅम्प चे आयओज करण्यात आले असून या कॅम्पद्वारे समाजातील १००० दिव्यांगांना आवश्यक सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या दिव्यांग कॅम्पकरिता राष्ट्रीय स्वयंसेवक संगःचे सरसंघचालक मोहन भागवत प्रमुख मार्गदर्शक आणि अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. समाजातील दिव्यांगांना आत्मनिर्भर करणारा हा उपक्रम खरोखरच स्तुत्य आणि प्रेरणादायी आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## उपराजधानीत वाढते आहे क्षयरूग्णांची संख्या

### मृत्यूदर कमी करण्यात महानगरपालिकेला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :
केंद्र व राज्य शासन क्षयरोग जनजागृतीवर कोट्यावधींचा खर्च करते. त्यानंतरही शहरात १ जानेवारी २०२४ ते ५ डिसेंबर २०२४ दरम्यानच्या क्षयरोगाचे तब्बल ६ हजार ६६२ रुग्ण आढळले. परंतु या आजाराचा मृत्यूदर मात्र कमी करण्यात महापालिकेला यश आले.

नागपुरातील शहरी भागात १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ दरम्यान क्षयरोगाचे ८ हजार २०० रुग्ण शोधण्याचे लक्ष्य देण्यात आले होते. त्यापैकी ७ हजार ६१४ रुग्ण शोधण्यात यश मिळाले.

२०२४ मध्ये महापालिकेच्या आरोग्य विभागाला ८ हजार ५० रुग्ण शोधण्याचे लक्ष्य दिले गेले होते. त्यापैकी ६ हजार ६६२ रुग्ण शोधण्यात यश आले. शहरात २०२२ मध्ये क्षयरोगामुळे ३९५ रुग्णांचा मृत्यू झाला.

## पुन्हा मोठा भूकंप?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :
शपथविधी सोहळ्यानंतर आता शिवसेना नेते शंभुराज देसाई यांनी एक मोठा गौप्यस्फोट केला आहे. ठाकरेंच्या आमदारांचं आमच्यासोबत बोलणं झालं आहे, असे शंभुराज देसाई म्हणाले.

शंभुराज देसाई यांनी नागपुरातील पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राजकारणात पुन्हा एकदा मोठा भूकंप होण्याची शक्यता वर्तवली आहे. यावेळी त्यांनी संजय राऊतांबद्दलही भाष्य केले. ठाकरे गटाच्या आमदारांचं आमच्यासोबत बोलणं झालं आहे. त्यांच्या चर्चेतून तिथे खदखद असल्याचं लक्षात येत आहे. ही खदखद संजय राऊत यांच्यामुळे आहे. संजय राऊत यांच्यामुळे उद्धव ठाकरे गटाला खूप मोठा धोका आहेह्व असे विधान शंभुराज देसाई यांनी केले.

उद्धव ठाकरे गटातील अनेक आमदार संजय राऊत यांच्याबद्दल खाजगीमध्ये काही सांगतात. त्यांच्या वागण्यामुळे ही वेळ आली आहे. हा संजय राऊत यांना सावधगिरीची इशारा आहे. नाहीतरी आता उद्धव ठाकरे गट शिल्लकच राहिलेला नाही.

२०१९ च्या निकालानंतर आमदारांची बैठक घेऊन बोट दाखवत तुमच्यापैकी मुख्यमंत्री करणार असं बोलते होते. पण नंतर ते बोट स्वतःकडे फिरलं आणि ते मुख्यमंत्री झाले. तेव्हा मुख्यमंत्री करायला शिवसैनिक दिसला नाही, अशीही टीका त्यांनी केली.

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**

**E-TENDER NOTICE NO ::2024_DOWAB_1122093**

**Supply, Installation, Fabrication, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic Rice Mill Machinery**

The Government of Maharashtra is implementing the World Bank- funded SMART Project, Korni Agro Farmer Producer Company Limited, Korni, Gondia is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org.in** tender and procurement section. The last date for submission of online bid is **26/12/2024 up to 18:00 PM.** Any updates or notices shall be published on afore mentioned websites only.

**District Implementation Unit,**
**SMART Project Dist-GONDIA**

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**

**E-TENDER NOTICE NO : 2024_DOAWB_1122006**

**(Supply, Installation, Fabrication, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic Rice Mill Machinery)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. Leelawati Agro Producer Company Ltd. Chutiya, Tal. & Dist- Gondia is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org. in** tender and procurement section. The last date for submission of online bid is **26/12/2024 up to 17.30 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit,**
**SMART Project Dist. - Gondia**

**बेरोजगारी–महागाईमध्ये वाढ, रुपयाची पिछेहाट, निर्यातीत घट, कर्जबाजारीपणाचे वाढलेले प्रमाण या बाबींचा उहापोह अलिकडे झाला. त्यावेळी अनेक वित्तीय संस्था भारताचा आर्थिक विकास दर घटवत नव्हत्या. मात्र अर्थव्यवस्थेच्या या स्थितीला जागतिक घटक आणि देशांतर्गत परिस्थिती किती जबाबदार आहे आणि त्यावर मात करण्यासाठी काय करावे, यावर अर्थ मंत्रालय आणि रिझर्व्ह बँकेने एकत्रित विचार करायला हवा.**

# नैराश्याचे मळभ



नोंद

**कैलास ठोळे**

आर्थिक घडामोडींचे जाणकार

जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि पाच ट्रिलियनची अर्थव्यवस्था होण्याची शेखी आपण मिरवत होतो; परंतु त्याला वास्तवाचे भान कमी आणि देशाभिमानाची झालर जास्त होती. मात्र देशाच्या अर्थव्यवस्थेत सध्या नेमके काय चालू आहे आणि अर्थव्यवस्था सध्या कशी अडचणीतून जात आहे, याचा उहापोह सतत होत असतो. कंपन्यांच्या तिमाही नफ्यातील घटलेला वाटा, बेरोजगारीत वाढ, रुपयाची लोळण, निर्यातीत घट, बाजाराच्या गटांगळ्या, परकीय चलन साठ्यातील घट, देशातील वाढती महागाई, सणासुदीच्या काळातही लोकांचा हात राखून होत असलेला खर्च, कर्जबाजारीपणाचे वाढलेले प्रमाण या बाबींचा उहापोह अलिकडे झाला. त्या वेळी अनेक वित्तीय संस्था भारताचा आर्थिक विकास दर घटवायला तयार नव्हत्या. रिझर्व्ह बँकेलाही अर्थव्यवस्थेचा दर इतका घसरेल असे वाटले नव्हते. रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या कमाल मर्यादेपेक्षा घाऊक आणि किरकोळ महागाईचा दर जास्त होता. एकूणच चित्र निराशाजनक असले, तरी आपल्याकडे पोपट मेला आहे, हे थेट सांगण्याची पद्धत नाही; त्याने पंख पसरले आहेत, डोळे मिटले आहेत, असे सांगण्याची पद्धत आहे. मात्र त्यामुळे वस्तुस्थिती लपत नसते. जागतिक संस्थांचे गैरसोईचे अहवाल फेटाळण्याची जशी सोय असते, तशी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाचे अहवाल फेटाळण्याची सोय नसते. असे वस्तुस्थितीदर्शक अहवाल वेळीच समोर आल्यास विचारविनमय करता येतो. वेळीच उपाययोजना करता येते. अर्थव्यवस्थेची स्थिती अशी का झाली, तिच्या या स्थितीला जागतिक घटक आणि देशांतर्गत परिस्थिती किती जबाबदार आणि त्यावर मात करण्यासाठी काय करावे, यावर अर्थ मंत्रालय आणि रिझर्व्ह बँकेने एकत्रित विचार करायला हवा.

आजार झाला हे मान्य केले, तरच इलाज करता येतो. आजार झालाच नाही, असा पवित्रा घेतल्यास आजार बळावण्याची आणि हाताबाहेर जाण्याची शक्यता असते. चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीमध्ये देशाची अर्थव्यवस्था मंदावली आहे. जर्मनीसह जगातील अनेक देश या स्थितीतून जात आहेत. चालू आर्थिक वर्षाच्या जुलै–सप्टेंबर तिमाहीमध्ये देशाची आर्थिक वाढ ५.४ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. ही जवळपास दोन वर्षातील सर्वात कमी पातळी आहे. उत्पादन क्षेत्राच्या खराब काम गिरीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचा वेग मंदावला आहे. एका वर्षापूर्वी याच तिमाहीमध्ये आर्थिक विकास दर ८.१ टक्के आणि मागील तिमाहीमध्ये ६.७ टक्के होता. भारत ही जगात सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे. जुलै–सप्टेंबर तिमाहीमध्ये चीनचा जीडीपी वाढीचा दर ४.६ टक्के होता. ताज्या आकडेवारीचा विचार करता भारताची पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याची प्रतीक्षा वाढू शकते. भारत पुढील तीन वर्षांमध्ये पाच ट्रिलियन डॉलर आणि २०३० पर्यंत सात ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याची अपेक्षा आहे; मात्र दुसऱ्या तिमाहीतील आकडेवारी निराशाजनक आहे. दुसऱ्या तिमाहीमध्ये खप कमी झाल्यामुळे देशाची जीडीपी वाढ कमी असेल, असे तज्ज्ञजन आधीच गृहीत धरत होते. १७ अर्थशास्त्रज्ञांनी हा दर ६.५ टक्के असेल, असा अंदाज व्यक्त केला होता. रिझर्व्ह बँकेचा अंदाज सात टक्क्यांचा होता. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या आकडेवारीनुसार, उत्पादन आणि खाण क्षेत्राच्या खराब कामगिरीमुळे दुसऱ्या तिमाहीत देशाचा आर्थिक विकास दर घसरला.

ठराविक कालावधीत देशाच्या सीमांमध्ये उत्पादित वस्तू आणि सेवांचे एकूण मूल्य जीडीपी मोजते. तथापि, चांगली गोष्ट अशी आहे की कृषीक्षेत्राचा विकास दर गेल्या तिमाहीमध्ये ३.५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. मागील वर्षी याच कालावधीत तो १.७ टक्के होता; परंतु उत्पादन क्षेत्राचा विकास दर २.२ टक्क्यांपर्यंत कमी झाला. मागील वर्षी याच कालावधीत तो १४.३ टक्के दराने वाढला होता. खाण आणि उत्खनन क्षेत्राचा 'जीव्हीए'देखील गेल्या तिमाहीत लक्षणीयरीत्या घसरून ०.०१ टक्क्यांवर आला तर एका वर्षापूर्वी याच तिमाहीमध्ये तो ११.१ टक्क्यांनी वाढला होता. तज्ज्ञांच्या मते दुसऱ्या तिमाहीमध्ये जीडीपी वाढ मंदावण्यामागे अनेक कारणे आहेत. वाढती महागाई आणि चढे व्याजदर याला कारणीभूत आहेत. यासोबतच पगारातही लक्षणीय वाढ झालेली नाही. त्यामुळे लोक खर्च करताना हात आखडता घेतात. अनेक केंद्रीय मंत्र्यांनी रिझर्व्ह बँकेला व्याजदर कपातीचे आवाहन केले आहे; परंतु बँक धोका पत्करायला तयार नाही. कर्जावरील व्याजदर कमी केल्यास ठेवीवरचा व्याजदरही कमी करावा लागेल. सध्याच बँकांना ठेवींची टंचाई जाणवत आहे. कमी व्याजदरांमुळे ठेवीदारांनी बँकांकडे पाठ फिरवली आहे. जुलै–सप्टेंबर या तिमाहीतील कंपन्यांचे निकालही निराशाजनक होते. यामुळे शेअर बाजारातही मोठी घसरण झाली. परिणामी, विदेशी गुंतवणूकदारही भारतातून झपाट्याने पैसे काढून अमेरिकन बाजारात गुंतवत आहेत. दुसऱ्या तिमाहीमध्ये कंपन्यांच्या कमकुवत निकालांमुळे नवी गुंतवणूक आणि विस्तार योजनांबाबत चिंता वाढली आहे. यालाही अर्थव्यवस्थेसाठी धोक्याचे संकेत मानले जात आहेत; मात्र दुसऱ्या सहामाहीमध्ये जीडीपी वाढ चांगली होऊ शकते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

रिझर्व्ह बँकेने या आर्थिक वर्षात जीडीपीवाढीचा अंदाज ७.२ टक्के ठेवला आहे. यासाठी दुसऱ्या सहामाहीमध्ये अर्थव्यवस्थेला अधिक चांगली कामगिरी करावी लागेल. पुढील पतधोरण आढावा बैठकीत रिझर्व्ह बँकेने व्याजदरात कपात केल्यास खपाला चालना मिळू शकेल. त्याचा परिणाम जीडीपी वाढीवरही होईल. बांधकाम हे आर्थिक वाढीचे मुख्य क्षेत्र आहे. या कालावधीत विक्रमी ७.७ टक्के वाढ नोंदवली आहे. तथापि, गेल्या वर्षीच्या याच तिमाहीमध्ये हे प्रमाण १३.६ टक्के आणि मागील तिमाहीमध्ये १०.५ टक्क्यांपेक्षा कमी आहे. व्यापार, हॉटेल आणि वाहतूक क्षेत्रात आर्थिक विकासात सुधारणा झाली आहे. त्याचा अर्थव्यवस्थेतील वाढीचा वाटा सहा टक्के आहे. मागील वर्षी याच कालावधीमध्ये तो ४.५ टक्के आणि मागील तिमाहीमध्ये ५.७ टक्के होता. आर्थिक, रिअल इस्टेट आणि सेवांमध्ये ६.७ टक्के वाढ झाली. ती एका वर्षापूर्वीच्या ६.२ टक्क्यांपेक्षा चांगली; परंतु मागील तिमाहीमध्ये नोंदवलेल्या ७.१ टक्क्यांपेक्षा कमी आहे. कृषी आणि सार्वजनिक खर्चाने काही प्रमाणात आधार दिला आहे; परंतु खासगी वापर आणि औद्योगिक उत्पादनाची एकूण गती मंद आहे. अशा परिस्थितीत आगामी काळात सरकारसमोर अनेक आव्हाने उभी राहणार आहेत.

खाद्यपदार्थांच्या किमती सातत्याने वाढत असल्याने शहरी भागात खप कमी होत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्याचा थेट परिणाम विकासदरावर दिसून येत आहे. रिझर्व्ह बँकेच्या मते भारताचा विकास दर सात टक्क्यांपेक्षा कमी असू शकतो; मात्र प्रत्यक्षात परिस्थिती आणखी वाईट असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. या संथ गतीनंतरही भारत विकासदराच्या बाबतीत जगातील सर्वात वेगवान देश आहे, एवढेच समाधान. घटत्या विकासदराचा परिणाम शेअर बाजारावरही होणार आहे. या विकासदरामुळे गुंतवणूकदारांचे नुकसान होऊ शकते. अन्नधान्य महागाईमध्ये तीव्र वाढ, महाग कर्जे आणि कमी पगारवाढ यामुळे शहरी भागातील लोकांनी घरगुती खर्चात काटछाट करण्यास सुरुवात केली आहे. जीडीपीमध्ये या खर्चाचा वाटा ६० टक्के आहे; मात्र चालू वर्षात शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात मागणी वाढत आहे. ऑक्टोबर महिन्यात अन्नधान्याच्या महागाई दरातही मोठी वाढ झाली असून तो दुहेरी अंक ओलांडून १०.८७ टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यामुळे देशांतर्गत क्रयशक्तीवर परिणाम झाला आहे. औद्योगिक उत्पादन, इंधनाचा वापर, बँक पतवाढ आणि कॉर्पोरेट्सची कमकुवत कमाई यासारख्या उच्च वारंवारता निर्देशकांमुळे अलीकडच्या काही महिन्यांमध्ये वाढीवर परिणाम झाला आहे. सरकारकडून खर्चात वाढ झाली असली तरी विकासदराची गती मंदावल्याचे आकडेवारीवरून दिसून येते.

देशांतर्गत बचतीच्या आघाडीवरही वातावरण फारसे आशादायक दिसत नाही. आर्थिक वर्ष २०२२ मध्ये निव्वळ देशांतर्गत बचत दर ७.३ टक्क्यांवरून ५.३ टक्क्यांवर आला आहे. गेल्या सत्तेचाळीस वर्षांमधील ही नीचांकी पातळी आहे. दुसरीकडे, कुटुंबांवरील दायित्वांचा म्हणजेच कर्जाचा बोजा वाढत आहे. 'क्रिसील'च्या अहवालानुसार, २०१७ मध्ये एकूण किरकोळ कर्ज हे जीडीपीच्या १२.१ टक्के होते. २०२३ मध्ये ते १९.४ टक्के झाले. त्याचबरोबर देशात श्रीमंतांची संख्या वाढत आहे. 'फोर्ब्स'च्या सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या जागतिक यादीनुसार, २०१४ ते २०२२ या वर्षात भारतीय अब्जाधीशांच्या संपत्तीत २८० टक्क्यांनी वाढ झाली आहे तर याच कालावधीत राष्ट्रीय उत्पन्नात २७.८ टक्के वाढ झाली आहे.

**दिल्लीतील कायदा सुव्यवस्थेचे सध्या तीन तेरा वाजले आहेत. अरविंद केजरीवाल यांच्यावरील हल्ल्याने दिल्ली सुरक्षित नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा नाही. दिल्लीची सुरक्षा व्यवस्था केंद्र सरकारकडे आहे. दिल्ली सरकारला याबाबत काहीच करता येत नाही. एकीकडे जगभर दिल्लीमधील प्रदूषणाची चर्चा असताना दुसरीकडे दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेची लक्तरे लाल किल्ल्यावर टांगली गेली आहेत.**

# असुरक्षित दिल्ली

लक्षवेधी

**अजय तिवारी**

देशाची राजधानी असलेल्या दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजले आहेत. एका पक्षाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री असलेल्या अरविंद केजरीवाल यांच्यावरील हल्ल्याने दिल्ली सुरक्षित नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा नाही. दिल्लीची सुरक्षा व्यवस्था केंद्र सरकारकडे आहे. दिल्ली सरकारला याबाबत काहीच करता येत नाही. एकीकडे जगभर दिल्लीमधील प्रदूषणाची चर्चा असताना दुसरीकडे दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेची लक्तरे लाल किल्ल्यावर टांगली आहेत. केजरीवाल यांच्यावर हल्ला अशा वेळी झाला आहे, जेव्हा ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलेही भीतीच्या सावटाखाली आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या गुन्ह्यांची प्रकरणे गंभीर आहेत. दिल्ली याबाबतही आघाडीवर असल्याचे दिसते. २०२१ मध्ये ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित ११६६ गुन्हे घडले होते. २०२२ मध्ये ते वाढून १३१५ झाले आहेत. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या मुंबईमध्ये ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित ५७२ गुन्हे दाखल झाले आहेत. बंगळुरूमध्ये ही संख्या ४५८ इतकी आहे. लहान मुलांवरील गुन्ह्यांमध्ये दिल्ली अव्वल आहे. तिथे असे ८६८३ गुन्हे दाखल झाले आहेत, तर मुंबईमध्ये ही संख्या ३,१७८ आणि बंगळुरूमध्ये १५७८ आहे. २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये राजधानीमध्ये सायबर गुन्ह्यांची संख्या दुप्पट झाली आहे. २०२१ मध्ये सायबर गुन्ह्यांची ३४५ प्रकरणे होती, ती २०२२ मध्ये ६८५ पर्यंत वाढली आहेत. देशाच्या राजधानीत दररोज पाच दरोडे पडतात. एकीकडे दिल्लीतील वाढत्या गुन्ह्याची चर्चा होत असताना दुसरीकडे दिल्ली पोलिसांवर टीका होत आहे; मात्र त्याच वेळी दिल्ली पोलिसांमधील १३ हजार पदे रिक्त आहेत.

दिल्लीची लोकसंख्या, देशाची राजधानी असल्याने अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचा वावर आणि वाहतूक नियंत्रण आदी बाबी विचारात घेतल्यास दिल्लीसाठी सुमारे ९४ हजार पोलिस कर्मचारी असावेत, असे संख्याशास्त्र सांगते; परंतु प्रत्यक्षात १३ हजार पदे रिक्त आहेत. २०१४ पासून जेमतेम ५.५ हजार जागा भरल्या गेल्या आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे केंद्र सरकारने दिल्ली पोलिसांच्या बजेटमध्येही कपात केली आहे. २०२४–२५ च्या अंतरिम बजेटमध्ये भाजपने दिल्ली पोलिसांच्या बजेटमध्ये ४.५ टक्के कपात केली. आदल्या वर्षीच्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत ही घट स्पस्ट दिसते.

दिल्ली दंगलीच्या तपासात दिल्ली पोलिसांवर न्यायालयात ताशेरे ओढले गेले होते. ही दंगल २०२० मध्ये झाली होती. अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी पुराव्याशिवाय अहवाल दाखल करून न्यायालयाचा वेळ वाया घालवल्याची टिप्पणी केली होती. दिल्ली दंगलीचा तपास, आरपीओ पत्र आणि पुराव्यांची छेडछाड या प्रकरणी दिल्ली न्यायालयाने एकापेक्षा जास्त वेळा दिल्ली पोलिसांवर ताशेरे ओढले आहेत. १ मे २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयानेही 'न्यूज क्लिक' प्रकरणातील दिल्ली पोलिसांच्या भूमिकेकडे बोट दाखवले होते. केजरीवाल यांच्यावरील हल्ल्यानंतर दिल्लीमध्ये गुन्हेगारी आणि असुरक्षितता हा राजकीय मुद्दा बनला आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. येत्या निवडणुकीमध्ये तो मोठा मुद्दा असेल. त्याचा राजकीय फटका भाजपला बसून आम आदमी पक्षाला फायदा होणार आहे. केजरीवाल यांनी दिल्ली विधानसभेत दिल्लीतील सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर केंद्राला ठोस उत्तर द्यावे लागणार हे निश्चित आहे.


आकडेवारी दर्शवते की, दिल्ली आता महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीही सुरक्षित नाही. विधानसभेतील भाषणात केजरीवाल यांनी केंद्र सरकार कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरत असल्याचे स्पष्टपणे सांगितले. माजी मुख्यमंत्री दिल्लीत सुरक्षित नसल्याने पदयात्रेलाही जाऊ शकत नाहीत, मग दिल्लीत सुरक्षित कोण? दिल्लीत कायद्याचे राज्य नाही का, असे प्रश्न उपस्थित होतात. दिल्लीत सततच्या हिंसक घटनांमुळे भीतीचे वातावरण आहे, त्याहूनही खेदजनक बाब म्हणजे गुन्हेगारी रोखण्यासाठी कोणीच पुढाकार घेताना दिसत नाही. केजरीवाल स्वतः बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेचे बळी आहेत. दिल्लीतील कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी केंद्रीय गृह मंत्रालय सांभाळते; मात्र सध्याच्या परिस्थितीत गुन्हेगार बेलगाम झाल्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. केजरीवाल यांच्यावरील हल्ल्यावरून हेच सिद्ध होत आहे, की राजकारणीही सुरक्षित नसतील तर सर्वसामान्यांबद्दल कोण बोलू शकते? दिल्लीतील महिला, मुले आणि सर्वसामान्य नागरिकांना भीतीच्या छायेत जगावे लागत आहे. एका घटनेची चर्चा संपण्यापूर्वी दुसरी घटना घडते.

आम आदमी पक्षाचा आरोप आहे की उपराज्यपालांचा बहुतांश वेळ दिल्ली सरकारच्या मंत्र्यांच्या विरोधात अजेंडा चालवण्यातच जातो. ईशान्य दिल्लीतील वेलकम कॉलनीतील राजा मार्केटमध्ये घडलेली एक घटना याचे ताजे उदाहरण आहे. येथे पहाटे साडेपाच वाजता भरदिवसा गोळी झाडली गेल्याने २२ वर्षीय महिला गंभीर जखमी झाली. २० ऑक्टोबर २०२४ रोजी रोहिणी भागात स्फोट झाल्याने प्रशांत विहार येथील केंद्रीय राखीव दलाची शाळेची भिंत पडली आणि कारचे नुकसान झाले. कुठेही गोळी झाडली जाऊ शकते, कुठेही स्फोट होऊ शकतो, असे दिल्लीतले सध्याचे चित्र आहे. अलिकडेच टिळकनगरच्या कार शो रूममध्ये गोळ्या झाडल्या गेल्या. त्यात तीनजण जखमी झाले. पाच कोटी रुपयांची मागणी असलेले खंडणीचे पत्र सोडून गुन्हेगार पळून जातात. खुनाचा आरोपी दिल्ली पोलिस ठाण्याच्या बाथरूममधून उडी मारून फरार होतो. याच सुमारास पूर्व दिल्लीत एका ३५ वर्षीय व्यक्तीची निर्घृण हत्या करण्यात आली. त्याच्या मानेवर आणि पोटावर चाकूने वार केले गेले आहेत. नातेवाईकाच्या घरी ३० वर्षीय तरुण मृतावस्थेत आढळला. दोन भावंडांचे मृतदेह त्यांच्या वडिलांच्या दुकानात सापडले. एक फूड डिलिव्हरी एजंट अलिकडे मृत आढळला. टोळीयुद्धाचाही फटका दिल्लीला बसला आहे. दिल्लीत दररोज २३ लहान मुले, ४० महिला आणि तीन ज्येष्ठ नागरिक गंभीर गुन्ह्यांना बळी पडत आहेत. असे हे एकूण चित्र आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालात दिल्लीमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण देशात सर्वाधिक असल्याचे म्हटले आहे. आकडेवारीनुसार, दिल्लीमध्ये दररोज ११८९ गुन्हे दाखल होत आहेत. दिल्लीत प्रति लाख रहिवासी १८३२.६ गुन्हे आहेत आणि हा दर देशात सर्वाधिक आहे. त्याच वेळी, जयपूर दुसऱ्या स्थानी आहे; परंतु येथील गुन्ह्यांचे आकडे दिल्लीच्या तुलनेत प्रति लाख ९१६.७ म्हणजेच निम्मे आहेत. येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे देशातील सरासरी गुन्हेगारी दर लाख लोकसंख्येमागे २५८.१ आहे, तर दिल्लीत हा आकडा १८३२.६ आहे. आता दिल्लीतील महिला घाबरलेल्या आहेत. तेथील महिलांवरील गुन्ह्यांचे प्रमाण १४४.४ टक्के म्हणजेच देशात सर्वाधिक आहे तर राष्ट्रीय सरासरी ६६.४ आहे. दररोज सरासरी तीन घटनांसह दिल्लीमध्ये वर्षभरात बलात्काराच्या १२१२ घटना नोंदल्या जात आहेत. मुंबईच्या तुलनेत दिल्लीमध्ये महिलांवरील गुन्हे दुप्पट आहेत. दिल्लीमध्ये महिलांवरील गुन्ह्यांच्या घटना वार्षिक १४,१५८ आहेत. मुंबईत हा आकडा ६,१७६ आहे. बंगळुरूमध्ये हाच आकडा ३,९२४ आहे. म्हणजेच दिल्ली महिलांसाठी बंगळुरूपेक्षा तिप्पट असुरक्षित आहे. एक लाख लोकसंख्येमागे महिलांवरील सर्व प्रकारच्या गुन्ह्यांच्या बाबतीत दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर आहे. दिल्लीत हा दर १८५.९ आहे.

आश्चर्याची बाब म्हणजे दिल्लीचे उपराज्यपाल महिलांसाठी शहर सुरक्षित बनवण्यासाठी पुढाकार घेण्याऐवजी दुसऱ्याच कामात व्यस्त आहेत. दिल्ली परिवहन महामंडळाच्या बसमध्ये आजही बहिणींना मार्शल भैया आठवतात. केजरीवाल यांनी २०१५ बसमध्ये मार्शल तैनात केले होते. निर्भया घटनेनंतर बसमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. त्यामुळे या मार्शल्सची भूमिका महत्त्वाची ठरली. नोव्हेंबर २०२३ मध्ये उपराज्यपालांनी दहा हजारांहून अधिक मार्शल निवृत्त केले. घराबाहेर बसमधून मोफत प्रवास करणाऱ्या महिलांना या निर्णयानंतर असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. हा मुद्दा केवळ मार्शलच्या पुनर्नियुक्तीचा नाही, तर महिलांच्या सुरक्षिततेशी संबंधित आहे. मुख्यमंत्री आतिशी यांनी अलिकडेच म्हटले की भाजप नेते विजेंद्र गुप्ता यांनी उपराज्यपालांची भेट घेऊन मार्शल नियुक्त करण्यास राजी केल्यास त्या केजरीवाल यांना निवडणुकीदरम्यान विजेंद्र गुप्ता यांच्या विरोधात उमेदवार उभे करू नयेत, अशी विनंती करतील. साहजिकच मार्शल्सची बडतर्फी आणि पुनर्स्थापना हा मोठा राजकीय मुद्दा बनला आहे.





# गृहोद्योगामधील सकारात्मक वारे





**गृहनिर्माण प्रकल्पांच्या मंजुरीमध्ये सुलभता आणणे आवश्यक आहे. त्यासाठी एक खिडकी योजना असावी. विहित मुदतीत प्रकल्प मंजूर व्हावेत. याशिवाय स्थानिक यंत्रणांकडे भरावयाच्या शुल्कात प्रकल्प पूर्ण होईपर्यंत सूट मिळावी, अशी अपेक्षा आहे. देशातील प्रत्येकाला सहज खरेदी करता येईल अशा किमतीत घर मिळाले, तर तेथे राहणारी माणसे देशाच्या प्रगतीत अधिक वाटा उचलू शकतील.**

दखल

**हेमंत देसाई**

ज्येष्ठ पत्रकार

जुन्या करपर्यायात गृहकर्जाच्या मुद्दल परतफेडीवर कलम ८० अंतर्गत दीड लाख रुपयांपर्यंत वजावट मिळते. तसेच गृहकर्ज व्याजाची दोन लाखापर्यंतची स्वतंत्र वजावट उपलब्ध आहे. जवळपास साडेतीन लाखाच्या या वजावटीमुळे दर वर्षी लाखभर प्राप्तिकरात बचत होत असे. त्यामुळेच करबचत आणि स्वतःचे घर असा दोन्ही प्रकारचा लाभ गेली अनेक वर्षे करदाते घेत होते. परंतु आता कोणतीही वजावट न देता प्राप्तिकर मात्र कमी भरावा लागेल, असे नव्या करपर्यायाचे स्वरूप आहे. गुंतवणूक म्हणून गृहकर्ज घेऊन घर घेऊन भाड्याने देऊ इच्छिणाऱ्या करदात्यांना मात्र दोन्ही पर्यायांमध्ये भाड्याच्या उत्पन्नातून गृहकर्ज व्याजाची संपूर्ण वजावट मिळणार आहे. त्यात दोन लाख रुपयांची मर्यादा नाही. त्यामुळे अशा करदात्याला नवा करपर्याय स्वीकारून ही वजावट पदरात पाडून घेता येईल आणि अधिक करही वाचेल. भविष्यात मुलांसाठी लागणारे एखादे घर आत्ताच गृहकर्ज घेऊन खरेदी करून सध्या भाड्याने दिले, तर भाड्याचे उत्पन्न, गृहकर्ज व्याजावर करबचत आणि नव्या करपर्यायातील कमी कराचा फायदा, असे तीनही लाभ घेता येतील. सेकंड होम घेताना, ते भाड्याने देणार असाल, तरच या तरतुदीचा उपयोग करता येईल, अशी व्यवस्था केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात केली आहे. या पार्श्वभूमीवर गृहकर्जावर भरल्या जाणाऱ्या व्याज रकमेला प्राप्तिकर कायद्यांतर्गत शंभर टक्के वजावट कर्जदार असलेल्या करदात्याला मिळावी, अशी मागणी बांधकाम क्षेत्रातील शिखर संस्था क्रेडाईने सरकारकडे केली आहे.

सध्या गृहकर्जावरील दोन लाख रुपयांपर्यंतच्या व्याजाला प्राप्तिकरात सवलत आहे. याऐवजी गृहकर्जावरील संपूर्ण व्याज रकमेला शंभर टक्के वजावट द्यावी, म्हणजेच दोन लाखांची कमाल मर्यादा काढून टाकावी, अशी क्रेडाईची मागणी आहे. खरे तर अर्थ खात्याने याचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्याची आवश्यकता आहे. सरकारने परवडणाऱ्या घरांच्या व्याख्येत बदल करायला हवा. सध्याची परवडणाऱ्या घरांसाठी असलेली ४५ लाख रुपयांची किंमत मर्यादा ७५ ते ८० लाख रुपयांवर न्यायला हवी, अशी क्रेडाईची मागणी आहे. ती चुकीची म्हणता येणार नाही. याचे कारण आज पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर, संभाजीनगर अशा शहरांमधील जागांच्या किमती खूप वाढल्या आहेत. त्यामुळे सरकारने बदललेल्या वास्तवाचा विचार करणे आवश्यकच आहे.

बांधकाम सुरू असलेल्या ७५ ते ८० लाख रुपये किमतीच्या घरांच्या प्रकल्पावर सरकार सध्या पाच टक्के जीएसटी आकारत आहे. तो कमी केला तरी परवडणाऱ्या मध्यम आकाराच्या घरांच्या निर्मितीला चालना मिळेल आणि मागणीही वाढेल. बांधकाम सामग्रीवरील जीएसटीही कमी करून बारा टक्क्यांवर आणावा आणि परवडणाऱ्या घरांसाठी पन्नास हजार कोटी रुपयांची तरतूद करावी. रेराचे निर्बंध अधिक सुलभ करावेत आणि पायाभूत सुविधा क्षेत्राची वित्तपुरवठा व्यवस्था अधिक मजबूत करावी, याही सूचना अर्थमंत्र्यांना करता येतील. मुळात पायाभूत सुविधा क्षेत्र प्रकल्प कर्जांवरील व्याज कमी करण्याची गरज आहे. बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्राच्या वाढीला, पर्यायाने अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना देण्यासाठी या काही गोष्टी करणे आवश्यक आहे.

घरखरेदी करण्यासाठी प्रोत्साहन दिल्यास गृहबांधणी उद्योग भरभराटीला येऊन तेथे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीही होऊ शकते. अगदी महाराष्ट्राचा विचार केला, तरी २०१२ ते २०१७ या काळात राज्याला २० लाख घरांची आवश्यकता होती. आता ही गरज खूपच वाढली आहे. प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटांसाठी पुरेशी घरे उपलब्ध नाहीत. महाराष्ट्रात झोपडपट्टीमध्ये राहणारी देशातील सर्वाधिक लोकसंख्या आहे. देशातील एकूण झोपडवासियांपैकी १८ टक्के झोपडपट्टीवासीय एकट्या मुंबईत आहेत. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे या प्रमुख शहरांमधील घरांच्या किमती सामान्यांच्या कुवतीबाहेर गेल्या आहेत. राज्यातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण ४५ टक्के आहे. या सर्वांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी नवे धोरण आखणे आवश्यक आहे. २०१५ मध्ये पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून केंद्र सरकारने घरबांधणीला चालना दिली असली, तरी मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुणे या प्रमुख शहरांमध्ये घरांचे चढे भाव सामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहेत. पंतप्रधान आवास योजनेची घरे उपलब्ध आहेत, पण ती प्रमुख शहरांपासून दूर आहेत. पायाभूत सुविधा आणि वाहतुकीची समस्या यामुळे अशा अनेक घरांना ग्राहकच मिळेनासा झाला आहे.

सामान्य माणसाच्या बाजुने विचार करायचा तर गृहकर्ज हप्ता आणि मासिक उत्पन्न यातील ताळमेळ सर्वांनाच कायम ठेवावा लागतो. उत्पन्नातील वाढ आणि हप्त्यातील वाढ समान नसल्यास आर्थिक ताण येऊ लागतो. त्याचा परिणाम एकूणच कर्जदाराच्या आर्थिक स्थितीवर होतो. यामुळे घेत असलेले घर परवडणारे आहे का, हे तपासावे लागते. देशाचा विचार करता महानगरांमधील घरे ग्राहकांसाठी परवडणारी ठरत आहेत. कारण उत्पन्नातील वाढ ही कर्जाच्या हप्त्याशी सुसंगत आहे. याला केवळ मुंबईचा अपवाद आहे. महाराष्ट्राचा विचार करता पुण्यातील घरे परवडणारी तर मुंबईतील घरे न परवडणारी ठरत आहेत. नुकत्याच जाहीर झालेल्या परवडणाऱ्या घरांच्या निर्देशांकातून ही माहिती समोर आली आहे. मालमत्ता क्षेत्रातील सल्लागार संस्था 'नाइट फ्रँक इंडिया'ने परवडणाऱ्या घरांचा निर्देशांक जाहीर केला आहे. सरासरी घरगुती उत्पन्न आणि गृहकर्जाचा मासिक हप्ता यांची तुलना केली जाते. देशातील आठ महानगरांमध्ये सरासरी घरगुती उत्पन्नातील वाढ २०१० ते २०२१ या कालावधीत सातत्यपूर्ण राहिली. रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर स्थिर ठेवण्यात आल्याने बँकांनीही व्याजदरात बदल केलेले नाहीत. यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत व्याजदर वाढलेले नाहीत. या निर्देशांकानुसार देशातील प्रमुख आठ महानगरांमध्ये मासिक उत्पन्नाच्या तुलनेत घराचा हप्ता सरासरी २१ टक्के आहे. हे प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत असेल तर त्या शहरातील घरे परवडणारी ठरतात आणि ते ५० टक्क्यांच्या वर असल्यास त्या शहरातील घरे न परवडणारी ठरतात.

देशात अहमदाबादमधील घरे सर्वाधिक परवडणारी आहेत. तेथे सरासरी मासिक उत्पन्नाच्या तुलनेत घराचा हप्ता २१ टक्के आहे. त्याखालोखाल पुणे आणि कोलकाता या महानगरांमध्ये मासिक उत्पन्नाच्या तुलनेत घरांचा हप्ता २४ टक्के आहे. मासिक उत्पन्नाच्या तुलनेत घराच्या मासिक हप्त्याचे प्रमाण हैदराबादमध्ये ३०, दिल्लीमध्ये २८, बंगळुरूमध्ये २६, चेन्नईमध्ये २५ असे आहे. मुंबईत घरे परवडणारी नसून मासिक उत्पन्नाच्या तुलनेत त्यांचा हप्ता तब्बल ५१ टक्के आहे. म्हणजेच मुंबईतील नागरिकांना सरासरी घरगुती उत्पन्नाच्या निम्म्याहून जास्त भाग घराच्या हप्त्यापोटी द्यावा लागत आहे. रिझर्व्ह बँकेने कोरोना संकटाच्या काळात व्याजदर कमी करून दशकातील नीचांकी पातळीवर नेले. त्यानंतर मे २०२२ पासून पुढील नऊ महिन्यांमध्ये बँकेने व्याजदर २.५ टक्क्यांनी वाढवले. महागाई नियंत्रणात आणण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले. यामुळे सर्वच महानगरांमधील घरांच्या किमतीवर परिणाम झाला. रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर फेब्रुवारी २०२३ पासून स्थिर असून, उत्पन्नातील वाढ कायम आहे. त्यामुळे वाढत्या किमती आणि जादा व्याजदर असूनही घर खरेदी शक्य होत आहे. याचबरोबर घरांच्या मागणीतही वाढ कायम असून, यंदा पहिल्या सहामाहीत ही मागणी उच्चांकी पातळीवर पोहोचली.

कोरोना संकट हे देशातील गृहनिर्माण बाजारपेठेसाठी कसोटीचे ठरले. त्यावेळी घरांच्या किमती आणि व्याजदर यात मोठे बदल झाले. त्यातून घरांच्या मागणीत मोठी वाढ झाली. तेव्हापासून सुरू झालेली ही वाढ कायम आहे. याचबरोबर कोरोना संकटानंतर अर्थव्यवस्थेने घेतलेली उभारी अद्याप कायम आहे. महागाईवरील नियंत्रण आणि आर्थिक विकासाची गती यामुळे सरासरी घरगुती उत्पन्न वाढत गेले. यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये किमती वाढूनही घरे ग्राहकांसाठी परवडणारी ठरत आहेत. घरे परवडणारी असणे हे नवीन घरांची मागणी आणि विक्रीतील वाढ कायम राहण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. देशाच्या आर्थिक विकासाचा मुख्य घटक म्हणूनही याकडे पाहिले जाते. म्हाडाच्या घरांना प्रचंड मागणी असून एकेका घरासाठी ५० ते ६० हजार अर्ज अशी परिस्थिती आहे. मुळात महाराष्ट्र असो वा देशातील इतर राज्ये, तेथील गृहनिर्माण प्रकल्पांच्या मंजुरीमध्ये सुलभता आणणे आवश्यक आहे. त्यासाठी एक खिडकी योजना असावी. विहित मुदतीत प्रकल्प मंजूर व्हावेत. याशिवाय स्थानिक यंत्रणांकडे भरावयाच्या शुल्कात प्रकल्प पूर्ण होईपर्यंत सूट मिळावी, अशी अपेक्षा आहे. देशातील प्रत्येकाला सहज खरेदी करता येईल अशा किमतीत घर मिळाले, तर तेथे राहणारी माणसे देशाच्या प्रगतीत अधिक वाटा उचलू शकतील.

# उत्पन्न आणि आरोग्य

दृष्टीक्षेप

**महेश जोशी**

अवघ्या दशकभरापूर्वीपर्यंत देशातील दारिद्र्यरेषा माणसाला एका दिवसात किती कॅलरीजची गरज आहे आणि त्यासाठी किती खर्च करावा लागेल या आधारे ठरवली जात होती. यामुळेच जुन्या सर्वेक्षणातील खर्चाचे आकडे मुख्यतः अन्नावर केंद्रित होते. १९६० च्या दशकात, कुटुंबाच्या वार्षिक खर्चाच्या तीन चतुर्थांश खर्च फक्त अन्नावर होत असे. तथापि, लोकांकडे खर्च करण्यासाठी पैसा येऊ लागला. ते अन्नावर कमी आणि इतर गोष्टींवर जास्त खर्च करू लागले. हा बदल भारतातील शहरी भागात १९९० च्या अखेरीस दिसून आला. त्या काळात लोक अन्नापेक्षा इंधन, भाडे, शिक्षण, आरोग्य, प्रवास इत्यादींवर जास्त खर्च करू लागले होते; मात्र आता हा बदल ग्रामीण भारतातही पहायला मिळत आहे. पहिल्यांदाच ग्रामीण भागातही लोक जेवणाऐवजी इतर गोष्टींवर जास्त खर्च करू लागले आहेत. ताज्या आकडेवारीनुसार, भारतात अन्नावर होणारा खर्च आता ग्रामीण आणि शहरी लोकांच्या मासिक खर्चाच्या निम्म्याहून कमी आहे आणि गेल्या काही दशकांमध्ये हा वाटा झपाट्याने घसरला आहे. एका अहवालात भारतीय घरांच्या उपभोग खर्चाची तपशीलवार माहिती दिली आहे. हा अहवाल स्पष्ट करतो की ही जगभरातील एक सामान्य प्रवृत्ती आहे. कारण लोकांचे उत्पन्न वाढते. ते शारीरिक श्रमापासून दूर जातात आणि त्यांचा अन्नावरील खर्च कमी होतो. याचा अर्थ असा, की लोक अधिक कमवू लागतात, तेव्हा ते अन्नावर कमी खर्च करतात. कारण त्यांच्याकडे इतर गोष्टींवर खर्च करण्यासाठी पैसे असतात.

उदाहरणादाखल अमेरिका आणि जर्मनीसारख्या विकसित देशांकडे पाहता येते. या देशातील लोक त्यांच्या एकूण खर्चापैकी केवळ १५ टक्के अन्नावर खर्च करतात. याचे कारण म्हणजे तेथील लोक अधिक कमावतात आणि त्यांच्याकडे अन्नाशिवाय इतर अनेक गरजांसाठी पैसा असतो. सांख्यिकी मंत्रालयाने भारतीय कुटुंबांच्या घरगुती खर्चासंदर्भात एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार २०११-१२ च्या तुलनेत ग्रामीण भागातील मासिक खर्चातला खाण्यापिण्याचा खर्च ५३ टक्क्यांवरुन ४६.४ टक्क्यांवर आला आहे. शहरी भागाबद्दल बोलायचे झाले तर या काळात अन्नधान्याचा वाटा ४२.६ टक्क्यांवरून ३९.२ टक्क्यांवर आला आहे. शहरी भागात अन्नाऐवजी अखाद्य पदार्थांचा वाटा ५७.४ टक्क्यांवरून ६०.८ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. ग्रामीण भागात हा वाटा ४७ टक्क्यांवरून ५३.६ टक्क्यांवर पोहोचला आहे. लोक आता प्रवासावर जास्त खर्च करू लागले आहेत. शहरी भागात लोक दर महिन्याला वाहतुकीवर सरासरी ५५५ रुपये खर्च करतात तर ग्रामीण भारतात हा खर्च २८५ रुपये आहे. याशिवाय ग्रामीण भारत पान, तंबाखू आणि मादक पदार्थांवर जास्त खर्च करतो. २०२२-२३ मध्ये पान, तंबाखू आणि मादक पदार्थांवर दरडोई मासिक खर्च १४३ रुपये होता. १९९९-२००० मध्ये शहरी भागातील खर्चामध्ये वाहतूक खर्चाचा १०.६ टक्के हा वाटा २०२२-२३ मध्ये वाढून १४.१ टक्के झाला आहे. त्याच वेळी, ग्रामीण भारतात हा वाटा आणखी वेगाने वाढला. मागील दोन दशकांमध्ये ग्रामीण भारतात सातत्याने वाढलेला खर्च टेलिव्हिजन, मोबाईल फोन, गृहोपयोगी उपकरणे इत्यादी उपभोग्य वस्तूंवर होत आहे. ग्रामीण भारत आता मनोरंजनावर पूर्वीपेक्षा दुप्पट खर्च करतो.

लोक अधिक कमावू लागले, त्यांच्याकडे अन्नाव्यतिरिक्त इतर गोष्टींवर खर्च करण्यासाठी पैसे येत आहेत. त्यामुळे अन्नावरील खर्चाचा वाटा कमी झाला आणि लोक भाडे, शिक्षण, आरोग्य, प्रवास, मनोरंजन इत्यादी जीवनावश्यक वस्तूंवर खर्च करू लागले. पूर्वी, बहुतेक लोक हाताने काम करायचे (जसे की शेती, बांधकाम इ). त्यात शरीराला जास्त कॅलरीजची आवश्यकता असते. आता बहुतेक लोक ऑफिस किंवा मशीनवर काम करताना शारीरिक श्रम कमी करतात. त्यामुळे जास्त सकस अन्न खाऊन कॅलरी खर्चण्याची गरजदेखील कमी झाली आहे. याचा परिणाम असा झाला की अन्नावरील खर्चही कमी झाला. लोक श्रीमंत होत गेले, तसतसा लोकांनी आपला आहार बदलला. तो फक्त भात किंवा रोटीपुरता मर्यादित राहिला नाही. आता त्यांनी फळे, भाज्या, दुग्धजन्य पदार्थ, मांस आणि इतर पौष्टिक पदार्थांवर खर्च करायला सुरुवात केली आहे. हे महाग असले, तरी लोकांनी त्यांचा आहारात समावेश करण्यास सुरुवात केली आहे. भारतातील सरकारी योजनांतर्गत, गरीब कुटुंबांना स्वस्त धान्य (तांदूळ, गहू इत्यादी) मिळत आहे. त्यामुळे त्यांचा अन्नावरील खर्च कमी झाला आहे. परिणामी, अन्नावरील एकूण खर्चही कमी झाला आहे. शहरी भागातील लोक आता पॅकेज्ड आणि प्रोसेस्ड फूडवर जास्त खर्च करू लागले आहेत. याशिवाय बाहेरच्या जेवणाची सवयही वाढली आहे. या गोष्टी महाग असतात. 'नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑफिस' (एनएसएसओ)ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ग्रामीण भारतातील सरासरी दरडोई वापर खर्च (वस्तू आणि सेवांवर घरगुती खर्च-एमपीसीई) ३,७७३ रुपये आहे. या खर्चाचा मोठा हिस्सा खाद्यपदार्थांवर जातो. २०२२-२३ च्या सर्वेक्षणानुसार, दरडोई उपभोग खर्चातील खर्च दोन प्रमुख भागांमध्ये विभागला आहे. तांदूळ, गहू, फळे, भाज्या, कपडे, शिक्षण, आरोग्य, भाडे, मनोरंजन, वाहतूक आदींचा त्यात समावेश होतो. सिक्कीममधील ग्रामीण भागात सरासरी 'एमपीसीई' ७,७३१ रुपये आहे आणि त्यातील एक मोठा भाग अन्नावर खर्च केला जातो. कारण सिक्कीममध्ये अन्न खर्चाचा वाटा जास्त आहे तर छत्तीसगडच्या ग्रामीण भागात, सरासरी एमपीसीई २,४६६ रुपये आहे. हा खर्च इतर राज्यांपेक्षा कमी आहे. येथे अन्न खर्चदेखील तुलनेने जास्त असेल, कारण कमी उत्पन्नाच्या बाबतीत अन्नावरील खर्चाचा वाटा जास्त असतो. १९९९-२००० ते २०२२-२३ या काळात भारतातील ग्रामीण आणि शहरी भागात दरडोई उपभोग खर्चात (एमपीसीई) लक्षणीय वाढ झाली आहे. ग्रामीण भारतातील सरासरी 'एमपीसीई' १९९९-२००० मध्ये ४८६ रुपये होता. तो २००४-०५ मध्ये ५७९ रुपयांपर्यंत वाढला. २००९-१० मध्ये १,०५४ रुपये तर २०११-१२ मध्ये १,४३० रुपये आणि २०२२-२३ मध्ये ३,७७३ वर पोहोचला. याचा अर्थ गेल्या काही वर्षांमध्ये ग्रामीण भागातील लोक अन्न आणि गैरखाद्य बाबींवर अधिक खर्च करू लागले आहेत.

शहरी भागातही उपभोगात वाढ दिसून आली आहे. शहरी भारताचा सरासरी 'एमपीसीई' १९९९-२००० मध्ये ८५५ रुपये होता. तो २००४-०५ मध्ये १,१०५ रुपये, २००९-१० मध्ये १,९८४ रुपये, २०११-१२ मध्ये २,६३० रुपये तर २०२२-२३ मध्ये ६,४५९ रुपये इतका वाढला. शहरी भागात ही वाढ ग्रामीण भागापेक्षा जास्त होती. हे दर्शवते की शहरी लोक प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य आणि इतर सुविधांवर जास्त खर्च करत आहेत.

चांगल्या दर्जाच्या अन्नाचा अभाव असल्याने ग्रामीण भागात फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ आणि मांस, अंडी आणि कडधान्ये या प्रथिनयुक्त अन्नावरील खर्च कमी असू शकतो, कारण ते महाग आहेत. त्यांच्या कमतरतेमुळे पौष्टिकतेची कमतरता होऊ शकते; जी विशेषतः लहान मुले आणि वृद्धांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. यामुळे वाढत्या वयाबरोबर मानसिक आणि शारीरिक विकासात अडथळा येतो. पौष्टिक आहार न घेतल्यास त्यांच्यामध्ये मधुमेह, हृदयरोग, उच्च रक्तदाब आणि पचनसंस्थेचे आजार यासारख्या दीर्घकालीन आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. अशा रोगांच्या उपचारावरील खर्च वाढू शकतो आणि गरीब कुटुंबांसाठी तो अतिरिक्त भार बनू शकतो. विशेषत: मुलांमध्ये, पोषणाच्या अभावामुळे शारीरिक आणि मानसिक विकासाला विलंब होतो. कमकुवत रोगप्रतिकारक शक्तीमुळे ते सहज आजारी पडू शकतात. याशिवाय, मुलांच्या शिक्षणात आणि ज्ञान संपादनातही घट होऊ शकते, कारण त्यांच्या मानसिक विकासात पौष्टिक आहार महत्त्वाची भूमिका बजावत असतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

**पहिल्यांदाच ग्रामीण भागातही लोक जेवणाऐवजी इतर गोष्टींवर जास्त खर्च करू लागले आहेत. ताज्या आकडेवारीनुसार, भारतात अन्नावर होणारा खर्च आता ग्रामीण आणि शहरी लोकांच्या मासिक खर्चाच्या निम्म्याहून कमी आहे आणि गेल्या काही दशकांमध्ये हा वाटा झपाट्याने घसरला आहे. एका अहवालात भारतीय घरांच्या उपभोग खर्चाची तपशीलवार माहिती दिली आहे. हा अहवाल स्पष्ट करतो की ही जगभरातील एक सामान्य प्रवृत्ती आहे.**



# लोकांच्या समस्यांपासून निवडणुका दुरावतात तेव्हा...




**डॉ. अमोल अन्नदाते**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या पाच वर्षांमध्ये जे घडले आणि त्यानंतर आता झालेल्या विधानसभा निवडणुकीत जे जनमत समोर आले, ते येणारी अनेक वर्षे देशातील लोकशाहीसाठी एक केस स्टडी बनून राहणार आहे. लोकशाही प्रक्रियेच्या सबलीकरणा साठी काही सकारात्मक आणि काही नकारात्मक अशा दोन्ही बाजू या निमित्ताने पुढे आल्या. अशा सर्व बाबी समोर ठेऊनच या निवडणुकांचा परामर्श घेतला पाहिजे.

या निवडणुकीत सर्वच पक्षांनी नव्या चेहऱ्यांना, तरुणांना, महिलांना संधी देण्याच्या घोषणा धुडकावून पारंपरिक पद्धतीने उमेदवार निवडले. यात नवखे चेहरे होते, ते मोठ्या राजकीय कुटुंबातीलच. अलीकडच्या काळात सक्षम उमेदवार याचा अर्थ कार्यक्षमतेपेक्षा भरमसाट पैसे खर्च करणारा असा होतो. त्यामुळे काही तरी वेगळे करू पाहणाऱ्या किंवा पारंपरिक राजकारणाचा पट बदलू पाहणाऱ्या नव्या रक्ताला राजकारणात आणि त्यातही निवडणुकीच्या रिंगणात स्पेस मिळण्याचा प्रश्न या निवडणुकीतही अनुत्तरित राहिला.

सर्वच पक्षांकडून सर्वाधिक पैशांची उलाढाल झालेली निवडणूक म्हणूनही या निवडणुकीची नोंद होईल. राजकारणातून अमाप पैसा कमावणे आणि त्यातील एक भाग निवडणुकीसाठी विशिष्ट प्रकारे खर्च करून परत निवडून येणे, हा पॅटर्न काही अपवाद वगळता यावेळीही दिसून आला.

राजकारण आणि निवडणुका या दोन गोष्टींना वेगळे करणारी ही निवडणूक ठरली. राजकारण म्हणजे एखाद्या पक्षाची मूलभूत विचारसरणी हा त्याचा पाया म्हणून समाजात रुजवणे आणि त्या आधारे पक्षाच्या उमेदवाराने निवडणूक लढवणे. पण, या दोन गोष्टींचा आता अर्थाअर्थी संबंध उरला नसल्याचे लोकशाहीच्या दृष्टीने चिंताजनक वास्तव या निवडणुकीतून समोर आले. पक्ष आणि उमेदवार जसे दीर्घकालीन विचार न करता व्यावहारिक झाले, तसे मतदारही आपल्याला तातडीने काय लाभ होईल, या विचाराकडे झुकल्याचे दिसले.

या निवडणुकीत लाडकी बहीण योजना हा सर्वाधिक चर्चेचा मुद्दा ठरला. तो मताधिक्य वाढवण्यात परावर्तित झाल्याने येणाऱ्या काळात रेवडीचे राजकारण, त्यातही महिला मतदारांना आपल्या बाजूने वळवण्याचे प्रकार वाढतील. पण, यातून बाहेर आले ते केवळ निवडणूक जिंकण्याचे तंत्र.

सर्वच पक्षांनी १० टक्क्यांपेक्षा कमी महिला उमेदवार दिले आणि निवडून आलेल्यांमध्ये त्याही पेक्षा कमी महिला आहेत. लाडकी बहीणच्या प्रभावामुळे प्रत्यक्ष राजकारणात महिला-भगिनींना प्रतिनिधित्व देण्याचा मुद्दा मात्र विरुन गेला.

महायुतीला मिळालेले बहुमत ही राज्यासाठी स्थिर सरकारच्या दृष्टीने जमेची बाजू असली, तरी ते एकतर्फी असल्याने कमकुवत आणि जवळपास अस्तित्वहीन विरोधी पक्ष अशी स्थिती निर्माण झाली आहे. लोकशाहीसाठी ही नकारात्मक बाजू मानली जाते. अर्थात याला विरोधी महाविकास आघाडीतील पक्षही आणि त्यांचे नेतेही जबाबदार आहेतच.

काँग्रेसच्या नेत्यांना तर दरबारी राजकारणातून बाहेर पडत, १९६३ च्या कामराज मॉडेलची आठवण आणि शिकवण देण्याची वेळ आली आहे. राजकारणाचा अतिरेक होऊन शीर्षस्थ नेत्यांचा तळागाळाशी संबंध तुटतो आणि नेतेगिरी, भाषणे, पदे, निवडणुका याच हस्तदंती दुनियेत पक्षाचे नेतृत्व रमते, तेव्हा कामराज मॉडेलची आठवण अनिवार्य ठरते.

१९६३ मध्ये काँग्रेस पक्षात मरगळ आली तेव्हा मद्रास प्रांताचे मुख्यमंत्री कुमारस्वामी कामराज यांनी एक प्रस्ताव ठेवला. सर्व मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्र्यांनी राजीनामा द्यावा व कुठलेही पद न घेता पक्षाचा साधा कार्यकर्ता म्हणून लोकांमध्ये जाऊन कामे करावी, पक्षबांधणी करावी आणि पक्षाची विचारसरणी शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवावी, असा हा प्रस्ताव होता. तो स्वीकारला गेला.

६ मुख्यमंत्री आणि ८ केंद्रीय मंत्र्यांनी राजीनामे देत पक्षाचे काम सुरू केले. त्यामुळे विरोधी पक्षांना कात टाकायची असेल, तर आजच्या काळातही हे कामराज मॉडेल राबवावे लागेल.

बटेंगे तो कटेंगेसारखी घोषणा तसेच मराठा - ओबीसी ध्रुवीकरण या दोन गोष्टींमुळे ही निवडणूक धर्म आणि जात या दोन्हींपासून लांब राहू शकली नाही. राज्याच्या विधानसभा निवडणुकीत यापूर्वीही जातीचा मुद्दा असायचा. धर्माचा मुद्दा आला, तर तो लोकसभेच्या निवडणुकीत यायचा. आता मात्र महाराष्ट्रात अगदी छोट्या निवडणुकीतही धर्माच्या मुद्द्याचा प्रवेश झाल्याचे दिसते. त्याचप्रमाणे, निवडणूक जिंकण्यासाठी अगदी कमी वेळेत, आधुनिक प्रचारतंत्र वापरून मतदारांच्या मनात विशिष्ट नॅरेटिव्ह रुजवण्याचे, त्यांच्या सद्सद्विवेकावर ताबा मिळवण्याचे प्रकार निखळ लोकशाहीच्या दृष्टीने अयोग्यच मानले पाहिजेत.

गेल्या पाच वर्षांत राज्याने कोरोना महामारीप्रमाणेच महागाई, बेरोजगारी, दुष्काळ-अतिवृष्टी, पिकांचे नुकसान आणि शेतकरी आत्महत्या, महिलांवरील अत्याचार, वाढती गुन्हेगारी, स्पर्धा परीक्षा - प्रवेश परीक्षांतील घोटाळे अशी कित्येक संकटे अनुभवली. निवडणुकीच्या चर्चेत आणि प्रचारात मात्र दुर्दैवाने हे मुद्दे कुठेही नव्हते. त्यामुळे राजकारण आणि सामाजिक मुद्दे, निवडणुका आणि सामान्यांचे प्रश्न या गोष्टी एका लयीत येण्यासाठी अजून बरीच वाट पाहावी लागेल, असे दिसते.

■ ■ ■ ■



# दिल हरवलेली दिल्ली

दिल्लीतील प्रदूषणाने निर्माण झालेल्या जीवन-मरणाच्या परिस्थितीत नेमकं काय करावं, हा प्रश्न पडला आहे. दिल्ली सोडून जावं तर कुठं जावं? पोटापाण्याचं काय? मुलांच्या शिक्षणाचं काय? आणि सध्याची ही स्थिती बदलायला किती वर्षे लागतील? या दूषित वातावरणात राजधानीचा स्मार्टनेस कुठं गुदमरलाय अन् दिलदार दिल्लीचं दिल कुठं हरवलंय, तेच कळत नाही.

---

**ज्ञानेश्वर मुळे**

---

गेल्या पंधरवड्यात एका बाजूला महाराष्ट्रात निवडणुकांचा महाधुरळा उडत होता, तर दुसरीकडे दिल्लीत प्रदूषणाचा महाकहर सुरू झाला. भारताची राजधानी दिल्ली. इथं देशाचे सगळे महत्त्वाचे निर्णय होतात. पंतप्रधानांच्या कार्यालयासह सर्व मंत्रालये इथे आहेत. देशाचे आर्थिक अंदाजपत्रक इथेच तयार होते.

सगळ्या योजनांना आकार देणारा, त्यासाठीचे निर्णय घेणारा नीती आयोग प्रत्येक प्रश्नाचा तपशीलवार अभ्यास करुन धोरणांचा गोषवारा इथेच ठरवतो. देशातील विविध प्रश्नांवर आलेल्या घटनात्मक पेचांवर विचारविमर्श करणारे सर्वोच्च न्यायालय इथेच आहे. शिवाय, देशाच्या प्रगतीसाठी कायदेकानून बनवणारी संसदही इथेच आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीच्या प्रदूषणाच्या गंभीर प्रश्नावर गेली कित्येक वर्षे उपाय का निघत नाही, हा सर्वसामान्यांना पडणारा प्रश्न आहे.

नेमेचि येतो मग पावसाळा या उक्तीप्रमाणे ह्यनेहमीच असते इथे प्रदूषण अशी या प्रदूषणाची आम्हा सर्वांना सवय झाली आहे. पण, या प्रदूषणाच्या गंभीर प्रश्नामुळे संपूर्ण दिल्ली आणि आसपासच्या भागात राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार केला तर संताप आल्याशिवाय राहात नाही.

जगातील पहिल्या १५ अत्याधिक प्रदूषित शहरांमध्ये भारतातील किती शहरे असतील? अशी १२ शहरे आहेत. आयक्यू एअर या स्विस संस्थेची २०२३ ची आकडेवारी पाहिली, तर आपली मान लज्जेने खाली जाते.

दिल्ली सर्व प्रदूषित शहरांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर, तर नवी दिल्ली सहाव्या क्रमांकावर आहे. ही आकडेवारी आणखी तपशिलात जाऊन पाहिली, तर पहिल्या ५० शहरांमधील ४२ शहरे भारतातील आहेत. जगातील अतिप्रदूषित देशांमध्ये भारताचा क्रमांक खूप वरचा आहे.

पण, वास्तविकता अशी आहे की, कोणाला दोष द्यावा हेही कळत नाही. दिल्लीतील प्रदूषणाविषयी दरवर्षी होते तीच कंटाळवाणी आणि निष्फळ चर्चा सध्या सुरू आहे. एकदा नोव्हेंबर आला, थंडी पडू लागली की ही चर्चा सुरू होते. दिवाळीच्या आधी चिनी फटाक्यांवर निर्बंध घालण्याचा आणि दिवाळीच्या दिवसांत फटाके उडवण्यावर बंदी घालण्याचा न्यायालयाचा आदेश येतो. प्रमाण कमी झाले असले, तरी फटाके वाजतात म्हणजे वाजतातच.

भारतीयांची मानसिकता समजणे अवघड आहे. शासनाचा आदेश, पोलिसांची देखरेख, न्यायालयाचा निर्णय, सरकारचे पूर्ण पानांचे वृत्तपत्रीय आवाहन आणि हे सर्व दंडनीय अपराध आहेत, अशी सावधानीची सूचना असूनही लोक फटाके कुठून आणतात आणि कसे उडवतात, हेच कळत नाही.

पुढे लग्नाचा मोसम येतो आणि फटाके उडतच राहतात. प्रदूषणाबरोबरच या सर्वांचा ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, गर्भवती स्त्रिया, परीक्षार्थी विद्यार्थी यांच्यावर होणाऱ्या परिणामांचा कुणीच कसा विचार करत नाही?

दिल्लीच्या प्रदूषणाला कारणीभूत घटक कोणते आहेत? औद्योगिक प्रदूषण, कचरा, वाहतुकीचे दुष्परिणाम, घरांमधील धुराने होणारे प्रदूषण, पाचोळा जाळणे आणि डिझेल जनरेटर्स आदी गोष्टी या समस्येच्या मुळाशी आहेत.

आजकाल दिल्लीचा एक्यूआय ३०० - ४०० असा माणसाच्या आणि प्राणी-पक्षी या सर्वांच्या जिवाला धोकादायक आहे. दीड कोटीच्या वर वाहने असलेल्या या शहरात दिवसागणिक नवी वाहने वाढताहेत. दरवर्षी प्रदूषणाचे विक्रम मोडणारे असे शहर म्हणजे दिल्ली.

दिल्ली सरकार, केंद्र सरकार, प्रदूषण नियंत्रण विभाग, दिल्ली जल बोर्ड, दिल्ली महापालिका अशा अनेक संस्था या परिस्थितीला जबाबदार आहेत. राष्ट्रीय हरित प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, मानवाधिकार आयोग या सर्व संस्था सातत्याने परिस्थितीवर नजर ठेऊन असतात.

दरवर्षी दिल्ली शासनाबरोबरच हरियाणा, पंजाब आणि उत्तर प्रदेश यांचे प्रशासन परिस्थिती सुधारत असल्याबद्दल आणि आपण करत असलेल्या कार्यवाहीबाबत प्रतिज्ञापत्र सादर करतात. पण, प्रत्यक्षात परिणाम शून्य! असहाय्य जनता हूं की चूं करत नाही.

आता पुन्हा एकदा दिल्लीच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू होईल. जाहीरनामे, प्रचार-प्रसार, उंच आवाजातील भाषणे, आश्वासने, पोस्टरबाजी या सर्वांचा पाऊस पडेल. सर्वपक्षीय नेतेच नव्हे, तर जनताही त्यात स्वतःला सुखनैव वाहवून घेईल.

राजधानी क्षेत्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आपणच काम करतो आहोत, असा आभास तयार करण्याच्या नादात आमच्या सर्वांचे श्वास-उच्छ्वास बंद करु पाहणाऱ्या प्रदूषणाचा सगळ्यांना विसर पडेल. विचार करणाऱ्या व्यक्तींना मात्र या जीवन-मरणाच्या परिस्थितीत नेमकं काय करावं, हा प्रश्न पडला आहे. दिल्ली सोडून जावं तर कुठं जावं? पोटापाण्याचं काय? मुलांच्या शिक्षणाचं काय? प्रदूषणमुक्त अशी किती शहरे आहेत? आणि सध्याची ही स्थिती बदलायला किती वर्षे लागतील?

नव्या दिल्लीतील नागरी सुविधा दिल्लीच्या इतर भागात नाहीत. पाण्याचा अनियमित पुरवठा, पादचारी मार्गांचा अभाव किंवा तुटलेल्या फरशा, अधूनमधून कचऱ्याचे ढीग, कागद आणि प्लास्टिकचे तुकडे.. या दूषित वातावरणात राजधानीचा स्मार्टनेस कुठं गुदमरला, दिल्लीचं दिल कुठं हरवलंय, तेच कळत नाही.

यावर उपाय आहे का? हो. समस्त दिल्लीकरांना थंडीचे चार - पाच महिने दिल्ली सोडावी किंवा राजधानी दिल्लीऐवजी नव्या राजधानीचा दिल्लीपासून दूर पर्याय शोधावा. पण, हे खरेच शक्य होईल? काहीच सांगता येत नाही. त्यामुळे तूर्त ठेविले अनंते तैसेचि रहावे.

■ ■ ■ ■

# निवडणूक निकाल आणि शेअर बाजारातील तेजी

शेअर बाजार निर्देशांकात झालेली वाढ किंवा तेजीची सुरूवात आणि विधानसभा निवडणुकांचा निकाल या गोष्टी एकाच काळात घडल्या, तरी त्यांचा एकमेकांशी कारणे - परिणाम असा संबंध नसतो. तथापि, निवडणूक निकाल हा निर्देशांकातील वाढीवर परिणाम करणारा घटक मानला, तरी तो फक्त एक घटक असू शकतो, एकमेव नाही!

---

**चंद्रशेखर टिळक**

---

आठवडाभरापूर्वी महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभा निवडणुकांचे तसेच देशातील काही लोकसभा, विधानसभा पोटनिवडणुकांचे निकाल जाहीर झाले. याच दरम्यान शेअर बाजारही सकारात्मक सूर आळवू लागला. त्यामुळे निर्देशांकातील या वाढीमागे विधानसभा निवडणुकीचा निकाल, विशेषतः महाराष्ट्रात भाजपला मिळालेले भरघोस यश हे कारण असल्याची मांडणी काही जण करु लागले.

महाराष्ट्रात आता दमदार सरकार येणार असल्याने बाजराने उसळी घेतल्याचा दावाही ते करत होते. महाराष्ट्र देशाचे अर्थकारण ठरवण्यात अग्रेसर असते, हा मुद्दाही ठळकपणे मांडत होते. सुमारे ३५ वर्षे मी भारतीय गुंतवणूक क्षेत्राशी निगडीत आहे. त्यामुळे असे खरेच काही घडू शकते का, हा विचार मनात येऊ लागला.

त्यावर अभ्यास करताना, महाराष्ट्रातील निवडणूक निकालांचा आणि शेअर बाजारातील वाढीचा अर्थाअर्थी काही संबंध नसल्याचे दिसले. मी पक्का महाराष्ट्रीयन असूनही हे दावे सरसकटपणे आणि तेही सहजासहजी मान्य करणे मला अवघड जात होते. तत्त्व म्हणून, तपशील म्हणून आणि तथ्य म्हणूनही!

**फ्युचर अपेक्षितच नसेल तर..?**

मुळात अशी चर्चा होण्याचे एक कारण म्हणजे, देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील १३ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. विदेशी वित्त संस्थांच्या आपल्या देशातील गुंतवणुकीचा विचार करता महाराष्ट्र हे राज्य त्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

अगदी गेल्या तीन महिन्यांच्या काळात देशातील इतर राज्यांपेक्षा सर्वात जास्त विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. पण म्हणून निर्देशांकातील वाढीचे श्रेय विधानसभा निवडणूक निकालाला देता येईल का? याबाबतीत निष्कर्ष काढताना काही तथ्ये समजून घ्यायला हवीत.

विधानसभा निवडणुकीचे मतदान बुधवारी २० नोव्हेंबरला झाले. त्यात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत सुमारे साडेपाच टक्के वाढ झाली. निवडणुकीचे निकाल शनिवारी, २३ नोव्हेंबरला जाहीर झाले. पण, शेअर बाजारातील निर्देशांकात तर गुरुवारपासूनच वाढ होत होती. बुधवारी सायंकाळी एक्झिट पोल जाहीर झाले. तथापि, त्यानंतरही जिथे सर्व राजकीय पक्षांना निकाल काही प्रमाणात अनपेक्षित असतील असे वाटत होते, तिथे शेअर बाजाराला मात्र हे निकाल असेच लागण्याची अपेक्षा होती, असे मानणे सयुक्तिक होणार नाही. त्यामुळे जे नव्हतेच ते कसे होणार?

अगदी Stock Market Always Discounts The Future हे बाजाराचे लाडके तत्त्व लावायचे ठरवले, तरी असे काही फ्युचर आहे, हे अपेक्षित असावे लागते. तसे इथे होते का? याचे उत्तर नकारात्मक असू शकते.

**अर्थचक्र मंदावण्याचा काळ मर्यादित**

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, लोकसभा निवडणुका आणि त्यांच्या निकालांचा शेअर बाजारावर किंवा एकंदरीतच गुंतवणूक क्षेत्रावर जितका प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, प्रकट किंवा प्रच्छन्न असा परिणाम होतो तितका, तेवढा आणि तसा परिणाम विधानसभा निवडणुका आणि निकालाचा होत नाही.

कारण लोकसभा निवडणूक निकालाचा राष्ट्रीय आर्थिक धोरणावर जेवढा परिणाम होतो किंवा होऊ शकतो, तेवढा तो विधानसभा निवडणुकांमुळे होत नसतो. त्यातही असा प्रभाव पडणारच असेल, तर कोणत्याही निवडणुकीतील मतदान किती टप्प्यांमध्ये पार पडले, याचा नीट विचार करणे क्रमप्राप्त ठरते. आचारसंहितेच्या काळात धोरणात्मक निर्णय होत नाहीत. त्यामुळे अर्थचक्र मंदावण्याचा कालावधी वाढतो.

महाराष्ट्रात सर्व २८८ मतदारसंघांत एकाच टप्प्यात, एकाच दिवशी मतदान झाले. त्यानंतर तीन दिवसांत निकाल लागले. या निवडणुकीची घोषणा ते निकाल हा आचारसंहितेचा काळ तुलनेने बराच मर्यादित होता. त्यामुळे बाजाराने निर्देशांकात सकारात्मक आणि तीही एकापेक्षा जास्त दिवस वाढ दाखवावी, अशी परिस्थिती नव्हती.

**पॉलिटिकल प्रॉडक्टस्‌चा चढ-उतार**

आणखी एका महत्त्वाच्या आणि वेगळ्या स्वरूपाच्या घटकाचा मात्र इथे नक्कीच विचार केला पाहिजे. विधानसभा निवडणुका आणि निकाल यांचा संपूर्ण शेअर बाजारावर फारसा परिणाम आणि तोही मध्यम ते दीर्घकाळ झाला नाही, तरी काही विशिष्ट क्षेत्रांतील कंपन्या आणि त्यांच्या शेअर्सचे भाव यावर मात्र अल्प ते मध्यम काळासाठी नक्कीच परिणाम होऊ शकतो. विपरीत परिणाम लगेच होतो.

या दृष्टीने तेल, ऊर्जा, कोळसा, खते यांसारखी राजकीयदृष्ट्या संवेदनशील उत्पादने (ज्यांना एका अर्थाने पॉलिटिकल प्रॉडक्टस्‌ म्हटले जाते) तयार करणाऱ्या कंपन्यांवर लक्ष ठेवावे लागते. अशा कंपन्यांचे संबंधित निर्देशांकात किती महत्त्व आहे, यावर ते अवलंबून असते.

उदाहरण द्यायचे, तर निवडणूक काळात किंवा जाहीरनाम्यात अनेकदा अशी घोषणा केली जाते की, आमचा पक्ष सत्तेवर आल्यास संपूर्ण किंवा अमुक इतके युनिट वीज मोफत देऊ किंवा शेतीपंपांना वीज मोफत देऊ. साहजिकच, असा पक्ष निकालानंतर सत्तेच्या परिघात आल्यास वीज कंपन्यांच्या शेअर्सच्या भावात विपरीत चढ-उतार होऊ शकतात.

दुसरे उदाहरण तेल कंपन्यांचे घेता येईल. आजवरच्या निवडणुकांचा अनुभव असा आहे की, आचारसंहिता काळात पेट्रोल, डिझेल, केरोसिन, घरगुती वापराचा गॅस यांच्या किमतीत बदल होत नाहीत. वाढ तर होत नाहीच नाही.

या काळात अशा वस्तूंच्या खरेदीचे प्रमाण काही कमी होत नसते. त्यामुळे संबंधित कंपन्या या वस्तू खुल्या बाजारातून खरेदी करत असतातच. त्यांच्या पुरवठ्यात खंड पडणे सरकारला परवडणारे नसल्याने मिळेल त्या भावाने त्यांची खरेदी सुरू राहते. खरेदीचा दर आणि वाहतूक खर्च काहीही असला, तरी आचारसंहिता काळात संबंधित कंपन्यांना या वस्तू नियंत्रित दरातच विकाव्या लागतात. याचा ताण या कंपन्यांवर येतो.

त्यामुळे आचारसंहिता संपताच पेट्रोलियम कंपन्या भाववाढ करतात. परवा सीएनजीचे दर वाढल्यावर आपण हा अनुभव घेतला आहेच. लोकसभा निवडणुकीत संपूर्ण देशभर अशी स्थिती असल्याने त्याचा ताणही अधिक असतो. विधानसभा निवडणूक राज्यापुरती असल्याने हा ताण मर्यादित असतो. म्हणूनही विधानसभा निवडणुकांचा शेअर बाजारावरील परिणाम तुलनेने मर्यादित राहतो.

या आणि अशा विविध घटकांमुळे ही गोष्ट निश्चित होते की, देशाच्या शेअर बाजार निर्देशांकात झालेली वाढ किंवा तेजीची सुरूवात आणि विधानसभा निवडणुकांचा निकाल या गोष्टी एकाच काळात घडल्या, तरी त्यांचा एकमेकांशी कारणे - परिणाम असा संबंध नसतो. कुणाला तसा अगदी बादरायण संबंध जोडायचाच असेल, तर तो बादरायणच आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. एकूणच निवडणूक निकाल हा निर्देशांकातील वाढीवर परिणाम करणारा घटक मानला, तरी तो फक्त एक घटक असू शकतो, एकमेव नाही!

■ ■ ■ ■

# प्रेम बिना धीरज नहीं, बिरह बिना बैराग...



**हेमकिरण पत्की**

आपल्याला आत्मीय असलेल्या व्यक्तीवर आपलं प्रेम असतं, तेव्हा ते सगळंच कुठं शब्दांतून व्यक्त होत असतं? प्रेमाची भाषा मौन असल्याचं प्रेमात बुडालेल्या मनाला जाणवत असतं. पण, प्रेम हृदयातून बोलू पाहतं. स्वतःला व्यक्त होता यावं, ही आपल्या हृदयाच्या तळाशी असलेली एक गहिरी आस असते. प्रेम पूर्णपणे व्यक्त होत नसतं, तेव्हा आपल्या डोळ्यांतून घळाघळा आसवं वाहू लागतात.

प्रेमाचा आशय दुसऱ्याला सांगायचा असतो आणि शब्द अपुरे पडतात. प्रेम दुसऱ्यासोबत वाटून घ्यायचं असतं आणि ते साधत नसतं. आपल्या ध्यानात येतं की, प्रेम शब्दांहून खूप व्यापक आहे! शब्द विषयगत आहेत आणि प्रेम अंतरात्म्याची प्रतिती आहे.

प्रेमातली आसवं प्रार्थनापूर्ण आहेत, हे जाणवण्याच्या स्थितीत कबीर थेट आपल्या हृदयाशी जोडले जातात. भौतिक जगापलीकडच्या प्रेमाची निरंतर राहणारी खूण आपल्याला दाखवतात.

नेह निबाहै ही बनै,
सोचै बनै आन।
तन दे मन दे शीश दे,
नेह न दीजै जान।।

दोन जिवांतलं प्रेम नात्यातला ओलावा जपत असतं तेव्हा कबीर म्हणतात, तिथं विचार प्रधान नसतो. प्रेमाचं अवतरण मुळी विचार-अविचाराच्या द्वंद्वातून जन्माला आलेलं नसतं. हे प्रेमी जिवांनी जाणलं तर देह, मन आणि बुद्धी यांचं समर्पित होणं सहज होतं.

कबीरांचं सांगणं आहे की, या समर्पणाहून प्रेमाचं आटून न जाणं महत्त्वाचं आहे. प्रेमाचं अवतरण जीवनाहून खूप मोठं आहे.

या दोह्यातून मानवी मनाच्या प्रेमभावाचं अखंड असणं कबीर गडद करतात. देह जाऊ देत, पण प्रेम जाता कामा नये. मनानं निर्माण केलेली प्रत्येक वस्तू जाणारी असते; मात्र प्रेम या जगाची निर्मिती नसते. प्रेम करणं, प्रेमपूर्ण जगणं हा आपला स्वभाव असतो, आपलं स्वरूप असतं. म्हणून तर कबीर म्हणतात, नेह न दीजै जान. केवळ प्रेम आपल्या मागे राहावं!

पिया चाहै प्रेम रस,
राखा चाहै मान।
दोय खड्ग एक म्यान में,
देखा सुना न कान।।

कबीर म्हणतात, प्रेम करणाऱ्यानं एक सूत्र ध्यानात असू द्यावं : ज्याला प्रेमाचा रस चाखायचा आहे, त्यानं समाजातील मान्यता, लोकप्रतिष्ठा, मानपान आणि पत यांचा विचार करता कामा नये.

या दोन गोष्टी एकाच हृदयात नांदू शकत नाहीत. प्रेमातील रस हा त्यागामधला असतो, भोगातला नसतो. उदाहरण म्हणून देवावर, देशावर, एखाद्या अमूर्त कलेवर प्रेम करणारी कुणी व्यक्ती आपण पाहिली, तिचं जीवन पाहिलं, तर तिच्या भौतिक जीवनाची फरफट आपल्या ध्यानात येईल.

त्या व्यक्तीला केवढ्या तरी सामाजिक उपेक्षेला सामोरं जावं लागतं. कधी कधी तर ती लोकांतील अप्रतिष्ठेच्या खाईत पडलेली असते. प्रेम आत्मप्रतिष्ठा देते. जीवनावरची श्रद्धा आणि विरहार्त असताना सहनबळ देते. कबीर म्हणतात...

प्रेम बिना धीरज नहीं,
बिरह बिना बैराग।
सतगुरु बिन जावै नहीं
मनसा का दाग।।

प्रेम स्वतःला विरघळवून तूमध्ये मिसळून जातं, तेव्हा काही मागण्याची भावना मनात उरत नाही.

केवळ देण्याच्या इच्छेनं हृदय संतुष्ट असतं. असं हृदय खूप सहनशील असतं. ते केवळ आपल्याला लाभलेलं दुसऱ्याला वाटून देत असतं. शुद्ध प्रेमातला विरह देहभेट लांबल्याचा नसतो, तर नुसत्या दर्शनाची आस दुर्लभ झाल्याचाही असतो. विरहाची आर्तता प्रेमळ हृदयाला सामान्य मोहांपासून दूर करते.

कबीर सांगतात, मनावरचे विकारांच्या संस्कारांचे डाग याच भावस्थितीत दृष्टीस पडतात. हेच चेतनेचं उन्नयन असतं. पण, हे डाग पुसले जाण्यासाठी आपल्याहून अधिक शुद्ध चेतनेचं कुणी सहज साधनेतून भेटावं लागतं. ते सद्गुरुच तर असतात!

दोन जीवांतल्या प्रेमाचा आलेख हा असा देहभाव, मनोभाव जाणून घेऊन अनासक्त होण्यानं होतो. आपल्यासारख्या भौतिक जगात गुंतलेल्या माणसांना केवळ प्रेमच मुक्त करतं, हे कबीरांचं सांगणं अनंत प्रेमातलं आहे. ते हृदयानं जाणून घेण्यातच आपलं हित आहे.

■ ■ ■



# सैनिक की सैतान?



## थंड डोक्याने केली प्रेयसीची हत्या

या देशातील प्रत्येक नागरिक सीमेवर लढणाऱ्या सैनिकाप्रती अभिमान बाळगतो. सैनिक आहेत म्हणून आम्ही सुरक्षीत असल्याची भावना प्रत्येकामध्ये आहे. परंतु, कधीकाळी एखाद्या सैनिकामध्ये सैतानही संचारतो आणि पुढे जे काही घडते, ते सारेच अनाकलनीय असे असते. अंगावर शहारे यावेत, दरदरून घाम फुटावा अशीच एक घटना उपराजधानीच्या नागपूर शहरात घडली.

तो भारतीय सैन्य दलात होता. त्याचे आधी लग्नही झाले होते. तरीही त्याने एका तरुणीशी प्रेमसंबंध प्रस्थापित केले. तिने लग्नाचा तगादा लावल्यामुळे तिचा गळा आवळून खून करीत मृतदेह जंगलात पुरला. जणू काही घडलेच नाही, या अविर्भावात तो वावरत होता. अनेक दिवस या हत्याकांडाचा छडा लागला नाही. परंतु, एका मोबाईलने काम केले आणि अखेर हा जवान गजाआड झाला.

अजय वानखेडे (३३) असे या सैनिक आरोपीचे नाव असून, तो न्यू कैलासनगर, नागपूर येथील रहिवासी आहे. तर ज्योत्स्ना आकरे (३२) असे मृत तरुणीचे नाव आहे. ज्योत्स्ना ही टेलिकॉलर म्हणून नोकरीला होती. तिचा घटस्फोट झाला होता व दुसऱ्या लग्नासाठी तिने विवाह संकेतस्थळावर नोंदणी केली होती. यातूनच तिची आरोपी अजयसोबत ओळख झाली होती.

अजयने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले व लग्न करण्याचे वचन दिले. मात्र प्रत्यक्षात त्याने २०२४ च्या १९ मे रोजी दुसऱ्याच मुलीशी लग्न केले. ही बाब त्याने ज्योत्स्नापासून लपवून ठेवली होती. २८ ऑगस्ट रोजी ज्योत्स्ना बेसा येथे तिच्या मैत्रिणीकडे थांबण्यासाठी गेली होती. मात्र त्यानंतर ती घरी परतलीच नाही. तिच्या कुटुंबियांनी फोन लावून मैत्रिणीला विचारणा केली. ज्योत्स्ना रात्री फोनवर बोलण्यासाठी जवळील बगिच्यात गेली व तेथून परत आलीच नाही असे तिच्या मैत्रिणीने सांगितले.

तिच्या नातेवाईकांनी १७ सप्टेंबरपर्यंत तिचा सगळीकडे शोध घेतला. मात्र ती कुठेही सापडली नाही. परिणामी, त्यांनी नागपूरच्या बेलतरोडी पोलीस ठाण्यात तक्रार केली.

**मोबाईलमुळे सुगावा**

ज्योत्स्ना बेपत्ता झाल्याप्रकरणी पोलीस तपास करू लागले. परंतु, काहीच धागेदोरे मिळत नव्हते. तपास करत असताना पोलिसांना तिच्या मोबाईलमुळे सुगावा लागला. तिचा मोबाईल आरोपीने हैदराबादला गहू घेऊन जाणाऱ्या ट्रकमध्ये टाकला होता.

तो ट्रक काही दिवसांनी नागपुरात परत आला व ट्रकचालकाला त्यात मोबाईल दिसला. त्याने त्यातील सीम काढून वेगळे सीम टाकले. तेव्हा पोलिसांना मोबाईल फोन ट्रेस झाला. त्यांनी ट्रकचालकाची चौकशी केली असता त्यांना मोबाईलबाबत माहिती मिळाली.

तरुणीचा मोबाईल फोन सापडल्यावर सीडीआर काढला असता त्यात पोलिसांना ती गायब होण्याच्या वेळी अजयसोबत बोलत असल्याची बाब लक्षात आली. पोलिसांनी त्याच्याशी संपर्क साधून विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.

अजय येथून पुण्याला गेला. त्याने अटकपूर्व जामिनासाठीदेखील अर्ज केला होता. मात्र तो फेटाळल्या गेला. त्यानंतर चौकशीदरम्यान त्याने पोलिसांची दिशाभूल केली.

पोलिसांनी त्याची सखोल चौकशी केली. त्याने स्वतःची गाडी धुतल्याची बाब समोर आली. गाडी आतून देखील धुतली होती. त्याने याबाबत समाधानकारक उत्तर दिले नाही. परिणामी, पोलिसांचा संशय बळावला. पोलिसांनी खाक्या दाखवायला सुरूवात केली आणि अखेर आरोपी अजयने या खून प्रकरणाची कबुली दिली आणि तिचा मृतदेह पुरलेली जागा पोलिसांना दाखविली.


माहितीनुसार त्याची ज्योत्स्नासोबत त्याच्या लग्नानंतर मेडिकलमध्ये भेट झाली होती. पुढे दोघांमध्ये संबंध अधिकच गडद झाले. विवाहीत असूनही अजयने तिला लग्नाचे आमिष देत विवाहबाह्य शारीरिक संबंध प्रस्थापित केले. ज्योत्स्ना त्याच्यावर लग्नासाठी दबाव टाकू लागली. तिने त्याच्या आईला संपूर्ण प्रकार सांगितला होता व त्याची पोलिसांत तक्रार करेन असा इशारा दिला होता. यामुळे घाबरून अजयने तिचा काटा काढण्याची योजना आखली.

ही घटना बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. पोलिसांनी हत्याकांडाचा गुन्हा दाखल करुन आरोपी अजय वानखेडे याला अटक केली आहे.

देशाचे रक्षण करण्यासाठी सीमेवर दक्ष या जवानाच्या डोक्यात सैतान संचारला आणि एक तरूणी जीवाला मुकली.

> आरोपी अजय आणि ज्योत्स्ना सतत एकमेकांच्या संपर्कात असायचे. सातत्याने मोबाईल फोनवर त्यांचे संभाषण व्हायचे. अजयने तिला कायमचे संपविण्याचा कट रचला होता. मैत्रिणीकडे थांबलेल्या ज्योत्स्नाला त्याने भेटण्यासाठी बोलविले व कारमधून वारंगा येथील निर्जन स्थळी घेऊन गेला. तेथे अजयने तिची हत्या केली. त्यानंतर तिचे पूर्ण कपडे काढून जवळच्या निर्जन स्थळी तिचा मृतदेह मेणकापड व प्लास्टिकमध्ये गुंडाळून पुरला. नंतर निवांतपणे त्याने सिमेंटने फ्लोअरिंगदेखील केले. तिचे कपडे त्याने वेगवेगळ्या ठिकाणी फेकले. ज्योत्स्नाचा मोबाईल फोन त्याने एका ट्रकमध्ये फेकून दिला होता. पुढे याच मोबाईल फोनने या हत्याकांडाच्या रहस्यावरून पडदा दूर सारला.

# वहिनीशी सूत जुळले आणि..



मोठ्या भावाचे लग्न झाल्यानंतर काही महिन्यांतच वहिनीशी दिराचे सूत जुळले. पत्नीशी जवळीक साधताना लहान भावाला बघताच घरात वादाचा भडका उडाला. या वादातून लहान भावाने मित्राच्या मदतीने मोठ्या भावाचा कुऱ्हाडीने वार करुन खून केला.

वहिनीच्या प्रेमात वेड्या झालेल्या दिराकडून भावाचाच खून झाल्याची थरारक घटना नागपूर जिल्ह्याच्या काटोलजवळील एका गावात उघडकीस आली. सत्येंद्र आणि संदीप अशी अटकेतील आरोपींची नावे आहे.

सत्येंद्र आणि जीतेश हे दोघे भाऊ काटोल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात सधन शेतकरी आहेत. दोघांनीही शेती कसून पैसा मिळवला. शेतीच्या कामात दोघाही भावंडांनी लग्न केले नव्हते. शेवटी एका नातेवाईकांच्या मदतीने ३५ वर्षीय मोठा भाऊ याचे तीन वर्षांपूर्वी एका नातेवाईक तरुणीशी लग्न झाले.

तरुणी नातेवाईक असल्यामुळे दोघेही भाऊ तिला लग्नाच्या पूर्वीपासून ओळखत होते. जीतेशचे मोठ्या थाटात लग्न झाले. सर्व काही सुरळीत सुरु होते. मोठ्या भावाने स्वतःचा संसार थाटला. घरातील वातावरण आनंदात होते.

मात्र, काही महिन्यानंतर सत्येंद्रचे वहिनीशी सूत जुळले. दोघेही समवयस्क असल्यामुळे दोघांचे घरातही चांगले पटत होते. त्यामुळे घरात कुणालाही त्यांच्या संबंधाबाबत संशय नव्हता. परंतु, काही महिन्यांतर वहिनी आणि दिरामध्ये अनैतिक संबंध प्रस्थापित झाले.

नेहमी शेतात कामावर जाणारा सत्येंद्र शेतात जात नव्हता. अनेकदा तो घरात एकटाच राहत होता. त्यामुळे मोठ्या भावाला दोघांच्या अनैतिक संबंधाबाबत थोडी जाणीव झाली.

मोठा भाऊ शेतात गेल्यानंतर वहिनी आणि दिर दोघेही एकाच खोलीत बसलेले होते. त्यादरम्यान, शेतात गेलेला भाऊ तासाभरात परत आला. तो घरात गेला असता दोघांनाही त्याने एकाच खोलीत पाहिले. त्याने बायकोला जाब विचारला असता डोळ्यातील कचरा दिर काढून देत असल्याचे तिने सांगितले.

मात्र, बायकोच्या चारित्र्यावर त्याला संशय आला. त्याने दुसऱ्या दिवशी घर सोडले आणि दुसरीकडे राहायला गेला. पती-पत्नीत पुन्हा चांगले संबंध निर्माण झाले. त्यांना मुलगाही झाला. सुखी संसार पुन्हा सुरु होता.

दोन वर्षे बाहेरगावी राहणारा जीतेश हा पत्नी व बाळासह पुन्हा गावी परतला. शेती करायला लागला. या दरम्यान वहिनी आणि दिराचे पुन्हा प्रेम फुलले. मोठ्या भावाने पत्नी व भावाला दोघांनाही मारहाण केली. त्यामुळे चिडलेल्या भावाने मित्र संदीप याच्या मदतीने संपविण्याचा कट रचला.

भाऊ रात्रीला शेतात गेल्यानंतर त्याच्या पाठीमागे दोघेही गेले. त्यांनी जीतेशचा कुऱ्हाडीने वार करुन खून केला. काटोल पोलिसांनी मात्र २४ तासांच्या आत हत्याकांड उघडकीस आणले आणि या खून प्रकरणातील दोन्ही आरोपींना अटक केली.

# एक फुल, दो माली.. एकाची हत्या केली!

तब्बल दोन वर्षांपासून बेपत्ता असलेल्या इसमाचा अखेर सांगाडाच हाती लागला. त्याची क्रूरपणे हत्या करून मृतदेह शेताच्या बंधाऱ्यात पुरण्यात आल्याचे आढळून आले. हिवरखेड परिसरात हा धक्कादायक घटनाक्रम घडला असून यामुळे खामगाव तालुक्यासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अनैतिक संबंध कधीकधी जीवावर देखील बेतू शकतात आणि पोलिसांनी ठरवले तर ते सुतावरून स्वर्ग गाठू शकतात.

या घटनेची पार्श्वभूमी तितकीच धक्कादायक आहे. खामगाव तालुक्यातील हिवरखेड पोलीस ठाण्यात मागील १८०ऑक्टोबर २०२२ रोजी सविता नंदु धंदरे हिने आपला पती नंदू श्रीराम धंदरे ( राहणार गणेशपुर) हा बेपत्ता असल्याची फिर्याद दिली होती. प्रकरणी हिवरखेड पोलिसांनी बेपत्ता झाल्याची नोंद करून तपास सुरु केला होता.

**असे सापडले मारेकरी**

मात्र बेपत्ता इसमाचा शोध लागत नसल्याने तपास थंड बस्त्यात पडला. मात्र नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी नव्याने तपास करण्याचे आदेश देऊन काही निर्देश, सूचना केल्या.

तसेच अपर पोलीस अधिक्षक (खामगाव) अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी (खामगाव ) विनोद ठाकरे यांनीही तपासात लक्ष घालून हिवरखेड पोलिसांना वेळोवेळी उपयुक्त सुचना दिल्या. तब्बल दोन वर्षांपासून बेपत्ता नंदु श्रीराम धंदरे राहणार गणेशपुर, तालुका खामगाव) यांचा नव्याने शोध घेण्यासाठी हिवरखेड पोलीस ठाण्याचे विशेष तपास पथक गठीत करण्यात आले. यामध्ये सहायक पोलीस निरीक्षक कैलास चौधरी, पोलीस हवालदार विठ्ठल चव्हाण, नायक पोलीस जमादार प्रविण जाधव, पोलीस जमादार महेंद्र नारखेडे यांचा समावेश होता. तपासासाठी जय्यत पूर्वतयारी करण्यात आली नंदु धंदरे याचा मोबाईल, सर्व संशयीत लोकांचे मोबाईल क्रमाक, त्यांचे ह्यलोकेशनह्ण व माहिती घेण्यात संकलित करण्यात आली.

नंदु धंदरे याचे संभाव्य पैश्याचे, जमीनीचे व प्रेमसंबंधाची माहिती काढण्याकरीता गोपनिय खबरीदार नेमण्यात आले. एवढेच नव्हे तर नंदु धंदरे याचेबद्दल माहिती देण्यास दहा हजार रुपयांचे बक्षिस जाहीर करण्यात आले. गणेशपुर गावासह हिवरखेड पोलीस ठाणे परीसरात फलक लावण्यात आले होते.

**मारेकरी जाळ्यात!**

दरम्यान नेमण्यात आलेल्या गोपनिय खबरीदार कडुन तपास पथकाला महत्वाची आणि निर्णायक ह्यटीपह्ण मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार नंदु धंदरे व अतुल कोकरे या व्यक्तीचे एका महिलेसोबत अनैतिक प्रेमसंबध होते. त्यामुळे त्याचा घातपात झाला असावा व त्याचेबद्दल अतुल कोकरे याचा जिवलग मित्र दिपक शालीग्राम ढोके हाच माहिती देवू शकतो अशी पक्की खबर पथकाला मिळाली.

यानंतर हिवरखेड पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने दिपक ढोके व अतुल कोकरे यांच्या हालचालीवर बारकाईने नजर ठेवली. खबरींनी दिलेल्या माहितीची पुष्टी झाल्यावर पथकाने संशयित दिपक ढोके याला उचलले. त्याकडे नंदु श्रीराम धंदरे यांच्याविषयी विचारपुस केली असता त्याने आधी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, नंतर तो पोपटासारखा बोलायला लागला. त्याने सांगितले की, दोघांचे एकाच महिलेसोबत असलेल्या प्रेम संबंधातून नंदुचा मार्गातून काटा काढण्यात आला. अतुल गंगाराम कोकरे (वय३० वर्षे गणेशपुर) याने शेतामध्ये फावडा, लाकडी दांडा आणि दगडाने नंदु श्रीराम धंदरे याची निर्घृणपणे हत्या केली. नंतर अतुल कोकरे आणि ढोके या दोघांनी मिळून अतुल कोकरेच्या शेताच्या धुऱ्यावर धंदरे याचा मृतदेह पुरला. यानंतर मृत धंदरे याची मोटार सायकल नदीत फेकुन पुरावा नष्ट केला.

आरोपींनी सांगितलेल्या शेताच्या बांधावरील त्या ठिकाणी खोदण्यात आले असता मानवी हाडांचा सांगाडा मिळुन आला. आरोपी अतुल गंगाराम कोकरे यास त्याचे गाव गणेशपुर मधून ताब्यात घेण्यात आले. तब्बल दोन वर्षानंतर पोलिसांनी आरोपी हुडकून काढलेच.



# उधारीची वसुली आणि पाठलाग करीत हत्या

ॲक्शन, मारधाड आणि एखाद्या स्टंट चित्रपटात पाहायला मिळते, तशीच एक घटना नागपूर शहराच्या कळमना भागात घडली. कुटुंबातील सर्व सदस्य शस्त्र घेवून त्याच्या मागे धावताहेत आणि तो जीवाच्या आकांताने पळतो आहे. मात्र, अखेर त्याला जीव गमवावा लागला. उधारीचे पैसे मागण्यासाठी गेलेल्या तरुण व त्याच्या मित्रांवर एका कुटुंबाने हल्ला केला. मित्र पळून जाण्यात यशस्वी झाले, मात्र तरुणाला रस्त्याने पळवून पळवून कोयत्याने वार करीत हत्या करण्यात आली. ही घटना कळमना पोलिस ठाण्यांतर्गत रविवारी रात्री घडली.

पोलिसांनी नंदकुमार सीयाराम चकोले (४९), त्याची पत्नी आणि मुलगा करण चकोले (२१) या तिघांना अटक केली आहे. दोन अल्पवयीनही पोलिसांच्या ताब्यात आहेत. ताहिर उर्फ बाबा जाकीर खान (२२) रा. गुलशननगर असे मृताचे नाव आहे. या हल्ल्यात ताहिरचे मित्र ईश्वर केशव निशाद (२१) रा. वैष्णव देवीनगर आणि दीपक बिहारीलाल मिसरीया (२५) रा. यशोधरानगर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ताहिरने काही दिवसांपूर्वी नंदकुमारचा मुलगा अर्जुन याला २० हजार रुपये उसणे दिले होते. रविवारी रात्री ईश्वर कोराडी मंदिरात जाण्याच्या तयारीत असताना ताहिरने त्याला फोन करून मी सोबत मंदिरात येतो असे सांगितले. तत्पूर्वी अर्जुनने त्याला फोन करून पैसे घेण्यासाठी विजयनगर परिसरात बोलावले होते. ताहिरने ईश्वर आणि दीपक यांनाही सोबत येण्यास म्हटले. तिघेही विजयनगर परिसरात पोहोचले असता अर्जुनने त्यांना एनआयटी उद्यानाजवळ चलण्यास म्हटले. तेथे अर्जुन आणि ताहिर यांच्यात वाद झाला.

अचानक अर्जुनचे वडील नंदकुमार, भाऊ करण, आई आणि अल्पवयीन चुलत भाऊ काठी आणि कोयता घेऊन तेथे आले. पाचही जणांनी मिळून तिघांवरही हल्ला केला. ईश्वर आणि दीपकने पळ काढला, मात्र ताहिर आरोपींच्या तावडीत सापडला होता. पाचही आरोपींनी त्याला बेदम मारहाण करीत रस्त्याने पळवून पळवून कोयता, काठी आणि दगडाने वार करीत खून केला.

ईश्वरने ताहिरचा भाऊ समीर याला घटनेची माहिती दिली. सर्व विजयनगर परिसरात पोहोचले. मात्र ना तेथे ताहिर होता आणि ना आरोपी. संपूर्ण परिसर पिंजून काढल्यानंतर ताहिर गुलमोहरनगरात रस्त्यावर जखमी अवस्थेत पडून असल्याचे आढळला. त्याला तत्काळ उपचारार्थ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. सोमवारी सकाळी ताहिरचा मृत्यू झाला. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तीन आरोपींना अटक केली.

# आजीनेच लोटले तिला देहव्यापाराच्या दलदलीत



## घरातच सुरू केला देहव्यापाराचा अड्डा

सातव्या वर्गात शिकणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींना एका महिलेने देहव्यापारात ढकलले. आंबटशौकीन ग्राहकांना बोलावून घरातच देहव्यापाराचा अड्डा सुरु केला.

गुन्हे शाखेने या अड्ड्यावर छापा घालून महिलेला अटक केली तर दोन्ही मुलींना पोलिसांनी देहव्यापाराच्या दलदलीतून बाहेर काढले. या प्रकरणात आरोपी दलाल महिलेला न्यायालयाने २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा आणि ७ हजार रुपये दंड ठोठावला. मुन्नीबाई असे शिक्षा सुनावलेल्या महिलेचे नाव आहे.

मुन्नीबाई ही ताजनगरमध्ये राहत असून देहव्यापारात सक्रिय होती. तिने १४ वर्षीय नात आणि तिची वर्गमैत्रिण यांना देहव्यापाराच्या दलदलीत ओढले होते. सातव्या वर्गात शिकणाऱ्या दोघीही मुन्नीबाईच्या घरी अभ्यास करायच्या. मुन्नीबाईने सुरुवातीला दोघींनाही नवीन कपडे घेऊन दिले. पहिल्यांदा एकीला ५०० रुपये देऊन एका आंबटशौकीन युवकाशी शारीरिक संबंध ठेवण्यासाठी बळजबरी केली.

त्यानंतर मुन्नीबाई या दोघींसाठी ग्राहक शोधायची आणि त्यांच्याकडून देहव्यापार करवून घ्यायची. मुन्नीबाई ही नेहमी ५०० रुपये देत असल्यामुळे दुसरी मुलगीही झटपट पैसे कमविण्याच्या नादात मुन्नीबाईच्या जाळ्यात अडकली.

त्यामुळे मुन्नीबाई दररोज ग्राहक बोलावायला लागली. या प्रकाराची माहिती गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या तत्कालिन पोलीस निरीक्षक रेखा संकपाळ यांना मिळाली. त्यांनी सापळा रचून बनावट ग्राहक पाठवला आणि छापा टाकण्याची तयारी केली.

बनावट ग्राहकाने मुन्नीबाईची भेट घेऊन ७ हजार रुपयांत सौदा केला. त्यानंतर पोलिसांनी छापा घातला. या छाप्यात दोन्ही मुलींची सुटका करण्यात आली तर मुन्नीबाईला अटक करण्यात आली. या प्रकरणात अजनीचे पोलीस निरीक्षक सार्थक नेहते यांनी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

ॲड. आसावरी परसोडकर यांनी या प्रकरणात सक्षमपणे बाजू मांडली. न्यायधीश आर.पी. पांडे यांनी आरोपी मुन्नीबाईवर दोष सिद्ध झाल्याने २० वर्षे सश्रम कारावास आणि ७ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. मुन्नीबाई आता कारागृहात खडी फोडण्याचे काम करीत असावी.

> मुन्नीबाईची विवाहित मुलगी प्रियकरासोबत पळून गेली. त्यामुळे तिची मुलगी मुन्नीबाईच्या घरी राहत होती. तसेच तिच्या वर्गमैत्रिणीची आईसुद्धा प्रियकरासोबत पळून गेली. त्यामुळे ती दारुड्या वडिलासोबत राहत होती. तिचे वडिल बेरोजगार असल्यामुळे शाळेचे शुल्कसुद्धा भरत नव्हते. त्यात मुन्नीबाईने तिला दररोज ५०० रुपये पैसे देऊन जाळ्यात अडकवले होते. म्हणून दोन्ही मुली देहव्यापाराच्या दलदलीत अडकल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# खिशातील पत्रामधील ती चार अक्षर अन् सिनेसृष्टीतील खुनाचा छडा!

अनेकदा हत्येचा छडा लावणं पोलिसांसाठी जिकरीचं काम असतं. आरोपीने कोणतेच पुरावे मागे सोडलेले नसतात. सराईत गुन्हेगाराप्रमाणे हत्या झालेली असते. पण हत्येचा तपास करणं गरजेचं असतं. त्यामुळे पोलीस यंत्रणांकडून शक्य तितक्या सर्व शक्यता तपासून पाहिल्या जातात.

सर्वबाजूने चौकशी करून झालेली असते. परंतु, तरीही उलगडा होत नाही. पण आरोपी काहीतरी पुरावा मागे ठेवून जातोच, त्यामुळे तो पकडला जातो अन हत्येचा तपास लागतो. असाच प्रकार नालासोपारा येथे घडलेल्या एका हत्या प्रकरणात झाला आहे.

नालासोपारा येथील पेल्हार पोलीस ठाण्याच्या पोलिसांना मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या एक नाल्यात एका अज्ञात व्यक्तीचा कुजलेला मृतदेह सापडला. पोलिसांनी हा मृतदेह ताब्यात घेऊन अपघाती मृत्यूची नोंद केली.

शवविच्छेदन अहवालात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाल्याचे स्पष्ट झालं. त्यामुळे पोलिसांनी याप्रकरणी अज्ञाताविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. परंतु, मृतदेह पूर्णपणे कुजलेला होता. त्याच्या शरीरावर कोणत्याच ओळख खुना नव्हत्या. त्याच्या आजूबाजूला कोणतं सामानही नव्हतं. मोबाइलही गायब होता. अशा परिस्थितीत या हत्येचा छडा कसा लावायचा हा मोठा प्रश्न पोलिसांसमोर उभा राहिला.

पोलिसांनी प्रयत्न सुरू ठेवले. अखेर त्यांना त्याच्या खिशात सापडलेल्या त्या चार अक्षरांनी मदत केली. या चार अक्षरांच्या मदतीने पोलीस आरोपीपर्यंत पोहोचले आणि हत्येचा उलगडा झाला.

हत्येचा तपास करत असताना पोलिसांना मृतदेहाच्या खिशात एक चिठ्ठी सापडली. या चिठ्ठीत एएछ अशी चार अक्षरं लिहिली होती. लागलीच पोलिसांनी ही चार अक्षरे इंटरनेटवर शोधली. त्यांना ESEL सारख्या आस्थापनांचे १५० हून अधिक संपर्क क्रमांक सापडले.

पोलिसांनी या सर्व क्रमाकांवर संपर्क साधला. अखेर त्यांना मुंबईच्या मानखुर्द येथील एसेल स्टुडिओशी या मृतदेहाचं असलेलं कनेक्शन सापडलं. त्यामुळे पोलिसांनी लागलीच या स्टुडिओला भेट दिली. तेव्हा कळंल की आऊटडोअर चित्रपटांच्या शुटींगसाठी ज्युनिअर कलाकार पुरवणारा संतोष कुमार यादव (२७) बेपत्ता आहे.

**एक क्लू आणि पोलीस पोहोचले आरोपीपर्यंत**

या एका क्लुमुळे पोलिसांना या प्रकरणाची लिंक लागत गेली. पोलिसांनी तपास पुढे सुरूच ठेवला. पुढच्या तपासात असं आढळलं की या यादवचा शेवटचा फोन कॉल एका ज्युनिअर आर्टिस्ट असलेल्या एका महिलेशी झाला होता.

त्यामुळे पोलिसांनी तिची चौकशी केली. तिच्या चौकशीतून आढळलं की सुनिल सिंग आणि राहुल सोहन पाल यांच्याबरोबर यादव होता. हे सर्व सिनेसृष्टीत एजंट म्हणून काम करत होते.

**व्यावसायिक मत्सरातून झाली हत्या**

तीन दिवसांनंतर, पोलिसांनी सुनील सिंहला ठाण्यातून ताब्यात घेतलं. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता त्यानेच राहुल पालच्या मदतीने संतोष कुमार यादवची हत्या केल्याचं कबुल केलं.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यादवने एका चित्रपटाच्या शूटिंगसाठी ज्युनियर कलाकारांसाठी देण्याचे मोठे कंत्राट मिळवले होते. त्यामुळे सुनिल सिंह याला राग आला होता. संतापाच्या आणि मत्सराच्या भराने त्याने संतोष कुमार यादवची हत्या केली.

**अशी केली हत्या**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिंह आणि पाल यांनी ७ मे रोजी यादवला कराराची ट्रीट म्हणून मद्यपानासाठी बोलावले होते. त्याला नालासोपारा येथील एका पुलाजवळ एका निर्जन स्थळी नेले आणि कथितरित्या त्याचा दगडाने वार करून खून केला. त्यानंतर त्याचा मृतदेह जवळच्या नाल्यात टाकण्यात आला, असे पोलिसांनी सांगितले.

सिंगला भारतीय दंड संहिता (आयपीसी) च्या कलम ३०२ (हत्या) आणि २०१ (गुन्ह्याशी संबंधित पुरावे गायब करणे) अंतर्गत अटक करण्यात आली होती. महिनाभर राहुल पालचा शोध घेतल्यानंतर तो हरियाणात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने हरियाणात जाऊन त्याला फरीदाबाद जिल्ह्यातील जाजरू गावातून पकडले.